म. ग्रं. सं. ठाणें
विषय — धार्मिक
सं. नं. २५५.

म. ग्रं. सं. ठाणें.

RI I BK-0006740

# डॉ. केतकरांचें सान्निध्य

केतकरांसंबंधीं लेखसंग्रह

अर्थात्

गुणदोषविवेचक अल्पचरित्र.

लेखक

यशवंत रामकृष्ण दाते

चिंतामण गणेश कर्वे

REFBK-0006740

ग्रंथ संग्रहालय ठाणे

दा. क्र. ६७४०

प्रकाशक—यशवंत रामकृष्ण दाते,
महाराष्ट्र कोशमंडळ, ३ बुधवार, पुणें.

मुद्रक:—हेरंब बापु गुर्जर, आयुर्विद्या मुद्रणालय,
२६१।२ सदाशिव पेठ, पुणें २.

सन १९४६ ]

[ किंमत २ रुपये

एकमेव विक्रेते:— महाराष्ट्र ग्रंथभांडार, मुंबई.

# डॉ. केतकरांचें सान्निध्य

## अनुक्रमणिका


प्रस्तावनाः--श्री. य. रा. दाते पृष्ठें १-१०

दृष्टिक्षेप पहिलाः---व्यक्तिपरिचय-श्री. दाते
( लोकशिक्षण, एप्रिल १९३१ ) १

,, दुसराः--डॉ. केतकर विक्षिप्त होते का ?-श्री. कर्वे
( भाषण-ऑल इंडिया रेडिओ ) १७

,, तिसराः--संपादक केतकर-श्री. कर्वे
( प्रतिभा, केतकर अंक ) २३

,, चवथाः--माझा आवडता ग्रंथकार-श्री. कर्वे
( निबंधसंकलन, भाग १ ) ३२

,, पांचवाः--डॉ केतकर आणि महाराष्ट्रीय ज्ञानकोश-
श्री. दाते, ( लोकशिक्षण, मे-जून १९३७ ) ३६

,, सहावाः--ज्ञानकोशांतील डॉ. केतकरांचें लिखाण-
श्री. कर्वे ( प्रतिभा, केतकर अंक ) ५३

,, सातवाः--ज्ञानकोशाचें अंतरंग--श्री. कर्वे
( प्रतिभा, केलकर अंक ) ५६

,, आठवाः--डॉ. केतकर यांचीं नियतकालिकें-श्री. कर्वे
लोकशिक्षण, मे-जून १९३७ ) ६१

,, नववाः--डॉ. केतकर यांचीं विविध कार्यें व योजना-
श्री. दाते ( प्रतिभा, केतकर अंक ) ७०

,, दहावाः--डॉ. केतकर यांचें प्रापंचिक जीवन-
श्री. कर्वे ( लोकशिक्षण, जुलै १९३७ ) ८३

उपसंहारः--श्री. चिं. ग. कर्वे ९५


[ टीपः--लोकशिक्षण, प्रतिभा, निबंधसंकलन व रेडिओ यांच्या संपादक चालकांचे आम्ही आभारी आहों. ]

---

# प्रस्तावना

—:०:—

डॉ. केतकर यांच्या पुण्यतिथीस १० एप्रिल १९४६ रोजीं नऊ वर्षे पूर्ण झालीं. इतक्या अवधींत त्यांचें एखादें चरित्र लिहिलें जावें अशी त्यांच्या चाहात्या लोकांची साहजिक अपेक्षा होती. त्याप्रमाणें मध्यंतरीं श्री. सौ. मुक्ताबाई लेले-दीक्षित यांनीं आपण असें चरित्र लिहीत आहों असें प्रसिद्धहि केलें होतें. त्यामुळें कदाचित् इतर कोणी तसा उपक्रम केला नसेल; परंतु अद्यापपर्यंत त्यांचें चरित्र लिहिलें गेलें नाहीं हें मात्र खरें. तेव्हां महाराष्ट्रास त्यांचा पुन्हां एकवार परिचय करून देऊन त्यांची स्मृति ताजी करावी या उद्देशानें हा लेखसंग्रह प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

वास्तविक डॉ. केतकर यांचें एखादें विस्तृत चरित्र प्रसिद्ध व्हावयास पाहिजे व तें चरित्र त्यांच्याशीं निकट सान्निध्य असलेल्यांपैकीं कोणीं लिहिलें तर तें समुचित होईल. परंतु प्रस्तुत लेखकांनीं स्वतः जबाबदारी घेऊन कांहीं कार्यें अंगावर घेतलीं आहेत व वास्तविक तीं डॉ. केतकर यांनीं महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या रूपानें जें महाराष्ट्र भाषासंवर्धनाचें बीजारोपण केलें त्याचेंच संवर्धन व पोषण करण्याच्याच स्वरूपाचींच आहेत व त्यांतील एक महाराष्ट्र शब्दकोशाचें कार्य पूर्ण करून कोठें जो थोडा फार उसंत मिळावयाचा तोंच महायुद्धामुळें पुढील कार्यांत अनेक प्रकारच्या कागद मिळण्यापासून तों छपाईपर्यंत सर्वतऱ्हेच्या अडचणी उपस्थित होऊन केवळ जागेवर पाय स्थिर कसे राहतात अशी परिस्थिति निर्माण झाली व त्यामुळें केवळ लेखनकार्य करीत कसेंबसें तग धरून राहावयाचें एवढेंच कार्य या काळांत शक्य झालें. अजूनहि सर्व निर्बंध दूर झाले नाहींत व परिस्थिति अनुकूल नाहीं, ही गोष्ट हा लहानसा लेखसंग्रह सहा

महिन्यांपूर्वीं योजना करूनहि वेळेवर पूर्ण झाला नाहीं यावरून दिसून येतच आहे.

तेव्हां मुख्य कार्य सांभाळून इतर कार्य करण्यास अवश्य असणारी परिस्थिति सध्यां उपलब्ध नाहीं. त्यांतून डॉ. केतकर यांच्या आयुष्य-क्रमास इतके पैलू होते कीं त्यांचें साकल्यानें वर्णन करावयाचें तर त्यांत अनेक प्रश्न उपस्थित होणार. त्यां सर्वांकडे निर्विकार बुद्धीनें पाहण्याची मनोवृत्ति व तीस अनुकूल वातावरण कांहीं काल गेल्या-नंतरच तयार होतें. कांहीं ताज्या प्रसंगांबद्दल मनुष्याच्या मनांत जसे हर्षामर्ष असतात तसे ते दूरच्या कालांत राहात नाहींत व त्यामुळें अशा प्रसंगांचें वर्णनहि थोड्या दूरच्या कालांत अधिक निर्विकार-पणानें करतां येतें. शिवाय कांहीं त्यांचा चाहाता वर्ग हें कार्य कर-ण्यास उत्सुक असावा असें वाटत होतें व त्याचें एक उदाहरण वर दिलेंच आहे. त्यामुळें ही गोष्ट लांबणीवर टाकणें हेंच अधिक श्रेयस्कर होय असें म्हणावें लागतें.

डॉ. केतकर यांच्या सान्निध्याचा लाभ मला १९१७ ते १९२८ पर्यंत घडून आला. मी एल्‌एल्. बी. ची परीक्षा १९१६ सालीं उत्तीर्ण झालों व पुढें सनद काढून वकिली कोठें करावयाची या विचारांत असतांना नागपुरास प्लेग असल्यामुळें प्रथम बुलढाणें वगैरे कांहीं ठिकाणीं हिंडून १९१७ सालीं मी नागपुरास आलों व ज्ञान-कोशाचें कार्य त्याच सुमारास सुरू झालेलें असल्यामुळें सनद काढी-पर्यंत कांहीं तरी उद्योग करावयाचा तो एखाद्या शाळेंत शिक-विण्यापेक्षां ज्ञानकोशांत लेखन करणें अधिक बरें म्हणून काम करूं लागलों. ज्ञानकोशाच्या कार्यास कायदेशीर रीतीनें १९१७ मार्च-मध्यें व समारंभपूर्वक सुरुवात त्याच सालाच्या वर्ष प्रतिपदेच्या मुहूर्तावर करण्यात आली. त्यापूर्वींच मी काम करूं लागलों होतों. तेथपासून ज्ञानकोश पूर्ण झाल्यानंतर १९२८ सालीं १ एप्रिल

याविषयीं आम्ही ज्ञानकोशमंडळ सोडीपर्यंत मी ज्ञानकोशमंडळांत कार्य करीत होतों व सर्व संपादकीय व्यवस्थेचें काम प्रथमपासून माझे-कडेच होतें. याप्रमाणें ज्ञानकोशाच्या कार्यामुळेंच मला डॉ. केतक-रांचा सहवास घडला व तें पूर्ण झाल्यावर लवकरच तो सुटला. ज्ञानकोशमंडळाची संपादकीय कचेरी पुणें येथें १९१९ सालीं जुलैमध्यें आणण्यांत आली व ता. २ जुलै रोजीं रा. कर्वे यांची नेमणूक करण्यांत आली व तेहि वरील दिवशीं आम्हांबरोबरच ज्ञान-कोशमंडळ सोडून निघाले.

डॉ. केतकर यांच्या आयुष्यक्रमाचे साधारणतः तीन कालखंड पडतात. पहिला त्यांचें शिक्षण, परदेशगमन, प्रवास व कार्यनिश्चिति हा होय. दुसरा ज्ञानकोश प्रकाशन व तिसरा ज्ञानकोशानंतरचा. यापैकीं त्यांचें मुख्य कार्य जें ज्ञानकोश त्या कालखंडामध्येंच आमचा त्यांच्याशीं सहवास घडला व सामान्यतः त्या कालखंडालाच अनु-लक्षून बहुतेक लेख आहेत, व या कालखंडांतच त्यांनीं देशीभाषेंत ज्ञान देण्याच्या मुख्य कार्याचा उपक्रम केला.

डॉ. केतकर यांचें शिक्षण उमरावती व मुंबई येथें झाल्यानंतर ते अमेरिकेंत गेले व तेथून परत येतांना इंग्लंडमध्यें वर्षदीडवर्ष राहून हिंदुस्थानांत १९१२ मध्यें परत आले. त्यानंतर त्यांनीं हिंदुस्थान, सिलोन वगैरेमध्यें प्रवास करून निरीक्षण केलें व कलकत्त्यास थोडे दिवस राहून आपलें कार्यक्षेत्र निश्चित करून नागपुरास येऊन ज्ञान-कोशाच्या कार्यास त्यांनीं आरंभ केला. येथें पहिला काल खंड समाप्त झाला. त्यानंतर १९२७ मध्येंच मुख्य ज्ञानकोशाचें कार्य संपलें. येथेंच दुसरा काल खंड संपला. त्यानंतर पुढील कार्याची निश्चिति करण्यांत एक वर्ष गेलें व ती निश्चितिबरोबर करतां न आल्यामुळें त्यांच्या सहकाऱ्यांस त्यांस सोडून स्वतंत्र व्हावें लागलें. यानंतर त्यांनीं कांहीं कादंबऱ्या व लेख लिहिले व महाराष्ट्राचा प्राचीन

इतिहास लिहिण्याचा उपक्रम केला. त्याचा प्रथम खंड सर्वांच्या अखेरीस प्रसिद्ध व्हावयाचा होता व तो इंग्लंडमध्यें जाऊन लिहावयाचा होता. दुसरा खंड शालिवाहन पर्व हा प्रसिद्ध झाला व तिसरा आणि चवथा हे लिहून तयार आहेत असें समजतें. या खेरीज गुजराती व हिंदी ज्ञानकोशाचा त्यांनीं उपक्रम केला. गुजराती ज्ञानकोशाचे दोन खंड व हिंदीचा एक खंड बाहेर पडले. पुढील कार्याची त्यांनीं फारशी फिकिर केली नाहीं. अखेरीअखेरीस त्यांनीं राजकारणांत भाग घेण्याचा प्रयत्न केला व स्टेट सेक्रेटरी विरुद्ध फिर्याद केली व आपली कैफियत 'व्हिक्टोरियस इंडिया' या इंग्रजी पुस्तकांत मांडली. हें पुस्तक त्यांच्या मागून प्रसिद्ध झालें. विद्यासेवकांत त्यांनीं तीन कादंबऱ्या प्रसिद्ध केल्या व तीन मागाहून लिहिल्या. एक अपूर्ण कादंबरी 'भटक्या' ही त्यांच्या निधनानंतर प्रसिद्ध झाली. याखेरीज 'महाराष्ट्रीयांचें काव्य-परीक्षण', 'नि:शस्त्रांचें राजकारण' व इतर निबंध त्यांनीं लिहिले.

प्रस्तुत ग्रंथांतील लेख त्यांच्या निधनानंतर लवकरच लिहिले गेले आहेत. त्यामुळें ते तावत्कालपर्यंतच्या विशेषत: त्यांचा आमचा सहवास जो ज्ञानकोश कार्यामुळें घडला त्या कालखंडालाच अनुलक्षून लिहिलेले आहेत; त्यामुळें ज्ञानकोशाच्या अनुषंगानें त्यांचा जो आयुष्यक्रम आमच्या नजरेस आला त्या संबंधींच हें लिखाण आहे ही गोष्ट लक्ष्यांत घेतली पाहिजे. त्याप्रमाणेंच त्यांच्या आयुष्यांतील मुख्य कार्य ज्ञानकोश हेंच होय, हेंहि त्यांच्या एकंदर आयुष्यक्रमाचें निरीक्षण केल्यावर व त्यांच्या आयुष्यांतील एकंदर कार्याचा आढावा घेतला असतां लक्ष्यांत येईल.

डॉ. केतकरांचा स्वभाव असा होता कीं, त्यांस त्यावेळीं चालू असलेल्या शैक्षणिक अगर राजकीय क्षेत्रांत कोणाच्याहि सहकार्यानें काम करणें अशक्य होतें. कलकत्त्यास ते एक वर्ष अध्यापनाचें कार्य

करीत होते पण त्यानंतर ते तेथें टिकूं शकले नाहींत. तेथें 'सर-अशुतोष मुकर्जींनीं त्यांच्याशीं लबाडी केली' असा त्यांचा समज होता. राजकारणांत अमेरिकेंत जाण्यापूर्वीं जीं त्यांचीं मतें होतीं तीं परत येईपर्यंत पार बदलून गेलीं. ते जरी टिळकांचे चाहते असून टिळक पक्षीय म्हणवीत असत तरी त्यावेळीं टिळकांच्या राजकारणांत त्यांच्याशीं सहकार्य करीत असलेल्या कोणाहि व्यक्तीचें व त्यांचें कधीं पटलें नसे व पटलेंहि नाहीं. नागपूरकर मंडळींचा व त्यांचा बेबनावच झाला व नागपूरकर मंडळीनें केसरींत एक पत्रक प्रसिद्ध करून त्यांच्या विरुद्ध ज्ञानकोश कार्याबद्दलहि तक्रार केली. पुण्यांतील टिळकांच्या अनुयायांशीं तर त्यांचें विळ्याभोपळ्या एवढें सख्य दिसून आलें. याप्रमाणें राजकारणांत ते एकांडेच राहिले. तसेंच सामाजिक, शैक्षणिक वगैरे बाबतींत त्यांचीं मतें प्रचलित रूढ प्रणालीपासून फारच दूर असल्यामुळें त्यावेळीं चालू असलेल्या कोणत्याहि संस्थेंत अगर कार्यांत त्यांस सहकारी होणें अशक्य होतें. त्यावेळीं सरकारी नोकरींत शिरण्याच्या बाबतींत अमेरिकन पदवीस मान नव्हता त्यामुळें कांहीं अमेरिकन पदवीधरांस आपल्या पदवीस मानीत नाहींत म्हणून सरकारी नोकरी सोडावी लागली व कांहींस इंग्रजी पदवी मिळवावी लागली. त्यामुळें तोहि मार्ग बंदच होता व तिकडे जाण्याचा त्यांनीं कधीं प्रयत्न केला नाहीं. बडोद्याची शिष्यवृत्ति घेतल्यामुळें तेथें नोकरी करण्याचें बंधन त्यांजवर होतें पण तेंहि त्यांनीं झुगारून दिलें. तेव्हां त्यांस कांहीं स्वतंत्र व्यवसायच करणें भाग होतें व त्याप्रमाणें त्यांनीं हा ज्ञानकोशाचा स्वतंत्र व्यवसाय हातीं घेतला. याबद्दलच्या त्यांच्या कल्पना प्रथम संदिग्धच होत्या असें त्यांनींच लिहून ठेवलें आहे व 'माझी ज्ञानकोशाकडे प्रवृत्ति होण्यास माझी कांहीं अंशीं स्वतः पत्करलेली बेकारी कारण असावी असें वाटतें' असें त्यांनींच म्हटलें आहे. त्यावेळीं या कार्यास अनुकूल वेळ होती

व तें नागपुरास सुरू झाल्यामुळें त्यांस तेथें रा. पाध्ये वगैरे प्रथम सहकारी मिळाले पण त्यांस त्यांनीं लवकरच दूर केलें. नागपूर येथें असतांना त्या वेळच्या जुन्या लेखकांचें सहकार्य मिळविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला पण त्यांस कोणीहि येऊन मिळाला नाहीं. तसेंच नागपूरच्या कचेरींत कांहीं काळ काम केलेल्या सुमारें शंभराच्या वर लेखकांपैकीं फक्त रा. दाते व रा. देशपांडे हे संपादकवर्गांपैकीं व. रा. टिळक हे हिशोबखात्यापैकीं एवढेच पुण्यास आले. इतरांनीं नागपुरासच कोणी वकीली, कोणी मास्तरकी वगैरे पाहिली. रा. देशपांडे हेहि बधिरतेमुळें सरकारी शिक्षण खात्यांतून कमी केले गेलेले होते व रा. टिळक हे राजकारणामुळें कमी झालेले होते. पुण्यासहि नागपूरची कचेरी येण्यापूर्वींचा जो लेखक वर्ग होता तो हि लवकरच सोडून गेला व सर्व नवीनच माणसें घेऊन तयार करावीं लागलीं. त्यांपैकीं कांहीं अडचणी सोसूनहि टिकून राहिल्यामुळें ज्ञानकोशाचें कार्य पूर्ण तरी झालें. मध्यंतरीं नागपूरकरांबरोबर केतकरांचा जो वाद चालू होता त्यामुळें कार्य मध्येंच स्थगित होतें कीं काय, असेंहि येथील संपादकवर्गास वाटूं लागलें होतें व तशी स्थिति आल्यास निदान दुसरीकडे नोकरी मागावयाची पाळी येऊं नये म्हणून **सरस्वती मंदिर संस्था** त्यांनीं आधींच काढून ठेवली होती व तींत डॉ. केतकर यांचा संबंध ठेवला नव्हता.

ज्ञानकोशाचें प्रत्यक्ष कार्य चालू असतां त्यांचा अनेक निरनिराळ्या प्रकारच्या लोकांशीं संबंध आला. ज्ञानकोशमंडळ नोंदण्याच्या वेळींहि तें सरळपणें नोंदलें गेलें नाहीं. डॉ. केतकर अमेरिकेंत जाऊन आलेले व जहाल पक्षी समजले जात. आधीं ज्ञानकोश व तो महाराष्ट्रीय दृष्टीनें लिहिलेला ज्ञानकोश तेव्हां त्यांत राजकारण असलेंच पाहिजे व फ्रान्समध्यें ज्याप्रमाणें डिडरोप्रभृति ज्ञानकोशकर्त्यांनीं एक नवीन विचारप्रणाली निर्माण करून फ्रान्समध्यें

राजकीय चळवळ केली व त्यामुळें त्यांस तुरुंगवासांत ठेवावें लागलें त्याप्रमाणें येथेंहि कांहीं होण्याचा संभव आहे काय, असा संशय त्यावेळीं कांहीं लोकांस आल्याशिवाय राहिला नाहीं व ही कंपनी नोंदावयाचें नाकारतां येईल काय असाहि प्रश्न उपस्थित केला गेल्याचें समजतें. पण प्रत्यक्ष तसें कांहीं न होतां कंपनी रीतसर नोंदली गेली. मॉरिस कॉलेजचे तत्कालीन प्रिन्सिपॉल यांनींहि मला एकदां महाराष्ट्रीय दृष्टीनें लिहिलेला ज्ञानकोश म्हणजे काय अशी पृच्छा केली होती.

मुंबई इलाखा मोठा असल्यामुळें येथें होणाऱ्या अनेक गोष्टींकडे राज्यकर्त्यांचें लक्ष्य जावयास वेळ लागतो पण मध्यप्रांत हा लहान असल्यामुळें व नागपूर शहर व त्यांतील पुढारलेला वर्ग त्यावेळीं फार मोठा नसल्यामुळें तेथें साध्या गोष्टीसहि प्रसिद्धि लवकर मिळत असे. तसेंच तेथील मोठमोठे गव्हर्नरापर्यंतचे अधिकारी व गांवांतील प्रतिष्ठित लोक यांमधील अंतरहि अल्प असे. मंडळ नोंदलें गेल्यावर मात्र तेथील सेक्रेटरीएटमधील लायब्ररी वगैरेमधील पुस्तकें किंवा इतर माहिती मिळणें फार सुलभतेनें घडून येऊं लागलें व सेन्सस-रिपोर्ट वगैरे अनेक संदर्भग्रंथ मध्यप्रांतसरकारनें आम्हांस मोफत पुरवले. मुंबईसरकारची मात्र याबाबतची वृत्ति अत्यंत कंजूषपणाची व उदासीन दिसून आली. उदाहरणार्थ, आम्हाला सर्व प्रांतिक सर-कारांकडून ब्रह्मदेशसुद्धां त्यांचे राज्यकारभाराचे वार्षिक अहवाल (Administrative Reports) भेट म्हणून येत असत. फक्त मुंबई सरकार मात्र पाठवीत नसे.

ज्ञानकोशाची मूळ योजना व प्रत्यक्ष त्याचें वर्तमानस्वरूप यांतहि बरेंच अंतर दिसून येईल. याचें कारण कार्यकर्त्यांच्या अपेक्षेप्रमाणें सर्वच गोष्टी प्रत्यक्षपणें कृतींत उतरतात असें नाहीं. परिस्थिती-

प्रमाणें त्यांत फेरफार करावेच लागतात. तसे ज्ञानकोशांत सर्वच बाबतींत त्याच्या बाह्यस्वरूपापासून अंतरंगापर्यंत करावे लागलेच. कितीतरी तयार केलेलें साहित्य अनुपयोजीत राहिलें व वेळोवेळीं बरेंचसें आयत्यावेळीं तयार करावें लागलें. इतर आनुषंगिक कार्याच्या कितीतरी कल्पना व योजना तशाच टाकून द्याव्या लागल्या. एक प्राथमिक कार्य म्हणून वाङ्मयसूचि मात्र तयार झाली. ती तडकाफडकी होऊन छापून निघाली म्हणूनच झाली. तैत्तिरीय संहितेची पदसूचि तयार होऊनहि ती प्रकाशांत येऊं शकली नाहीं. ज्ञानकोशानंतर सर्व मंडळी एकत्र राहून मराठी वाङ्मयक्षेत्रांत भरीव अशीं कार्यें करण्यासंबंधीं अनेक योजना, चर्चा, प्राथमिक पूर्व तयारी होऊनहि प्रत्यक्षांत कांहीं आलें नाहीं. अनेक वर्षें एकत्र राहिलेला कार्यकर्त्यांचा संच पांगला गेला. त्यांस एकत्र ठेवतां आलें नाहीं व ज्ञानकोशानंतर डॉ. केतकर यांनीं अंगावर घेतलेल्या कार्यांपैकीं एकहि कार्य पुढें प्रत्यक्ष पूर्ण झालें नाहीं किंवा त्यासंबंधीं त्यांस कांहीं निश्चित योजना करतां आली नाहीं

जी उद्यांविषयींची बेफिकीरवृत्ति ज्ञानकोशाच्या कार्यांत त्यांचें मनःस्वास्थ्य ठेवण्यास कारणीभूत झाली तीच कदाचित् त्यांच्या पुढील कार्यांत त्यांस स्थिरतेपासून दूर नेण्यास कारण झाली असावी. प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासाचे प्रथम प्रसिद्ध केलेले दोन उपखंड पुढें रद्द करण्यांत आले व पहिल्या भागाची निश्चित रूपरेखाहि लिहिलेली असावी असें वाटत नाहीं.

त्यांच्या महाराष्ट्रीय समाजापासून प्रथम जिमखान्यावर व पुढें छावणीमध्यें याप्रमाणें दूर राहणीमुळें त्यांचा सामाजिक संबंध विशेषसा कोणाजवळ राहिला नाहीं. राजकारणांत तर ते एकांडेच होते. त्यांच्या ओळखी पुष्कळ पण खास मित्र असा कोणी त्यांनीं

जोडलेला आढळत नाहीं. ज्ञानकोशांतील सहकारी तें कार्य पूर्ण होईपर्यंत त्यांस चिकटून तरी राहिले पण गुजराती ज्ञानकोशांतील लेखकवर्ग त्यांस तसा मिळाला नाहीं. त्यांपैकीं दोघांनीं त्यांच्यावर पगारबाकीकरितां फिर्यादी केल्या व एकानें तर त्यांच्यावर अट-केचा हुकूम मिळविला. त्यामुळें ते एकाकी झाले व त्यांच्या निधना-पूर्वी त्यांच्या आजाराची बातमी सुद्धां कोणास कळली नाहीं व अखेरीस त्यांचें दहन होण्याऐवजीं दफन होण्यामुळें त्यांची समाजा-पासून तुटकवृत्ति अढळ राहिली. पण या समाजापासून अलग राहण्याच्या वृत्तीमुळेंच कदाचित् त्यांस या समाजाचें दूर दृष्टीनें निरीक्षण करतां आलें. त्यांच्या स्वतःच्या विवाहामुळें समाजांतील भिन्नभिन्न घटकांतील विवाह, अमरावतीच्या त्यांच्या रहिवासामुळें वेश्या समाजाबद्दलची अनुकंपा अथवा सहानुभूति, परदेश गमनामुळें परदेशस्थ हिंदी समाजाबद्दलचे प्रश्न, अनेक जातींतल्या लोकांशीं खानपानादि संबंध आल्यामुळें जातिभेद व तन्मूलक विवाह यासंबंधीं भानगडींचे प्रश्न व या सर्वांचा उलगडा कसा करतां येईल हें कोडें, नवीन नवीन विचार, परिस्थितीमुळें राहणींत, सामाजिक संबंधांत वगैरे होणारे बदल व त्यांस अनुसरून नवीन आचार, नियम अथवा स्मृति, जातिभेदाऐवजीं लवचिक चातुर्वर्ण्याचें पुनरुज्जीवन केल्यास त्यापासून फायदे वगैरे अनेक सामाजिक गुंतागुंतीच्या प्रश्नांकडे त्यांचें लक्ष गेलें व परदेशांत चौकस बुद्धीनें केलेलें निरीक्षण व अभ्यास यांमुळें आलेली व्यापक व सर्वंकष दृष्टि यांच्या साहाय्यानें त्यांनीं या प्रश्नांची छाननी आपल्या निबंधांत व कादंबऱ्यांतून केली व आपल्या ग्रंथांतूनहि त्यांची सामाजिक अभ्यासविषयक दृष्टि मधून मधून एकसारखी नजरेस पडते. त्यांचें कार्य जें पुढें व्यक्तिनिष्ठ झालें तें संस्थानिष्ठ झालें असतें तर त्यांच्या हातून यापेक्षां पुष्कळच अधिक व उपयुक्त कार्य झालें असतें. असो.

या लेखसंग्रहामुळें त्यांचें ओझरतें दर्शन पुन्हां एकदां महाराष्ट्रास करून देण्याचें कार्य झालें तरी येवढेंच सध्यां पुष्कळ झालें. असें मानून व पुढेंमागें त्यांच्या कार्याची अधिक विस्तृत मीमांसा करण्याचा योग आल्यास तसें अवश्य करण्याचें आश्वासन देऊन ही प्रस्तावना सध्यां पूर्ण करितों.

यशवंत रामकृष्ण दाते

म.ग्रं.सं.ठाणे.



# डॉ. केतकरांचें सान्निध्य

## प्रथम दृष्टिक्षेप

## व्यक्तिपरिचय

दा. क्र. ६५४०

दक्षिण हैद्राबाद येथें येत्या मे महिन्यांत (१९३१) होणाऱ्या सोळाव्या महाराष्ट्र-साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून डॉ. केतकर यांची योजना झाली असल्यामुळें त्यांचा व त्यांच्या कार्याचा परिचय 'लोक-शिक्षणा'च्या वाचकवर्गास करून देण्याविषयीं संपादकानीं मला विनंति केली, त्यावेळीं मी थोडा बुचकळ्यांत पडलों. कारण, एक तर स्वतः-च्या प्रमुखत्वाखालीं संपादित झालेल्या महाराष्ट्रीय ज्ञानकोशामुळें व अलीकडे लिहिलेल्या एकदोन कादंबऱ्यामुळें डॉ. केतकर हे मराठी वाचकांच्या इतके परिचयाचे झाले आहेत कीं, त्यांचा नव्यानें परि-चय करून देण्याची फारशी आवश्यकता नाहीं. शिवाय परिचय कोणाचा करून द्यावयाचा, तर जे स्वतः आपल्या नांवाची जाहिरात जेणेंकरून होईल अशा चर्चेचा अथवा वादाचा एकहि प्रसंग कधीं वायां जाऊं द्यावयाचे नाहींत, एवढेंच नव्हे तर असा प्रसंग मुद्दाम स्वतःवर ओढवूनहि घेतील अशा गृहस्थांचा. तेव्हां त्यांची माहिती नाहीं असा मराठी वाचक मिळणें कठिणच. अर्थात् प्रसिद्धीला प्रसिद्धि कसली द्यावयाची ? तथापि कांहीं प्रसंग औपचारिक रीत्या साजरे करावयाचे असतात व प्रौढ मराठी वाङ्मयास वाहिलेल्या मासिकानें भावी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षासंबंधीं परिचयात्मक लेख लिहिणें हाहि एक असाच प्रसंग असल्यानें तो साजरा केला पाहिजे. दुसरें असें कीं, डॉ. केतकर व प्रस्तुत लेखक हे ज्ञानकोशाच्या आरंभा-पासून तों पूर्ण होईपर्यंत जवळजवळ बारा वर्षे एकत्र कार्य करीत

राहिलेले, आणि त्या कार्याचा गौरव म्हणजे पर्यायानें तत्संबंधी व्यक्तीचा गौरव असल्यानें तो त्यांतीलच एखाद्या व्यक्तीनें करणें म्हणजे "गुळाचा गणपति व गुळाचाच नैवेद्य" किंवा स्वतःच आपणाभोंवतीं दिवे ओवाळून घ्यावयाचे अशी स्थिति व्हावयाची. तथापि मित्रकार्य म्हणून प्रस्तुत लेख लिहिण्याचें मीं कबूल केलें.

डॉ. केतकर यांचें घराणें मूळचें कोंकणांतलें. दाभोळजवळील अंजनवेल हा त्यांचा गांव. येथें त्यांचे आजोबा पूर्वी हस्तलिखित पोथ्या विकण्याचा व्यवसाय करीत; व त्यामुळें त्यांचा जुन्या पिढींतील सुप्रसिद्ध प्रकाशक कै. माधव चंद्रोबा यांच्याशीं कांहीं संबंध आला होता. पूर्वी छापखान्याची सोय नसल्यामुळें जुने ग्रंथ हातांनीं लिहूनच त्यांच्या प्रति कराव्या लागत व असे ग्रंथ गाडींत घालून गांवोगांव विकीत हिंडावें लागे. हे ग्रंथ महाग असल्यामुळें पूर्वीच्या भिक्षुक वगैरे ब्राम्हणांस ते विकत घेण्याचें सामर्थ्य नसे. पण असा एखादा ग्रंथ विकणारा आला म्हणजे गांवांतील पाटील किंवा शेठसावकार असे ग्रंथ विकत घेऊन ब्राह्मणांस दान करीत. यांत दोन तीन कार्यें होत. एकतर ब्राह्मणांस ग्रंथ मिळत; दुसरें, श्रीमान् लोकांस ते दान केल्याचें पुण्य मिळे; व व्यापाऱ्याची विक्री होई. असो. डॉ. केतकर यांचे वडील मध्यप्रांतांत पोस्टखात्यांत नोकरीस होते; व ते नोकरीनिमित्त रायपुरास असतांना सन १८८४ मध्यें यांचा जन्म झाला.

डॉ. केतकर यांचें हायस्कूलचें शिक्षण उमरावती येथें झालें. त्यांचे एक वडील बंधु एम. ए. झाले होते; पण ते तरुणपणींच वारले. त्यांचे एक चुलते उमरावतीस वकील होते. डॉ. केतकर हे शाळेंत चलाख विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होते; व वऱ्हाडांत 'मराठी' या विषयास एक शिष्यवृत्ति असून तिची स्वतंत्र परीक्षा असे, तींत वर येऊन त्यांस ही शिष्यवृत्ति मिळाली होती. त्यांना लहानपणापासूनच वाच-

नाचा विशेष नाद असून अनेक विषयांवरचीं पुस्तकें वाचीत असल्यानें त्याचें ज्ञान बहुविध असे; व या गुणांमुळें त्यांस तेव्हांच 'एन्सायक्लोपीडिया' ऊर्फ 'ज्ञानकोश' म्हणत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्याचें उच्च शिक्षण मुंबईस विल्सन कॉलेजमध्यें झालें. परंतु कॉलेजमध्यें असतांना परीक्षेस नेमलेल्या पुस्तकांऐवजीं इतरच पुस्तकें वाचण्याकडे त्यांची अधिक प्रवृत्ति असल्यामुळें ते परीक्षेंत फारसे वर येत नसत. इंटरमीडिएट्च्या परीक्षेंत त्यास एकदां खो बसला व पुनः बी. ए. मध्येंहि अपयश आलें. तेव्हां येथील शिक्षण थांबवून ते १९०६ सालीं अमेरिकेंत गेले; व तेथें एम. ए. ची परीक्षा देऊन कॉर्नेल् युनिव्हर्सिटीमधून पीएच्. डी. ची पदवी त्यांनीं मिळविली. ही शेवटची परीक्षाहि इतर विषयांकडे लक्ष दिल्यामुळें त्यांना दोनदां द्यावी लागली. परंतु त्यांनीं अमेरिकेंत असतांना अनेक ग्रंथाचें अवलोकन केलें. त्यांचा बराचसा वेळ ग्रंथालयातच जात असे. समाजशास्त्र व अर्थशास्त्र या विषयांचाच त्यांनीं जरी विशेष अभ्यास केला होता, तरी समाजशास्त्राच्या पूर्ण अध्ययनास इतर अनेक आनुषंगिक शास्त्रांच्या अभ्यासाची जोड देणें इष्ट वाटल्यामुळें त्यांनीं भूस्तरशास्त्र, जीविशास्त्र इत्यादि अनेक शास्त्रांवरील प्रोफेसरांचीं व्याख्यानें ऐकलीं. शेवटीं अमेरिकेंतील अभ्यासक्रम १९११ च्या आरंभीं संपविल्यावर ते इंग्लंडला गेले; व तेथें सुमारें वर्ष दीडवर्ष राहून नंतर हिंदुस्थानास परत आले.

येथें आल्यावर त्यांनीं सुमारें दोनतीन वर्षें सर्व हिंदुस्थानभर व कांहीं दिवस सिंहलद्वीपांत प्रवास केला आणि तत्कालीन राजकीय व सामाजिक स्थितीचें बारकाईनें अवलोकन केलें. मध्यंतरीं १९१३-१४ सालीं एक वर्ष ते कलकत्ता युनिव्हर्सिटीमध्यें राजनीतिशास्त्र व अर्थशास्त्र या विषयांचे व्याख्याते होते. नंतर नागपुरास येऊन त्यांनीं

'महाराष्ट्रीय ज्ञानकोश'ची योजना तयार केली. १९१६ मध्यें ह्या कार्यास प्रारंभ तेथें केला, पण सुमारें बारा वर्षांनीं तें कार्य पुणें येथें समाप्त झालें; व आतां गुजराथी ज्ञानकोश, प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास इत्यादि कार्यें त्यांनीं अंगावर घेतलीं आहेत. डॉ. केतकर इंग्लंडमध्यें असतांना तेथें 'नो बॉडीज क्लब' या नांवाचा एक क्लब होता त्याचे ते सेक्रेटरी होते. तेथें मि. कोहन आणि त्यांच्या दोन मुली येत असत. यामुळें त्यांची व कु. ईडिथ कोहन यांची ओळख झाली व पुढें तो परिचय वाढत गेला. कु. कोहन यांना हिंदुस्थानाबद्दल विशेष कौतुक व आदर वाटत असे म्हणून त्या हिंदी विद्यार्थ्यांशीं ओळख करून घेत; व त्यांनीं हिंदुस्थानाबद्दल बरेंच वाङ्मय वाचलें होतें. त्यांनीं लंडन येथील ओरिएंटल स्कूलमध्यें मराठीचा अभ्यास करून एक परीक्षाहि दिली होती. त्यांस शाकुंतल नाटक विशेष आवडे व त्यांतील कण्वाप्रमाणेंच अद्यापि हिंदुस्थानांत ऋषी असतील अशी त्यांची समजूत असे! डॉ. केतकर यांनीं ज्ञानकोशाचें कार्य सुरू केल्यावर डॉ. विंटरनिट्झ यांचा 'भारतीय वाङ्मयाचा इतिहास' या जर्मन ग्रंथाचें भाषांतर करण्याचें काम कु. कोहन यांनीं पत्करलें. त्याचे हप्ते नियमितपणें इंग्लंडाहून हिंदुस्थानांत येत. मध्यंतरीं लढाई चालू असल्यामुळें १९१९ पर्यंत त्यांस हिंदुस्थानांत येण्यास परवाना मिळाला नाहीं. पुढें १९१९ च्या डिसेंबरमध्यें त्या ज्ञानकोशमंडळाच्या संपादकवर्गांत काम करण्यासाठीं म्हणून मंडळाच्या खर्चानें हिंदुस्थानांत आल्या; व येथें आल्यावर सहा महिनेपर्यंत त्यांनीं मंडळांत नोकरी केली. पुढें डॉ. केतकर यांच्याशीं त्यांचा विवाह झाला; पण तत्पूर्वीं त्यांनीं व्रात्यस्तोमविधिपूर्वक हिंदुधर्माची दीक्षा घेतली होती. डॉ. केतकर यांस या विवाहापासून कांहीं अपत्य झालें नाहीं. परंतु त्यांनीं दोन अनाथ हिंदु मुलें बाळ-

गलीं आहेत व त्यांचें संगोपन ते स्वतःच्या अपत्यांप्रमाणें करीत आहेत.

डॉ. केतकर विल्सन कॉलेजमध्यें शिकत असतांनाच ते व श्री. बाळकृष्ण संतुराम गडकरी यांनीं मिळून 'महाराष्ट्र वाग्विलास' नांवाचें मासिक सुरू केलें होतें; व तें कांहीं वर्षें चालून हे अमेरिकेंत निघून गेल्यावर बंद पडलें. अमेरिकेंत त्यांनीं डॉक्टरची पदवी मिळविण्याकरितां मनुस्मृतीमधील 'जाति-व्यवस्था' या विषयावर निबंध लिहिला होता; व यासच त्यांनीं 'हिस्टरी ऑफ कास्ट'-प्रथम ग्रंथ असें नांव ठेविलें. याच निबंधावर त्यांना डॉक्टरची पदवी मिळाली; परंतु पहिल्या वर्षीं परीक्षा घेतली तेव्हां परीक्षकांच्या मतें त्यांचें इंग्रजी व फ्रेंच भाषांचें ज्ञान अपुरें होतें म्हणून त्यावेळीं त्यांस पदवीकरितां पसंत करण्यांत आलें नाहीं. याबद्दल त्यांनीं परीक्षकांकडे एक लांबलचक पत्र पाठवून आपलें पुढील कार्य हिंदुस्थानांत मराठी भाषेमध्यें व्हावयाचें असल्यामुळें इंग्रजी भाषा लिहिण्याच्या ज्ञानाची आपणांस विशेष आवश्यकता नसून विषयाच्या ज्ञानावरूनच पदवी मिळावी असें लिहिलें होतें; परंतु त्यांस एक वर्ष थांबावें लागलेंच. मात्र तें वर्ष त्यांनीं अधिक वाचन व निरीक्षण करण्यांत खर्च केल्यामुळें त्यांचा फायदाच झाला. त्या-नंतर त्यांनीं 'हिस्टरी ऑफ् कास्ट' चा दुसरा ग्रंथ इंग्लंडमध्यें प्रसिद्ध केला. या दोन ग्रंथांतील कांहीं विचार सारांशरूपानें ज्ञानकोशाच्या 'हिंदुस्थान आणि जग' या विभागांत अंतर्भूत केलेले आहेत. हिंदुस्थानांत आल्यावर त्यांनीं 'इंडियन इकॉनॉमिक्स' व 'हिंदु लॉ' यावर दोन लहान लहान पुस्तकें इंग्रजींत लिहिलीं. त्यांपैकीं 'हिंदु लॉ' हें पुस्तक कलकत्ता युनिव्हर्सिटींत चालू असलेल्या टागोर व्याख्यानमालेंत व्याख्यात्याची जागा मिळावी म्हणून नमुन्याकरितां

तयार केलेल्या व्याख्यानांचा संग्रह आहे. त्यांनीं जो हिंदुस्थानांत व सिंहलद्वीपांत प्रवास केला त्यावेळीं केलेल्या निरीक्षणावरून 'हिंदु-समाजाची पुनर्घटना' म्हणून एक लेखमाला जुन्या 'लोकशिक्षणां'त प्रसिद्ध केली होती. तसेंच पुणें वगैरे ठिकाणीं त्यांनीं दिलेलीं जाति-भेद वगैरे विषयावरील व्याख्यानें सारांशरूपानें केसरींत व पुढें 'संकीर्ण लेख' म्हणून एकत्र स्वरूपांत प्रसिद्ध करण्यांत आलीं. या व्याख्यानांमुळें व विशेषतः त्यांत केलेल्या बुद्धावरील टीकेमुळें त्यांची व धर्मानंद कोशांबी यांची बरीच झुंपली होती. त्याचवेळीं 'लोक-शिक्षणां'त लिहिलेल्या 'स्वार्थत्यागाची मिमांसा' नांवाच्या लेखा-नेंहि येथील कांहीं संस्थांत मोठी खळबळ उडवून दिली होती. तसेंच 'उत्तर अमेरिकेंतील वसंतकाल' म्हणून 'गोविंदपौत्र' या टोपण नांवाखालीं लिहिलेलें एक काव्य त्यांनीं याच सुमारास प्रसिद्ध केलें.

ज्ञानकोशाचें काम आरंभिल्यावर त्यांस इतर कांहीं लिहिण्यास फारशी फुरसत मिळाली नाहीं; एवढेंच नव्हे तर पूर्वीं कांहीं लिहिलेलीं अर्धवट टांचणेंहि तशींच पडून राहिलीं. त्यापैकीं कांहींचा उपयोग मधून मधून ज्ञानकोशांत करण्यांत आला अशाच टांचणांपैकीं 'गोंडवनांतील प्रियंवदा' ही कादंबरी होय. ही कादंबरी त्यांनीं नागपुरास प्लेग अस-ल्यामुळें उमरावतीस असतांना फुरसतीच्या वेळीं लिहिली. त्यांचे मित्र रा. बाळकृष्ण संतुराम गडकरी यांनीं ती वाचून 'तुम्ही कधींच कादंबरीकार होऊं शकणार नाहीं,' असा तिजवर अभिप्राय दिला. पुढें तें बाड तसेंच अनेक वर्षे पडून राहिलें. नंतर 'विद्यासेवक' मासिक सुरू झाल्यावर त्यांत शेवटचीं प्रकरणें कशीं तरी पुरीं करून ती कादंबरी छापण्यांत आली; आणि पुढें 'परागंदा' व 'आशावादी' या कादंबऱ्या लिहून काढण्यांत आल्या. याच सुमारास कोशाचें

कार्य पुरें झालें व 'ज्ञानकोशाचा इतिहास' लिहिला गेला. ज्ञानकोशाचे वर्णानुक्रमानें एकवीस भाग झाल्यावर सूचीचा बाविसावा वगळून तेविसावा हिंदुस्थान–खंड हा छापण्यांत आला; व त्याच धर्तीवर एक महाराष्ट्र विभाग संकल्पित असून, त्यांतील आरंभींच्या प्रकरणांत महाराष्ट्राचा इतिहास द्यावयाचा होता. अर्थात् त्याची पूर्व तयारी करीत असतां **'महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास'** लिहिण्याची कल्पना त्यांस येऊन ज्ञानकोशानंतर तेंच काम मोठ्या प्रमाणावर करण्याचें त्यांनीं ठरविलें. गुजराथी ज्ञानकोशाचें काम यापूर्वीच सुरू झालें होतें; व अशाच तऱ्हेनें कानडी, हिंदी वगैरे भाषांत ज्ञानकोश करण्याची त्यांची मनीषा आहे.

डॉ. केतकरांची सर्वांत महत्त्वाची कामगिरी म्हणजे **'महाराष्ट्रीय ज्ञानकोश'** हींच होय. त्याची कल्पना त्यांस कशी सुचली, त्यांत अडचणी काय आल्या, तो शेवटास कसा गेला व त्यांत त्यांस कोणाचें किती साहाय्य झालें वगैरे गोष्टी त्यांनीं स्वतःच ज्ञानकोशाच्या इतिहासांत दिल्या आहेत. तेव्हां त्यासंबंधीं येथें लिहिण्याचें कारण नाहीं. 'ज्ञानकोश' संपल्यावर त्यांनीं लिहिलेल्या 'गांवसासू' व 'ब्राह्मणकन्या या कादंबऱ्या वाचकांपुढें नुकत्याच आल्या असून त्यांतील' नावीन्यपूर्ण विषयावर सध्या कांहीं ठिकाणीं चर्चा चालू आहे हें सांगणें नकोच.

आतां डॉ. केतकर यांच्या गुणावगुणांविषयीं सर्वसाधारणपणें लिहावयाचें म्हटलें तर पुष्कळच लिहितां येईल. परंतु या लेखांत तेवढा अवकाश नाहीं. डॉ. केतकर यांच्यामध्यें प्रामुख्यानें कोणाच्याहि नजरेस येणारा एक विशेष म्हणजे त्यांचें असाधारण निरीक्षण व कल्पकता. त्यांचा आयुष्यक्रम अत्यंत विविध प्रकारचा असून अनेक प्रकारचे प्रसंग त्यांनीं प्रत्यक्ष अनुभविले आहेत. विविध

स्वभावांच्या मनुष्यांशीं त्यांचें संघटन झालें आहे. इंग्लंड, अमेरिका, हिंदुस्थान, सिलोन वगैरे ठिकाणीं प्रवास केल्यामुळें अनेक प्रकारचे लोक व चालीरीती यांचें त्यांस निरीक्षण करतां आलें व या गोष्टी त्यांनीं आपल्या दृढ स्मरणशक्तीनें मनांत चांगल्या सांठवून ठेविल्या आहेत. शिवाय त्यांचें वाचनहि विविध असून अनेक विषयांशीं त्यांचा परिचय असल्यामुळें कोणत्याहि विषयावर चर्चा करण्यास किंवा विचार प्रदर्शित करण्यास त्यांस अडचण पडत नाहीं. परंतु या सर्व गोष्टींचा परिणाम होऊनच जणूं काय त्यांस गतानुगतिक-त्वाचा अगदीं कंटाळा असून त्यांच्या प्रत्येक गोष्टींत नावीन्य व विलक्षणपणा पाहणाऱ्यास दृष्टीस पडतो; व यासच अनेक लोक विक्षिप्तपणा असेंहि म्हणतात. त्यांच्या कांहीं कॉलेजच्या सहाध्या-यांची व माझी गांठ पडली असतां तेहि मला असेंच सांगत कीं, डॉ. केतकर हे कॉलेजमध्यें असत तेव्हांपासून त्यांच्यामध्यें हा विक्षिप्तपणा असे; व असले कांहीं प्रसंगहि ते वर्णन करीत. हिंदुस्थानांत असतां त्यांचा एकदां प्रेमभंगहि झाला होता असें त्यांच्या कांहीं अप्रसिद्ध कवितांवरून दिसतें.

अमेरिकेंत ते स्वखर्चानें गेले होते; व त्या जाण्याच्या मुळाशीं त्यांचा जहाल देशभक्तपणा होता असें त्यावेळचे त्यांचे कांहीं मित्र सांगतात. पण तिकडे गेल्यावर त्यांचीं मतें बदललीं व येथें आल्यावर ते फारसे राजकारणांत पडलेच नाहींत. मात्र येथें आल्यावर त्यांच्या बरोबर कांहीं दिवस सरकारी 'शरीरसंरक्षक' असे. अमेरिकेंत शिक्षणाकरितां त्यांना स्वतः पैसा मिळवावा लागे व तो मिळविण्या-करितां त्यांनीं अनेक प्रकारचीं कामें केलीं. त्यांत विक्रयकाराचेंहि काम कांहीं दिवस केलें. अशा प्रकारचा एक उद्योग म्हणजे 'इंटर-नॅशनल एन्सायक्लोपीडिया' नामक ग्रंथास ग्राहक मिळविणें हा होय.

त्यांत त्यांस हा- अनुभव आला कीं, पुस्तकें खपविण्यापेक्षां पायमोजे वगैरेसारख्या नित्योपयोगी जिनसा विकणेंच अधिक किफायतशीर आहे. शेतावर काम केल्याबद्दल तेथील शेतकरी काम करणाऱ्याला आग्रहानें पोटभर खाऊं घालून भाकरीला लोणी खूप लावण्याबद्दल कसा आग्रह करीत याचेंहि वर्णन त्यांनीं कांहीं वेळां मोठें मौजेचें केलें आहे. कांहीं दिवस त्यांस श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांनीं मदत केली होती; व हिंदुस्थानांत आल्यावर त्यांनीं बडोद्यास काम करावें अशीहि त्यांची अपेक्षा होती. पण डॉ. केतकरांनीं इंग्रजीभाषेंत प्रोफेसराचें काम करण्यास आपण तयार नसून मराठी भाषेच्या दृष्टीनें एखादी युनिव्हर्सिटी वगैरे काढण्याचें काम असल्यास आपण तें करूं असें महाराजांस कळविलें असेंहि मीं ऐकलें आहे. तरीसुद्धां अमेरिकेंत त्यांचा आयुष्यक्रम बरा गेला. पण इंग्लंडमध्यें त्यांनीं घालविलेला काळ सांपत्तिकदृष्ट्या तितका समृद्धीचा नव्हता. तेथें, त्यांनीं लिहिलेल्या 'हिस्टरी ऑफ कास्टच्या दुसऱ्या ग्रंथाबद्दल प्रकाशकाकडून मिळणारे कांहीं पैसे व 'अर्थानियम'सारख्या नियतकालिकांकरितां पुस्तकांवर अभिप्राय लिहिण्याबद्दल वगैरे मिळणारे पैसे यांवर त्यांनीं गुजारा केला. त्यामुळें लंडनमध्यें स्वस्तांत भोजन कोठें करतां येतें याची त्यांनीं बरीच माहिती मिळविली होती; व केव्हां केव्हां बसूला पैसा खर्च करण्याऐवजीं संध्याकाळची सहल करण्यांत मजा मारली होती! हिंदुस्थानांत आल्यावर दोन तीन वर्षें प्रवासांत व कलकत्त्यास गेलीं; आणि ज्ञानकोशमंडळाच्या सांपत्तिक स्थितीचा पाढा त्यांनीं त्याच्या इतिहासांत वाचलाच आहे.

डॉ. केतकर यांच्या अभ्यासाचा मुख्य विषय समाजशास्त्र असल्यामुळें ते अनेक गोष्टींकडे त्यांचा समाजावर काय परिणाम होईल याच दृष्टीनें पाहत; व त्यांचें आजपर्यंतचें लेखनहि त्याच विषयावर

व तदनुषंगिकच झालें आहे. वेदांचा अभ्यास करतांनाहि इतर गोष्टींपेक्षां त्यावेळच्या समाजांत जे निरनिराळे थर असत, त्यांतील परस्परसंबंधांकडे त्यांची अधिक दृष्टि असे. म्हणून निरनिराळ्या शाखेचे पुरोहित, त्यांची आपापसांतील स्पर्धा व तज्जन्य एकीकरणाचे किंवा एकमेकांचा पाडाव करण्याचे प्रयत्न यासंबंधीं चर्चा करणें त्यांस विशेष आवडत असे. तसेंच वाङ्मय, कला, शास्त्रें, नीतिनियम वगैरेंची उत्पत्ति, त्यांची वाढ, व त्यांतील फेरबदल हीं समाजाच्या निरनिराळ्या अवस्थांमध्यें कशीं घडून येतात, भिन्न संस्कृतींचे समाज एकत्र आले असतां त्यांचे एकमेकांवर आघात प्रत्याघात कसे होतात व त्यांचा परिणाम पुढील लोकांवर कसा होतो यासंबंधीं ते नेहमीं संभाषण करीत; आणि त्यांस संभाषणाची ऊर्फ गप्पा मारण्याची हौस फारच असल्यामुळें ते तासचे तास बोलत बसत. किंबहुना कांहीं वेळां गिऱ्हाईक मिळविण्याकरितां गेले असतां ते एखाद्या ठिकाणीं बसल्यावर जेवणाची फिकीर न बाळगतां असेच गप्पा मारीत बसून तेथेंच चहावर उरकून घेत किंवा विशेष ओळख असल्यास तेथेंच जेवणहि आटपून घेत असत. त्यांचें एकंदर लेखनसुद्धां सामाजिक विषयांवरच विशेष आहे व त्यांनीं अनेक सामाजिक प्रश्न वाचकांपुढें चर्चेकरितां ठेवले आहेत. ज्ञान-कोशांतदेखील त्यांचें विशेष लेखन कोठें असेल तर प्रस्तावना-खंडांतील 'हिंदुस्थान आणि जग' या पहिल्या ग्रंथांतील अखेरच्या प्रकरणांत. त्यांनीं ज्या कादंबऱ्या लिहिल्या त्यांतहि त्यांनीं हेच प्रश्न बहुधा पुढें मांडले आहेत. 'परागंदा', 'गांवसासू' लिहितांना त्यांनीं आपल्या अमेरिकेंतील व इंग्लंडमधील वास्तव्याचा उपयोग करून घेतला आहे, तर 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीस पुण्यांतीलच एक प्रसंग सूचक झाला आहे.

डॉ. केतकरांचा स्वभाव त्यांच्या लेखांतदेखील स्पष्टपणें दिसून येतो. त्यांची विषय मांडण्याची पद्धति अगदीं दुनियेवेगळी व भाषा तर सर्व नियमांस सोडून. त्यांस प्रथम इंग्रजींतच विचार करण्याची संवय असल्यामुळें कल्पना व वाक्यें इंग्रजी भाषेंत सुचतात व त्यांचें मराठींत भाषांतर करून ते लिहितात. त्यांचीं अनेक वाक्यें मराठी टाइपांत छापलेल्या इंग्रजी वाक्यांप्रमाणें भासतात. ते केव्हां केव्हां तोंडानें मजकूर सांगून दुसऱ्याकडून लिहवितात, अशा वेळीं भाषा थोडीशी साधी व बरी येते. पण लिहितांना सोपे शब्द सुचण्याऐवजीं त्यांस इंग्रजी शब्दांस मराठी प्रतिशब्द संस्कृत किंवा तद्भव असे सुचतात. त्यामुळें भाषेस अधिक बोजडपणा येतो व त्यांचें बहुतेक लिखाण लेखणींतून थेट छापखान्यांत जातें. किंबहुना त्यांचें म्हणणें असें आहे कीं, पुस्तकाचीं दोन चार पानें झाल्याबरोबर तें पूर्ण करण्याच्या आधीं छापखान्यांत द्यावें म्हणजे लवकर लिहून होतें! अर्थात् यामुळें लेखनावर पुनः संस्कार मुळींच होत नाहीं. कित्येक वेळां तर कांहीं मजकुराचें मूळ, मूळच्या प्रतींत असण्याऐवजीं छापखान्याच्या पेज-प्रुफावर असतें! भाषेच्या बोजडपणाला दुसरें एक कारण म्हटलें म्हणजे विचारांची डोक्यांत इतकी गर्दी होते कीं, पहिलें वाक्य पूर्ण होण्यापूर्वींच पुढील वाक्यें तेथें गोंधळ करूं लागतात. त्यांचें व्याख्यान ऐकणाऱ्यास हा अनुभव अनेक वेळां आला असेल. संभाषणांतदेखील मधून मधून हीच गोष्ट दृष्टीस पडते.

तसेंच विचार व्यक्त करतांना आपल्या वाचकांस काय वाटेल, आपण ज्या समाजाबद्दल लिहीत आहों त्याला काय वाटेल याचीहि ते कधीं पर्वा करतात असें दिसत नाहीं. एखादी गोष्ट सत्य असली तरी ती न टोंचणाऱ्या भाषेंत मांडली असतां श्रोत्याचा किंवा वाचकाचा आपल्यावर तितका रोष होत नाहीं. पण या

गोष्टीबद्दल ते अगदीं बेफिकीर असतात. एका व्याख्यानाच्या वेळीं मीं त्यांस याबद्दल विचारलें असतां ते म्हणाले कीं, आपला समाज ( त्यावेळीं ब्राह्मण समाजाबद्दल व्याख्यान होतें ) इतका गाढ निजला आहे कीं, त्याला चांगला डंवचल्याशिवाय तो जागाच होणार नाहीं; त्यावर असेच कोरडे ओढले पाहिजेत ! यामुळें त्यांचें लिखाण पुष्कळ लोकांना अप्रिय वाटे; पण त्याची काळजी ते स्वत: कधीं करीत नसत. त्यांनीं समाजापुढें मांडलेले अनेक प्रश्न विचार करण्याजोगे असून ते जर यापेक्षां चांगल्या भाषेंत खुलवून व वाचकांस आपल्या-बरोबर घेऊन चालल्याप्रमाणें त्यांनीं मांडले असते, आणि समाजाच्या प्रचलित भावना विशेष न दुखवितां हलक्या हातानें कुशल शस्त्र-वैद्याप्रमाणें रोगग्रस्त अवयवावर शस्त्रक्रिया केली असती तर त्यांचे ग्रंथ लोकादरास अधिक पात्र होऊन अधिक कार्यक्षमहि झाले असते.

मिसेस् केतकर यांस हिंदु करून घेण्यांत डॉ. केतकर यांचा हिंदु धर्माचा अभिमान दृष्टीस पडतो; व आरंभीं आरंभीं शीलवतीबाईचा पोषाख व राहणी यावरून त्या हिंदु समाजांत मिसळून जातील अशी लोकांची कल्पना झाली होती. किंबहुना हिंदु समाजांत राहून आपण कांहीं शैक्षणिक किंवा सामाजिक कार्य करावें अशी त्यांची प्रथम इच्छा दिसत होती. या दृष्टीनें त्यांनीं एकदां येथील म्युनिसि-पालिटीच्या मुलींच्या शाळांची पाहणीहि केली होती; व डेक्कन जिमखान्यावर लहान मुलांकरितां शाळा काढण्याची कल्पना निघाली असतां त्यांत काम करण्याची त्यांनीं तयारीहि दर्शविली होती. पण तसें प्रत्यक्ष कोणतेंहि कार्य त्यांच्या हातून झालें नाहीं; उलट त्या स्वत: हिंदु समाजांत मिसळून जाण्याऐवजीं डॉ. केतकरच जवळ जवळ हिंदु समाजापासून अलग झाले ! आणि ज्या राष्ट्रीय पोषा-खाचा ते पूर्वीं मोठ्या गौरवानें उल्लेख करून पुणेरी पगडी व जोडा

यांचा प्रसार सर्वत्र झाला पाहिजे व तीं आपल्या राष्ट्रीय पोषाखाचीं निदर्शक आहेत असें प्रतिपादीत त्यालाच त्यांनीं अजीवात फांटा दिला; आणि पत्नीला हिंदु वळग देण्याऐवजीं स्वतःच गांवठी साहेबांच्या वळणावर गेले ! पुढें तर डेक्कन् जिमखान्यावरील स्वतःचा बंगला सोडून त्यांस छावणींत (कँपमध्यें) राहणें अधिक सोईस्कर वाटूं लागलें. मिसेस् केतकर यांनीं 'स्त्रीकर्मसदन' म्हणून स्त्रियांस काम करतां येईल असें एक शिवलेल्या कपड्यांचें दुकान काढलें होतें; पण तेंहि कांहीं महिन्यांतच नुकसान सोसून बंद करावें लागलें.

डॉ. केतकरांनीं ज्या अनेक योजना स्वतःशीं केल्या किंवा लोकांपुढें ठेवल्या त्यांतील 'ज्ञानकोश' एवढाच आतांपर्यंत पार पडला आहे. ज्ञानकोश-मंडळातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या 'विद्यासेवका'चें स्वागतहि महाराष्ट्रानें चांगलें केलें; व तें मासिक लवकरच पुढें येऊन चिरस्थायी होण्यासारखी त्याची सांपत्तिक स्थिति होती. डॉ. केतकर यांच्या तीन कादंबऱ्या, 'महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण' व 'निःशस्त्रांचें राजकारण' हे ग्रंथ यांतूनच प्रसिद्ध झाले. परंतु ज्ञानकोश पूर्ण झाल्यावर मध्यंतरीं जी घडामोड झाली तींत त्यास विराम द्यावा लागला. त्यांनीं तें पुनः सुरू करण्याचें जाहीर केलें आहे, पण निघेल तेव्हां खरें. बाकीच्या गोष्टींची लोकांस फारशी आठवणहि राहाणार नाहीं. त्यांनीं विवाह होण्यापूर्वी एक 'चातुर्वर्ण्यसंरक्षण-पीठ' म्हणून योजना छापून काढली होती आणि आपल्या प्रमुख-त्वाखालीं एक संस्था स्थापन करण्याचा बेत जाहीर केला होता. पण त्यांच्या लग्नानंतर स्वतःच्या किंवा स्वतःच्या मुलांच्याच चातुर्वर्ण्यांतील स्थानाचा संशय उत्पन्न झाल्यामुळें असो, किंवा इतर कांहीं कारणा-मुळें असो, ती योजना कागदावरच राहिली. तसेंच, ज्ञानकोशाला पैशाचें साहाय्य करण्याकरितां व परदेशाशीं व्यापार करण्याकरितां

' केतकर्स बँक अँड एजन्सी लिमिटेड ' म्हणून त्यांनीं एक खाजगी कंपनी नागपुरास काढली होती. पण तिलाहि आरंभींच्या भागीदारांशिवाय नंतर कोणी भागीदार मिळाला नाहीं व पुण्यास आल्यावर लवकरच तिचें विसर्जन करण्यांत आलें. डॉ. केतकर मधून मधून राजकारणांतहि ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न करीत. अशापैकीं त्यांची एक चळवळ म्हणजे 'स्वयंनिर्णय-संघ' नांवाची एक लिमिटेड कंपनी काढून स्वराज्य मिळवावयाचें. ही कल्पना धरून ' विद्यासेवकां 'त त्यांनीं एक लेखमाला लिहिली व तीच पुढें ' निःशस्त्रांचें राजकारण ' म्हणून पुस्तकरूपानें प्रसिद्ध केली. या पुस्तकाच्या ९००० प्रती काढल्या होत्या; व हीं पुस्तकें विकून निर्वाह करणारे प्रचारक तयार करून त्यांचेमार्फत चळवळ चालवावयाचा त्यांचा बेत होता. पण निम्या किंमतीसहि हीं पुस्तकें कोणी विकत घेईना व अखेरीस ती योजनाहि मावळली. शेवटीं पुस्तकांचे गठ्ठे आम्हांला पगारापैकीं रकमेकरितां जे ग्रंथ देण्यांत आले त्यांत आमच्या घरीं येऊन अजून पडले आहेत! ज्ञानकोशानंतर काय काम करावयाचें याबद्दल जवळ जवळ अखेरपर्यंत डॉ. केतकर यांच्या मनाचा निश्चय झाला नव्हता. मध्यंतरीं ' **पुणें समाचार** ' नांवाचें दैनिक काढून तें चालविण्याचा त्यांनीं कांहीं महिने प्रयत्न करून पाहिला; व प्रत्येक पुणेंकरास तें वाचावयास लावण्याची प्रतिज्ञा त्यांनीं त्याच्या मुखपृष्ठावर जाहीर केली. परंतु ती लवकरच फोल ठरली. ' कथामंदिर ' मासिक व ' वैदिक-वचन-संग्रह ' अशींहि कामें त्यांनीं जाहीर केलीं होतीं. पण तींहि पुढें त्यांनीं अंगावर घेतलीं नाहींत व सध्यां चालविलेलें ' **प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासा** 'चें काम कसें सुचलें तें वर दिलेंच आहे. तें देखील पुरें होण्यास त्यांस अपेक्षेपेक्षां फारच अधिक अवधि लागेल असें दिसून आलें आहे.

तथापि डॉ. केतकर हे प्रत्येक गोष्टींत मोठे आशावादी असतात. त्यांचा आत्मविश्वास दांडगा आहे व ते उद्यां काय होईल याची काळजी करतांना दिसले नाहींत. 'ज्ञानकोश' तयार करतांना अनेक अडचणी आल्या. डिरेक्टर व इतर मंडळी यांच्याशीं विरोध येऊन त्यांच्या हातांतील सत्ता काढून घेण्याचे प्रयत्न करण्यांत आले. सांपत्तिक अडचण तर नेहमींच असे. पण त्यांतूनहि ते आपल्या आत्मविश्वासाच्या बळावर निभावून गेले. कोणत्याहि कामांत प्रत्यक्ष काम करणाऱ्या माणसासच अधिक सहानुभूति मिळते आणि आपण सपाटून काम केलें तर लोक आपणांवर विश्वास टाकतील व आपणांस पैसाहि पाहिजे तितका मिळेल असें त्यांचें म्हणणें असे. त्याप्रमाणें आतांपर्यंतच्या कामास आम्हांस जरी भरपूर नसला तरी कामापुरता पैसा वेळोवेळीं मिळतहि गेला; व म्हणूनच ज्ञानकोशासारखा प्रचंड ग्रंथ बाहेर पडला. महाराष्ट्रामध्यें, विशेषतः मध्यमवर्गांत कार्याची जाणीव जास्त असून त्याच्या अभिरुचि अधिक संस्कृत आहेत व त्याच्याच बळावर महाराष्ट्रांतील अनेक लहानमोठीं कार्यें होत आहेत.

सारांश, डॉ. केतकर हे चालू पिढींतील एक असाधारण व कर्ते पुरुष होत. व्यापक बुद्धिमत्ता व शोधकता, दृढ व्यासंग व कल्पकता, थोर आकांक्षा व पराक्रमशीलता हे त्यांचे गुण केव्हांहि वाखाणण्यासारखे आहेत. आणि ह्या गुणसमृद्धीचा उपयोग नेहमीप्रमाणें राजसेवेंत न करतां स्वतंत्र कार्यक्षेत्र निर्माण करून मराठी वाङ्मयाच्या उन्नतीकडे त्यांनीं करून दिला हें त्यांचें वैशिष्ट्य होय. वरील असाधारण गुणांबरोबर कांहीं चमत्कारिक आचारविचार व स्वभावविशेष त्यांचेठायीं आहेत यांत शंका नाहीं; व त्यामुळें त्यांनीं कित्येकांचें शत्रुत्व संपादून आपणांस विक्षिप्तहि म्हणविलें

आहे. तथापि त्यांच्या आतांपर्यंतच्या कामगिरीचा आढावा घेतां त्यांनीं केलेलें वैयक्तिक व संघटित वाङ्मयकार्य आणि त्यांनीं दाखविलेली धडाडी हीं एकंदरींत असाधारण होत, ही गोष्ट प्रांजलपणें कबूल केली पाहिजे. शिवाय अद्यापि ते पन्नाशीच्याहि अलीकडेच असून त्यांची उमेद व कर्तृत्व शाबूत आहेत हें विशेष आहे. अर्थात् अशा विद्वान् व कर्त्या पुरुषास यंदा महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षत्वाचा मान मिळत आहे याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. (लोकशिक्षण, एप्रिल १९३१)

# डॉ. केतकर विक्षिप्त होते का?

## दुसरा दृष्टिक्षेप

आज डॉ. केतकर यांची द्वितीय पुण्यतिथि आहे. ते ता. १० एप्रिल १९३७ या दिवशीं दिवंगत झाले. डॉ. केतकर यांची योग्यता महाराष्ट्रास अद्यापि कळलेली नाहीं. बहुतेकजण त्यांना विक्षिप्त म्हणूनच ओळखतात. तेव्हां आजच्या भाषणांत ते 'विक्षिप्त' कसे व कां होते याची माहिती मी आपणांस देणार आहें.

डॉ. केतकर खरोखरीच विक्षिप्त होते का असाहि कोणी जाडा विद्वान् प्रश्न करील. कारण, अविचारी, मूर्ख माणूस जसा विक्षिप्त-पणें वागतो, तसाच दीर्घ अभ्यासानें ज्यानें आपली मतें ठाम बनविलीं आहेत असा एखादा समाजसुधारक सुद्धां वागतांना दिसतो. रूढ शिष्टाचार व संप्रदाय जो पाळत नाहीं, जो उघडपणें, भररस्त्यांत सर्व लोकांसमक्ष या संप्रदायाला गुंडाळून ठेवून मनसोक्त वागतो, तो विक्षिप्त असेंच नाहीं का? या दृष्टीनें पाहिल्यास डॉ. केतकर चांगलेच विक्षिप्त ठरतील. लहानपणापासून ते स्वतंत्रपणें वागत. शिक्षकांना भलतेच प्रश्न विचारीत. ते घरांतून पळून पण गेले होते. मुंबईंत विल्सन कॉलेजांत शिकत असतांनाच त्यांनीं "महाराष्ट्र वाग्विलास" हें वाङ्मय–मासिक सुरू केलें व ठराविक पुस्तकें घोकून परीक्षा पास होणें नको म्हणून अमेरिका गांठली. पण तेथें राहण्यास-शिकण्यास पैसे कोठें होते? तेव्हां दलाली, कारखान्यां-तून हलकी मजुरी, श्रीमंत स्नेह्यांचा बाजारहाट करून त्या पतीवर आपली उधारी ठेवणें इत्यादि अनेक लटपटी त्यांना कराव्या लागल्या. पुष्कळ दिवस एक डालरहि खिशांत नसतांना ते न्यूयॉर्कसारख्या शहरांतून हिंडत. याच वृत्तींत ते विद्यापीठाच्या लायब्ररींत रात्रं-दिवस पुष्कळदां वाचत बसत. त्यांचें हें दीर्घ वाचन त्यांना पुढें

जन्मभर पुरलें. कोणाला कधीं शिळें वाटलें नाहीं. अमेरिकेंतल्या अभ्यासानें आणि त्या समाजाशीं झालेल्या परिचयानें त्यांची मूळची "विक्षिप्तवृत्ति" जास्तच वाढली. आपल्या समाजाला चांगले चिमटे घेतले पाहिजेत, नव्हे धक्केहि दिले पाहिजेत, असें त्यांनीं ठरविलें. बेडर निर्भयपणा आणि निर्भीडपणा त्यांच्या स्वभावांत होताच. तेव्हां त्यांना वरील गोष्टी करणें कठीण गेलें नाहीं.

आगरकरांच्या पक्षांतील समाजसुधारक हे भ्याड, पोषाखी सुधारक आहेत; त्यांनीं समाजाचें नीट निरीक्षण केलेलें नाहीं कीं त्यांना खरें देशप्रेम नाहीं; स्त्रियांचा ते फाजील उदोउदो करून त्यांना पांगळ्या बनवितात व आपल्या गुलाम करून ठेवतात. सुधारक सनातनी समाजापासून छळाच्या भीतीनें दूर राहतो, हें चूक आहे; त्यानें आपल्या पूर्वीच्या लोकांतच मिळून मिसळून राहिलें तरच सुधारणा मूळ धरते, असें डॉ. बजावीत. ते आपल्या लग्नापूर्वी व नंतरहि बरेच दिवस पुण्यास गांवांतच भरवस्तींत राहात व युरोपियन बायको बरोबर घेऊन चालत, फिरत. यामुळें त्यांची तोंडावरहि टवाळी होई, पण ते नुसते हंसत किंवा कांहीं थट्टेंत बोलत. त्यांनीं हिंदुधर्माचा आणि समाजाचा नवीन संशोधन पद्धतीनें अभ्यास केला होता व आपलें सर्व जुनें नवें वाङ्मय वाचून काढलें होतें. त्यामुळें एखाद्या आचाराचा किंवा चालीचा ते बरोबर इतिहास सांगत व आजची आपण केलेली सुधारणा बरी कीं वाईट हें साधार पटवून देत. समाजामध्यें कांहीं फेरफार करून जुनें चातुर्वर्ण्य सांभाळलें पाहिजे, पूर्वीच्या ब्राह्मणवर्गाप्रमाणें एक नवा आदर्शभूत श्रेष्ठवर्ण समाजांत पाहिजे; व त्याकरवीं समाजनीति सुधारली पाहिजे, यांसारख्या समाजाचें बळ वाढविण्याला उपयोगी अशा मुद्यांचें विवेचन ते सशास्त्र आणि साधार करीत. मिस् कोहन या आपल्या नियोजित वधूला लग्नापूर्वी हिंदु करून घेतांना त्यांनीं आर्यसमाजाचा

किंवा हिंदु मिशनऱ्याचा विधि घेतला नाहीं; तर अथर्ववेदांतून "व्रात्यस्तोम" काढला व ज्ञानकोशातील सहसंपादकांना ऋत्विज्पद देऊन वैदिक विधीनें धर्मांतर करविलें.

विलायतेहून आल्यावर त्यांनीं युरोपियन पोषाख टाकून पगडी, अंगरखा–उपरणें असा बालबोध पोषाख ते घालूं लागले; त्यामुळें त्यांच्याविषयीं जुन्या लोकांत आदर वाढला व त्यांची "विक्षिप्त" मतें खपूं लागलीं. गौतमबुद्ध, सुधारक, फर्ग्युसन कॉलेजांतील "स्वार्थ-त्यागी" म्हणविणारे प्रोफेसर यांवर त्यांनीं टीकेची झोड उठवली. कै. अच्युतराव कोल्हटकर यांनीं त्यांना मदत केली.

प्रागतिकांना कॉंग्रेसमधून विरोध त्यांनीं चालविला व लो० टिळकांविषयीं भक्ति ते दाखवूं लागले. झालें! याचा परिणाम म्हणजे गोखलेपक्षीय सुशिक्षित आणि सुधारक यांना ते अप्रिय झाले. त्यांच्या सडेतोड वृत्तीमुळें आणि स्पष्ट भाषणामुळें ते 'एकांडे' ठरले.

पुढें ज्ञानकोशासारखें अवाढव्य काम हातीं घेताना त्यांना बहुतेकांनीं नाउमेद केलें. एवढा पैसा जमणार कसा व अनेकांचें लेखन–साहाय्य मिळणार कसें ? पण डॉक्टरांची सर्वच कल्पना विचित्र. त्यांनीं व्यापारी कंपन्यांप्रमाणें ज्ञानकोश संपादण्यासाठीं एक लिमिटेड कंपनी काढली. १०० रु. चा शेअर ठेवला; व स्वत: शेअर खपविण्यास हिंडूं लागले. नुसत्या पांढरपेशा श्रीमंतांकडेच जाऊन ते थांबले नाहींत, तर सर्व धंद्यांच्या व जातींच्या ऐपतदार लोकांकडे ते गेले; त्यांना त्यांच्या जिल्हाळ्याची माहिती या ग्रंथांत येऊन त्यांचा कसा फायदा होईल हें पटवून दिलें; व २००० वर ग्राहक जमा केले. ज्ञानकोश कार्याला जे चार लाख रुपये लागले ते त्यांनीं लोकांकडून, सरकार-संस्थानिक यांचा आश्रय नसतां, मिळविले. महाराष्ट्राची ग्रंथ घेण्याची ताकद त्यांनीं वाढविली, विश्वास जागृत केला, व पुढच्यांना मार्ग सुलभ करून दिला. सरकार, संस्थानिक किंवा सामर्थ्यवान् पक्ष

यांच्या कच्छपीं न लागतां, आपल्या बुद्धीला न विकतां डॉ. केतकर यांनीं आपलें नियोजित कार्य तडीस नेलें व महाराष्ट्राचा लौकिक वाढविला.

इतर विद्वान् विक्षिप्तांप्रमाणें त्यांचा आत्मविश्वास फार दांडगा होता. लो० टिळक, डॉ. भांडारकर, संशोधक राजवाडे आणि खरेशास्त्री यांखेरीज कोणालाच ते तज्ज्ञ किंवा आपल्यापेक्षां जास्त समजत नसत. आपल्याप्रमाणें समाजाचें सूक्ष्म अवलोकन, व्यासंग, बुद्धि, आणि चिकित्सात्मक दृष्टि इतरांना नाहीं हें ते बोलूनहि दाखवीत; व त्यामुळें त्यांच्यासंबंधीं फार गैरसमज उत्पन्न होत. समाजाचे पुढारी व विद्वदग्रणी समजले जाणारे बहुतेक लोक त्यांना टाळीत, त्यांच्याविषयीं सहानुभूति दाखवीत नसत, याला कारण हाच बेफाट स्वभाव. एखाद्याला त्याच्या तोंडावर ते मूर्ख म्हणण्यास कमी करत नसत. मौनाचा शिष्टाचार त्यांस संमत नसे. गुळमुळीत-पणा त्यांना खपत नसे. पण आपण ज्याला दुखविलें त्याच्याकडे पुन्हां जाण्याला ते कधीं कचरत नसत. तो आपला अपमान करील ही भीतीच त्यांना नसे. सर्व 'लोचट' कारभार! पण ही क्रीडा-दाक्षिण्यवृत्ति फार थोड्यांत असल्यामुळें डॉक्टरांना गुप्त शत्रू फार. तरीहि त्यांनीं निर्भयतेनें आपलें वागणें मरेपर्यंत सोडलें नाहीं.

वेदांच्या संहितांना 'जुडगीं' म्हटल्यावरून व युरोपियन स्त्रीशीं विवाहबद्ध होऊन 'बहकल्यामुळें' सनातनी वर्ग त्यांच्यावर रुष्ट असे. त्यांच्याजवळ महामहोपाध्यायाला लाजविणारा जाज्वल्य हिंदुत्वा-भिमान–नव्हे ब्राह्मण्याभिमान असतांना, ते अंधश्रद्धेनें वागत नाहींत, शिष्टांना मानीत नाहींत, म्हणून सामान्य पांढरपेशावर्ग त्यांच्याबद्दल आदर बाळगीत नसे. त्यांच्या युरोपियन राहाणीमुळें व नवमतवादी विचारांमुळें अलीकडे तरुण वर्ग मात्र त्यांना फार चाहात असे. ते अगदीं मोकळेपणानें उत्तरें देत, म्हणून त्यांना प्रेमाबद्दलहि प्रश्न विचारले जात. त्यांच्या कादंबऱ्या अगदीं नवीन तऱ्हेच्या

' संस्कृति संरक्षकांना ' अश्लील वाटणाऱ्या असल्या तरी त्या किती जणांना समजल्या हा प्रश्न विचारण्यासारखा आहे. प्रेमविवाह, मिश्रसमाज, वेश्यांचा उद्धार, लैंगिक नीति, जातीय भावना, आर्थिक परिस्थितीचा आचारांवर परिणाम इत्यादि प्रश्नांचा त्यांनीं समाज-शास्त्रज्ञाच्या भूमिकेवरून निर्भीड रीतीनें ऊहापोह केला आहे. समाजाला योग्य ज्ञान करून देतांना फाजील संकोच धरला नाहीं; व टीकेची पर्वा केली नाहीं. अगदीं ताज्या ' भटक्या ' कादंबरींत बेकार तरुणांना लग्न न करण्याचा भ्याडपणा दाखविल्याबद्दल चांगल्या कानपिचक्या दिल्या व संततीनियमन—साधनांचा दुरुपयोग न करण्याविषयीं बजाविलें आहे. ज्याचा खप होईल तें—अश्लील बीभत्स सुद्धां-लिहून खपवावें असें डॉक्टर सांगतात हा त्यांच्यावर पुष्कळ जण आरोप करीत. पण एका भाषणांत डॉक्टरनीं आपली भूमिका स्पष्ट केली आहे. 'लोकांना पाहिजे तें, आवडेल तें, त्यांचें मनोरंजन करील तें लिहिलें तरच आजच्या कमी साक्षर व सुशिक्षित समाजांत तें खपेल व वाङ्मयाची वाढ होईल. अश्लील किंवा बीभत्स गोष्टी फार दिवस चालावयाच्या नाहींत, समाज त्याचा अव्हेरच करील. तेव्हां अश्लीलाला उत्तेजन मिळणारच नाहीं. यावरून, मी अश्लील वाङ्मयाचा पुरस्कर्ता नाहीं.'

तसेंच एकदां, आपल्या ज्ञानकोशांत काव्यासंबंधीं आढावा घेतांना मराठी काव्य उष्टें आणि भिकार असल्यामुळें तें सर्व जळून गेलें तरी काव्यनाश या दृष्टीनें जगाचें कांहींएक नुकसान होणार नाहीं, असें त्यांनीं म्हटलें होतें. या विधानावर कांहीं मराठी साहित्यिकांकडून कडक टीका झाली. आपल्या भावना अद्याप सुशिक्षित झाल्या नाहींत, आपलें प्रेमिक वाङ्मय कुठें आहे, आपल्या कवींची दमछाटी फार लवकर होते व विशिष्ट वयांतच आपल्याकडील लेखकांना काव्य करावेंसें वाटतें. त्यामुळें आपली

काव्यप्रांतांतील कर्तबगारी पाश्चात्यांपेक्षां फार कमी आहे व आहे ती बहुतेक उसनी आहे. हा डॉक्टरांचा खुलासा पटण्यासारखा आहे असें मला तरी वाटतें.

महाराष्ट्र व मराठी भाषा यांबद्दल डॉक्टरना फारच अभिमान होता. त्याचें सर्व लिखाण या अभिमानाचें द्योतक म्हणतां येईल. महाराष्ट्र कसा मागें आहे, व त्यानें पुढें जाण्यास काय काय केलें पाहिजे, याचें दिग्दर्शन त्यांनीं ज्ञानकोशाच्या एका खंडांत केलें तें प्रेममूलकच होतें. पण त्यावरहि अराष्ट्रीय वृत्तीचे म्हणून केसरींतून टीका झालीच. महाराष्ट्रावर, मराठी बोलणाऱ्या बहुसंख्याक प्रजेवर राज्य करणाऱ्या गव्हर्नरनें सरकारी कागद-पत्रांवर मराठींत सही केली पाहिजे; एरवीं तो कागद कायदेशीर होऊं नये, असें त्यांनीं ठासून केलेलें प्रतिपादन पुष्कळांना त्याकाळीं विक्षिप्तच वाटलें. पण आज तें तत्त्वतः बरोबर दिसूं लागलें आहे.

कै. महादेव मोरेश्वर कुंटे, राजारामशास्त्री भागवत, विश्वनाथ काशिनाथ राजवाडे या विक्षिप्त मालिकेंत श्रीधर व्यंकटेश केतकर हे जाऊन बसले असले तरी, ही सबंध मालिका महाराष्ट्राच्या गळ्यांतली कौस्तुभ मालिका आहे.

याप्रमाणें डॉक्टर केतकर यांच्या विक्षिप्तपणांतील अलौकिकत्व आपण पाहिलें. "वेडे व्हा, वेडे!" हा कै. प्रो. वा. ब. पटवर्धन यांचा लेख ज्यांनीं वाचला असेल, त्यांना या विक्षिप्तपणांतील रहस्य कळून येईल. बहुतेक पहिल्या कोटींतील थोर लोक विक्षिप्तच होते. कालांतरानें डॉ. केतकरांचा विक्षिप्तपणा स्मरणांतून जाऊन त्यांचें महाराष्ट्राला झालेलें थोर ऋण तेवढेंच महाराष्ट्राला कृतज्ञ करील व त्यांचें योग्य तें स्मारक करण्यास त्याला उद्युक्त करील.

[ श्री. कर्वे यांचें ता. १० एप्रिल १९३९ रोजीं रेडिओवरचें भाषण. ऑल इंडिया रेडिओ यांच्या कृपेनें. ]

# संपादक केतकर

तृतीय दृष्टिक्षेप

"ज्ञानकोशाची सेवा ज्यांनीं मोठ्या एकनिष्ठतेनें केली अशी मंडळी मीं शोधून काढली असें श्रेयहि मला मिळूं शकत नाहीं. ज्या मंडळीस आस्था होती अशी मंडळी आपोआपच चिकटली गेली; कां कीं ज्यांस आस्था नव्हती अशी मंडळी चिकटूनच राहिली नाहींत."

× × × ×

"ज्या माझ्या साहाय्यकांच्या अंत:करणपूर्वक साहाय्यामुळें हें काम मी अनेक अडचणींतून पार पाडूं शकलों त्यांचा मी ऋणी आहें आणि त्यांचें कर्तृत्व आणि योग्यता हीं महाराष्ट्रानें ओळखली पाहिजे असें मला वाटतें.

"मी अभिमानानें असें सांगूं शकतों कीं, ज्ञानकोशाच्या संपादन खात्यांत अशी मंडळी आहेत कीं त्यांनीं संपादकीय कार्या-कडे लक्ष न देतां शिक्षणाकडे लक्ष दिलें असतें, तर ते ज्या कॉलेजां-मधून शिकवायास गेले असते त्या कॉलेजांच्या इतिहासांत देखील त्यांचा अत्यंत गौरवपूर्वक उल्लेख करावा लागला असता; एवढेंच नव्हे तर प्रसिद्ध विद्वान् म्हणून त्यांची ख्यातीहि झाली असती. ही मंडळी ज्ञानकोशाच्या कामाला लागल्यामुळें त्यांचें जसें द्रव्यदृष्टीनें नुकसान झालें आहे तसेंच सामाजिक महत्त्व या दृष्टीनेंहि नुकसान झालें आहे. ही गोष्ट मला मोठ्या खेदानें कबूल करणें भाग आहे."

—ज्ञानकोश इतिहास

वरील उद्‌गार डॉक्टरांनीं ज्या सहसंपादकांबद्दल काढले तेहि डॉ. केतकर यांचें ऋण नेहमीं कबूल करतातच. कारण त्यांच्या ठिकाणीं आलेलें लेखनकर्तृत्व हें डॉक्टरांच्या शिक्षणामुळेंच होत

हें निर्विवाद आहे. डॉक्टरसाहेबांनीं त्यांना कशा प्रकारांनीं काय काय संपादकीय शिक्षण दिलें याची माहिती दिल्यास ती होतकरू लेखकवर्गास उपयुक्तच होईल.

नवीन लेखक घेतला कीं प्रथम त्याला एखाद्या इंग्रजी ग्रंथाचा सारांश काढण्याचें काम देण्यांत येई. यासाठीं त्याला सबंध ग्रंथ मननपूर्वक वाचून त्यांतील महत्त्वाच्या मुद्यांचीं टिपणें करून ठेवावीं लागत. हीं कच्चीं टिपणेंहि तो कशीं करतो याकडे डॉक्टरांचें ओझरतें लक्ष असे. सारांश काढल्याचें सांगितल्यावर डॉक्टरांपुढें त्याची तपासणी होई. " मला थोडक्यांत ग्रंथकाराचें म्हणणें सांगा पाहूं," असें ते लेखकाला सांगून, तो ग्रंथांतील महत्त्वाच्या गोष्टी, त्याचबरोबर चुकाहि बरोबर दाखवून देतो किंवा नाहीं याकडे विशेषतः पाहात. नंतर त्याला अमुक पानांत ग्रंथांतील अमुक प्रश्नांवरचे विचार सुबोध रीतीनें मांडण्यास सांगत. या प्राथमिक परीक्षेंत उत्तीर्ण झाल्यावर त्याला पुढलीं संपादकीय कामें सांगत.

एखादा लेख तयार करण्यासाठीं काय गोष्टी ( डॉक्टरांचा आवडता शब्द ' क्रिया ' असे ) करावयास पाहिजेत याची माहिती त्यांच्याकडून प्रत्यक्षाप्रत्यक्ष होत असे. पुष्कळदां ते लेखकावरच साधनें जमविण्याचें आणि निवडण्याचें सोपवीत व लेख तयार होत असतांना त्याला कांहीं उणीवा दाखवून प्रोत्साहन देत. त्यानें कांहीं तयारी आपल्या अपेक्षेबाहेर नवी किंवा चांगली केली असेल तर तेथल्या तेथें त्याला ते वाखाणीत. लेखासाठीं संदर्भग्रंथ कोणते घ्यावेत हें ब्रिटिश म्यूझियम्, इंपीरियल लायब्ररी, रॉयल एशियाटिक सोसायटी इ. चे कॅटलॉग कचेरींत असत ते पाहून, त्यांतून पुस्तकें निवडण्यास सांगत. कोठल्याहि विषयावर संदर्भग्रंथांची यादी तयार करणें हें काम प्रत्येक लेखकास येणें अत्यावश्यक आहे अशी त्यांची बजावणी असे. माझे लेखक या कामांत फार निष्णात आहेत

अशी ते अभिमानानें मोठ्या लोकांजवळ ग्वाही देत. ज्ञानकोशांतील शास्त्रीय लेखांच्या शेवटीं जे संदर्भग्रंथ दिलेले आढळतात त्यांपैकीं एखादुसराच लेखकानें मदतीला घेतलेला असे; बाकीच्यांची नांव-निशी अभ्यासकांसाठीं मुद्दाम दिली जाई. अमुक ग्रंथ तुमच्याकडे असतील, कारण ते लेखांत उल्लेखिले आहेत अशी अनेकदां बाहेरून विचारणी होई; तेव्हां वरच्याप्रमाणें खुलासा द्यावा लागे.

अनेक वृत्तपत्र—मासिकांतून जे लेख येत त्यांतील महत्त्वाच्या लेखांची कचेरींत नोंद करून ठेवण्यांत, किंवा त्यांच्या सूची जमवून ठेवण्यांत लेखकाचा फार फायदा असे. आपल्या लेखाचीं साधनें म्हणून त्यांचा चटकन उपयोग करतां येई. १९१६ पर्यंतचे ग्रंथ आणि नियतकालिक लेख डॉक्टरांनीं ज्ञानकोश लेखकवर्गासाठींच केवळ तयार करविलेल्या ' वाङ्मय सूचीं ' त सांपडत. त्यापुढचे मराठी ग्रंथालयांत जाऊन पाहावे लागत. हातीं लागेल तो प्रत्येक ग्रंथ आणि विशेषत कचेरीच्या ग्रंथसंग्रहांत असलेला एकूण एक ग्रंथ या पुठ्यापासून त्या पुठ्यापर्यंत बारकाईनें चाळून पहावा; कांहींच्या प्रस्तावनेंत ऐतिहासिक माहिती, तर कांहींच्या पादटीपांतून महत्त्वाचीं टिपणें, ग्रंथनामें, तर परिशिष्टांतून ग्रंथविषयाहून निराळीच माहिती दिलेली असते. कांहीं ग्रंथांच्या सूची आपणांस लेखाची साधनसामुग्री अनायासें पुरवितात. तेव्हां फावल्यावेळीं ग्रंथ चाळण्याची संवय ठेवल्यास ज्ञानकोशाप्रमाणें ज्याला स्थूलदृष्टीनें लिहावयाचें असेल त्याला फार फायदा होतो हें मी स्वानुभवानें सांगूं शकतों. त्यामुळें व्यापकदृष्टि प्राप्त होते व कोणताहि लेख किंवा ग्रंथ संपादण्याची अडचण वाटत नाहीं. कोठल्या ग्रंथांत काय आहे हें ज्ञानकोशीय लेखकास तरी अवश्य माहीत पाहिजे. आमच्याकडे संदर्भग्रंथांच्या याद्यांसाठीं नेहमीं कितीतरी लेखक येत. लहानशा, पण आमच्या भरपूर उपयोगाच्या ग्रंथसंग्रहाच्या मदतीनें थोड्या वेळांत आम्ही

त्यांना पाहिजे ती माहिती पुरवीत असूं. हें कौशल्य डॉक्टरांच्या सान्निध्यामुळें संपादकवर्गास प्राप्त झालें होतें.

लेख तौलनिक पद्धतीनें लिहावा, यावर त्यांचा भारी कटाक्ष असे. प्राच्य आणि पाश्चात्य या दोहोंची तुलना लेखात आलीच पाहिजे; निदान यांची माहिती शेजारीं शेजारीं मांडून ठेविली पाहिजे. 'एन्सायक्लोपीडिया ऑफ रिलिजन अँड एथिक्स' या कोशांत जगांतील प्रत्येक मोठ्या राष्ट्राची, एखाद्या विषयासंबंधीं संपूर्ण आणि साधार माहिती सांपडे; ती अशा लेखाला चांगली आधारभूत असे. कोठल्याहि विषयावर लिहितांना लेखकानें आपलें अज्ञान व्यक्त करूं नये, तर उलट या विषयाचा सांगोपांग आज तागायत आपला अभ्यास आहे आणि आपण अधिकारानें लिहीत आहों असें जागजागीं दिग्दर्शित केलें पाहिजे, असें डॉक्टरांचें मत असे व ते स्वतः त्याप्रमाणें लिहीत. अनेक भारदस्त पण संलग्न प्रश्नांचा उल्लेख करणें, त्यासंबंधीं सूचक वाक्यें लिहिणें, आधुनिक अधिकारी माणसांच्या मतांवर उडत उडत टीका करणें, कांहीं आपल्या नव्या कल्पना अस्पष्टपणें मांडणें, अर्थशास्त्र किंवा समाजशास्त्र याच्याशीं विषयाचा संबंध जोडून जिव्हाळा उत्पन्न करणें, इत्यादि प्रकार यावेळीं उपयोजावयाचे असतात. एखाद्याला 'मूर्ख' म्हणण्यापेक्षां 'भोळा' म्हणून त्याची कींव करावी, असें ते सांगत. वर्तमानपत्राच्या संपादकापेक्षां ज्ञानकोशाच्या संपादकाच्या टांकाच्या फेंकी अधिक पल्लेदार आणि पांडित्यदर्शक असल्या पाहिजेत.

ज्ञानकोश कचेरींतील संपादकांनीं जरूर पडेल त्याप्रमाणें वेगवेगळ्या विषयांचा अभ्यास आणि संशोधनहि डॉक्टरांच्या नेतृत्वाखालीं केलेलें आहे. कॉलेजांतील संस्कृतचे प्रोफेसर आणि एम. ए.चे विद्यार्थी करणार नाहींत इतका श्रौत–स्मार्त वाङ्मयाचा मूळ ग्रंथा-

वरून चिकित्सात्मक अभ्यास त्यांना करावा लागला. ( १ ) ऋग्वेद संहितेचें, प्रत्येक पाद घेऊन तो पाद स्तुतिपर, याचनापर किंवा ऐतिहासिक स्वरूपाचा आहे या दृष्टीनें वर्गीकरण; ( २ ) चारहि संहितांतील शब्दांचें विषयवार वर्गीकरण; ( ३ ) तैत्तिरीय संहितेची पदसूची—विषयसूची; ( ४ ) यज्ञसंस्थेचा अभ्यास; ( ५ ) संहिता मंत्रांचें साम्य आणि गृह्यसंस्कारांतून विनियोग दाखविणारीं कोष्टकें; ( ६ ) वैदिक शब्दसृष्टि; ( ७ ) वेदांवरून निघणारा राजकीय-सामाजिक—सांस्कृतिक इतिहास, यासारखे त्यांचे दीर्घ पण अज्ञात प्रयत्न महाराष्ट्राचा पंडिती दर्जा निःसंशय वाढविणारे आहेत. या कार्याचें महत्त्व भविष्यकालीं दिसून येईल, असें डॉ. केतकर म्हणत तें खोटें नाहीं. पंडित चित्रावशास्त्री, हौत्रवेत्ते धुंडिराजशास्त्री बापट आणि चिंतामणशास्त्री दातार या सनातनी शास्त्री मंडळींना वेदांकडे पाहाण्याची नवी दृष्टि डॉक्टरांनी दिली व त्यांच्या मदतीनें वैदिक संशोधनक्षेत्रांत अपूर्व शोध लाविले. ' हिंदुस्थानांतील वेदपूर्व आर्यन् संस्कृति व वैदिक संस्कृतीचा तिजवर घडलेला परिणाम ' यासंबंधीं आपल्या संशोधनाचें सार म्हणून एक इंग्रजी पत्रक काढून डॉ. केतकरांनीं युरोप-अमेरिकेंतील पंडितांकडे पाठविलें होतें. " वैदिक संशोधक म्हणून माझी कीर्ति झाली नाहीं हें खरें आहे. ती पुढें होईल अशी माझी खात्री आहे...मला असें वाटतें कीं, मीं जें काय लिहिलें आहे त्याची उत्तम प्रकारें जाणीव होण्याइतका ज्ञानविकास भोंवतालच्या जनतेंत नाहीं. जो पुढें वेदाभ्यासक निघेल तो माझें कर्तृत्व ओळखील ही माझी खात्री आहे—" असें त्यांनीं ज्ञानकोशाच्या इतिहासांत भवभूतीप्रमाणें उद्गार काढले आहेत. ज्ञानकोशाचा दुसरा आणि तिसरा हे विभाग ' भारतीय पांडित्याच्या बाबतींत महाराष्ट्रापासून जगास कांहीं तरी शिकावयाचें

आहे अशी खात्री उत्पन्न करतील, ' असे आहेत, याची जाणीव आज फार थोड्यांस आहे.

वैदिक संशोधनाप्रमाणेंच आम्हीं अवेस्ता वाङ्मयाचें संशोधन आरंभिलें होतें. त्यासाठीं अवेस्ता लिपि शिकून अवेस्ता–मराटी कोश रचिला व एक अवेस्ता व्याकरण लिहिलें. हे ग्रंथ अमुद्रितच राहिले आहेत. अवेस्ता गाथांचें संस्कृतीकरणहि थोडें करण्यांत आलें होतें. असे कितीतरी संशोधनपर प्रयत्न अर्धवट करून सोडून दिले आहेत. पण यामुळें संपादकांची धारणाशक्ति आणि अवलोकन हीं साहजिकच वाढलीं.

एखाद्या विषयावर लेख किंवा त्याचीं साधनें नसल्यास डॉक्टरांकडे जावें म्हणजे ते स्वत. कांहीं टाचणें करून देत किंवा तोंडी मजकूर सांगत. ज्ञानकोशाच्या सहाव्या विभागांतील ' अनुनय ' हा लेख त्यांनीं तोंडी सांगितल्यावरून प्रस्तुत लेखकानें उतरून घेऊन छापण्यास दिला. ही संवय आपल्यालाहि असावी म्हणून, प्रथम एखादें पुस्तक वाचून तें तोंडी सांगण्याचा ( dictate ) आम्हीं डॉक्टरांच्या सूचनेवरून क्रम आरंभिला. त्यामुळें लेख लवकर व सोप्या भाषेंत तयार होऊं लागले. गांगोलीचें ' दि साउथ इंडियन ब्रॉंझेस ' हें पुस्तक मीं असेंच तोंडीं सांगून, तो मजकूर शिल्पकलेवरील लेखांत घालून दिला. श्री. शीलवतीबाई आल्यावर त्या जर्मन ग्रंथांचें तोंडीं इंग्रजी भाषांतर सांगत व तें ऐकून मी लगेंच मराठींत मांडीत असें. असो. ही तोंडीं सांगण्याची ( dictation ) पद्धत मोठमोठे ग्रंथ भाषांतरित–रूपांतरित करण्यास फार उपयोगी आहे.

लेख लिहून झाल्यावर त्याचे मुद्यांप्रमाणें परिच्छेद पाडून प्रत्येक परिच्छेदाला शिरोनाम द्यावयाचें असा ज्ञानकोशांत परिपाठच असे. लहान दोन ओळींच्या परिच्छेदालासुद्धां शिरोनाम सांपडेल. लेखाला नांव प्रथम न देतां मागाहून द्यावें; म्हणजे लेख लिहितांना हात बांध-

लेले नसतात व नांवहि वाटेल तें देतां येतें. डॉक्टरांची नांव देण्याची पद्धत आम्हीं सर्वांनींच उचलली होती म्हणण्यास हरकत नाहीं. 'सामाजिक दृढीकरण व समाजविस्तार यांचें जगद्विकासांत स्थान,' 'असुर राष्ट्रसंस्थापनेच्या नंतरच्या इतिहासार्थ वेदावलोकन,' 'आमचें बाह्यांसंबंधानें कर्तव्यकर्म' यांसारखीं संस्कृतप्रचुर भारदस्त लेखनामें त्यांचें वैशिष्ट्य म्हणतां येईल. यासाठीं विद्यासेवकांतील लेख पाहावेत. जाड जाड संस्कृत, वृद्धिरूप शब्द तयार करून ते रूढ करीत. जगासंबंधीं याला त्यांनीं बनविलेला, 'जागतिक' हा शब्द आतां सुपरिचित झाला आहे. तसेंच "ख्रैस्त्य" ( ख्रिस्ती संप्रदाय ), 'तौलनिक,' 'यावद्वीप,' ( Javanese ) 'आर्ष' ( ऋषिप्रणीत ),' मांत्र संस्कृति' इत्यादि त्यांचे शब्द सर्व लेखकांनीं उचलले. पारिभाषिक शब्द होतां होईतों जुने रूढ मराठी पाहावेत किंवा नसतील तर संस्कृतापासून बनवावेत; संज्ञा बनवितांना युरोपियन शब्दांचें तंतोतंत भाषांतर करूं नये. तर त्यांतील कल्पना व्यक्त करणारा शब्द योजावा, असा डॉक्टरांचा आग्रह असे. Evolution याला 'उत्क्रांति' हा शब्द अगदीं चुकीचा असून त्या ऐवजीं 'विकास' वापरावा व त्याप्रमाणें तो ज्ञानकोशांत सर्वत्र वापरला आहे. ज्ञानकोशकचेरींत कच्चा संज्ञाकोशहि तयार झाला होता, पण तो इतर 'भुक्तोर्वरित' मालाप्रमाणेंच पडून आहे. ज्ञानकोशाच्या संपादकांना संज्ञा बनविण्यास मुळींच अडचण पडत नसे. बहुतेक शास्त्रीय लेख कचेरींतच तयार केले गेले. त्यावेळीं कोणी परिभाषेची अडचण दाखवून स्वस्थ बसला नाहीं. टांकसाळ चालू असेच, व त्यांतील नाणीं एका वहींत एकत्र ठेविलीं जात असल्यानें दुसऱ्यांदा किंवा दुसऱ्यांना तीं सहज वापरावयास मिळत.

ग्रंथानुक्रमणिका करण्याची नवीन पद्धत या कामांत शिकण्यास मिळे. प्रकरणांच्या नांवांची नुसती यादी करून काम न भागवितां

' ग्रंथसंक्षेप ' या नांवाखालीं ग्रंथांतील पानागणिक किंबहुना परिच्छेदागणिक विवेचिलेले मुद्दे थोडक्या शब्दांत पण पूर्ण वाक्यांनीं लिहून काढून त्यांपुढें पानांचे आंकडे द्यावयाचे. यामुळें नुसता ग्रंथसंक्षेप वाचून पुस्तक सारांशरूपानें वाचल्याचें फल मिळतें. या प्रकारची अनुक्रमणिका तयार करण्यास पुस्तक वाचण्याहून जास्त श्रम पडतात, कारण प्रत्येक नवा मुद्दा लक्ष्यांत घेऊन थोडक्यांत मांडावयाचें कसब पाहिजे. पहिल्या विभागाचा ग्रंथसंक्षेप या दृष्टीनें अवश्य पाहावा. या ग्रंथसंक्षेपाप्रमाणें ' अंतरंगपरिचय ' म्हणून जो प्रकार आहे तो सहाव्या विभागांत पाहातां येईल. त्यांतील अपासून अर्थशास्त्रापर्यंत वेगवेगळ्या विषयांवरील अनेक लेख नुसते वर्गीकृत मांडण्याऐवजीं त्या लेखांचें स्वरूप लेखवजा सुबोध स्पष्ट केलें आहे.. हाहि प्रकार नवलेखकांना शिकण्यासारखा आहे. नुसत्या हाडांच्या सांगाड्यांत रक्त आणि मांस घालून त्याला सजीव करणें ही कलाच आहे. ' ग्रंथप्रवेश, ' ' ग्रंथसंगति ' ' रचनापरिचय, ' यांसारखे आणखी प्रकारहि ज्ञानकोशाच्या कांहीं विभागांच्या आरंभीं सांपडतील.

कोठलेंहि संपादनशास्त्र आपल्या लेखकांना शिकण्याचें अपुरें राहूं नये म्हणूनच कीं काय, डॉ. केतकर यांनीं ' विद्यासेवक ' मासिक व ' पुणें समाचार ' हें वर्तमानपत्र ज्ञानकोश मंडळातर्फें चालू केलें. मासिकांत भारदस्त, संशोधकीय पण चटकदार लेख यावेत म्हणून सर्वच संपादक कांहीं तयारी करून नेहमीं लिहीत. बाहेरचे लेख बहुधा नसत तरीसुद्धां हें मासिक कधीं नीरस टाकाऊ झालें नाहीं. लहान टाचणें तर विद्वानांना फार आवडत. ज्ञानकोशांत न घेण्याजोग्या साहित्यावशेषांतून किंवा सभोंवार पसरलेल्या अनेकविध ग्रंथसंभारांतून प्रत्येकजण आपापला लेखविषय निवडीत असे. सर्व लेखक एकाच पद्धतीनें लिहीत, त्यामुळें सर्व मासिक एकटांकी

लिहिल्यासारखें दिसे. प्रचार कार्यासाठीं बाकीचे सहकारी बाहेर असतील तेव्हां जाग्यावर असलेला एकटा कोणीहि लेखक या मासिकाचें संपादन वेळेवर व्यवस्थित करी. हीच गोष्ट 'पुणें समाचार' पत्राची. पहिले तीन चार अंक डॉक्टरनीं भरून काढले असतील तेवढेच; पण पुढें एकदोन संपादकांवरच त्याच्या संपादनाचा बोजा येऊन पडला. आर्थिक परिस्थिति अत्यंत हलाखीची असतांहि दैनिक (पुढें साप्ताहिक) पत्र रोजच्या रोज सकाळीं निघण्याचें थांबलें नाहीं. याला बहुंशीं कारण डॉक्टर साहेबांनीं आपल्या सहकाऱ्यांवर टाकलेला पूर्ण विश्वास आणि त्यांच्या व्यवस्थेंत होतां होईतों ढवळा ढवळ करावयाची नाहीं, प्रथम दिशा दाखवून पुढें त्यांना पूर्ण स्वातंत्र्य द्यावयाचें, हें त्यांनीं ठेवलेलें धोरण होय. यामुळें आत्मीयतेनें प्रत्येकास काम करावेंसें वाटे. भरपूर व वेळेवर पगार घेऊन सुद्धां जीं कामें इतर करणार नाहींत तीं कामें डॉक्टरांचे लेखक सहकारी निमूटपणें व कळकळीनें करीत याची ग्वाही डॉक्टरांनीं अनेक ठिकाणीं दिलीच आहे. डॉक्टरांपासून आर्थिक फायदा त्यांच्या सहकाऱ्यांस कितपत झाला हें सर्वांस सुविदितच आहे; तथापि ज्ञानाचा फार मोठा फायदा झाला आहे; व स्कॉलरशिपा घेऊन ज्याप्रमाणें विद्यापीठांतून पदवीधर उच्च ज्ञानार्जन करतात, त्याप्रमाणेंच आम्हांला दहा बारा वर्षें ज्ञानकोशविद्यापीठांत डॉ. केतकर यांच्यासारख्या पहिल्या प्रतीच्या विद्वानाच्या नेतृत्वाखालीं विविध ज्ञानक्षेत्रांतून मनसोक्त विहार करण्यास मिळाला आहे. ही अमूल्य संधि फार थोड्यांना व तीहि फार खटपटीनें आणि त्रासानें लाभते. तेव्हां आमच्यांत जी कांहीं थोडीफार संपादकीय विद्या आहे तिचें श्रेय आमचे आचार्य डॉ. केतकर यांनाच दिलें पाहिजे व त्यांचीच परंपरा आम्ही चालवितों व आमच्यामागेंहि ती टिकून राहील याबद्दल खात्री वाटते. [ प्रतिभा केतकर अंक ]

# माझा आवडता ग्रंथकार
## ( डॉ. केतकर )

**चवथा दृष्टिक्षेप**

डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांची योग्यता महाराष्ट्राला आज जी कांहीं कळली आहे, तीपेक्षां कितीतरी अधिक कळावयाची राहिली आहे. त्यांना महाराष्ट्राचे जॉनसन् असें कांहींजण म्हणतात पण जॉनसन् या आंग्लकोशकारापेक्षां केतकरांनीं, स्वदेशाची आणि स्वभाषेची कितीतरी अधिक सेवा केलेली आहे. कोठल्याहि भाषेचा दर्जा ठरवितांना तींत कोशस्वरूपी वाङ्मय किती आहे, उच्च आणि स्वतंत्र विचार प्रदर्शित करणारे ग्रंथ किती आहेत, नवे शास्त्रीय सिद्धान्त त्या भाषेतून किती मांडलेले आहेत, यासारखें परीक्षण करण्यांत येत असतें. डॉ. केतकर यांनीं आपले भारदस्त विचारांचे ग्रंथ मराठींतच रचिले आणि सर्व जगांतील विविधज्ञान आपल्या महाराष्ट्रीय ज्ञानकोशांत खच्चून भरलें, यामुळें मराठीला जगांतील मोठमोठ्या भाषांत एक मानाचें स्थान लाभलें आहे.

त्यांनीं २३ भागांत पुरा केलेला मराठी ज्ञानकोश हा एक अपूर्व ग्रंथराज आहे. कोठलीहि माहिती यांत सांपडते. विद्यार्थ्यांना तर आपल्या अभ्यासांत याचें साहाय्य घेतल्यावांचून चालणार नाहीं, हें खरें; पण आपल्याकडे संदर्भ-ग्रंथांचा योग्य उपयोग करण्याची संवय अद्याप लागावयाची आहे. तेव्हां ज्ञानकोशाची माहिती फारच थोड्या विद्यार्थ्यांना असेल; असो.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश हा महाराष्ट्रीय दृष्टीनें रचला आहे. महाराष्ट्राच्या विद्वानांना स्वतंत्र बुद्धि आहे, त्यांना संशोधक दृष्टि आहे व व्यापक ज्ञानाची महति पटलेली आहे हें इतरांना केतकरांच्या ज्ञानकोशावरून कळून आलें. डॉ. केतकर हे पाश्चात्य देशांत जाऊन

तेथील चिकित्सात्मक अभ्यासाची आणि तुलनात्मक मांडणीची तऱ्हा हस्तगत करून इकडे आले व ती त्यांनीं आपल्या लेखांत आणि समाजावलोकनांत उपयोजिली. प्रत्येक गोष्टीची ते छाननी करून तीवरून तिच्या घटनेचा इतिहास दाखवीत. तिच्या भवितव्या-विषयीं सिद्धांत बांधीत.

प्राचीन वैदिक समाजाचा त्यांनीं जो इतिहास दिला आहे तो या कारणानें अगदीं नवीन आहे. पाश्चात्य पंडितांची नुसती शागिर्दी त्यांना आवडत नसे. इतिहासाचार्य राजवाड्यांप्रमाणेच त्यांच्या ठिकाणीं आत्मविश्वास फार दांडगा होता. त्यापाठीमागें विद्वत्ता पण तशीच होती. हिंदुस्थानात समाजशास्त्राचा सूक्ष्म अभ्यास ज्यांचा आहे, ज्यांनीं त्यासाठीं आपल्याला वाहून घेतलें आहे अशीं माणसें हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीं–त्यांतून महाराष्ट्रांत बहुधा नाहींच– असें म्हणावें लागे. पण डॉ. केतकर यांनीं ही उणीव भरून काढिली होती. आपल्या या खंडतुल्य देशांतील अनेक जाती, धर्म आचार, विचार, व्यवहार इ० त्यांनीं बारकाईनें पाहून, विचार करून त्यांसंबंधीं ठाम सिद्धांत बसविले होते. त्यांच्या कादंबऱ्या नीट वाच-ल्यास आपल्या समाजघटनेचा इतिहास चांगला कळून येतो. त्यांनीं ज्या कादंबऱ्या लिहिल्या त्या लोकांनीं वाचून नुसती करमणूक करून घ्यावी म्हणून नव्हे, तर त्यांनीं त्यांपासून सुधारणेचा कोणता प्रकार इष्ट, कोणता अनिष्ट हें स्वतःच ठरवावें व बुद्धिप्रामाण्यवादी बनावें याकरितां होय. सुधारक म्हणून ज्याचा डांगोरा पिटला जातो त्यांना समाजशास्त्राचें मुळींच ज्ञान नसतें, त्यामुळें त्यांनीं सांगितलेले सुधा-रणामार्ग चुकीचे आहेत, असें डॉ. केतकर निर्भीडपणें म्हणत.

वाङ्मयावर जगणारा वर्ग आपल्याकडे नाहीं, तो निर्माण झाला पाहिजे असें ते आपल्या उदाहरणानें दाखवून देत. इतर उद्योगधंद्यां-

# माझा आवडता ग्रंथकार
## ( डॉ. केतकर )

### चवथा दृष्टिक्षेप

डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांची योग्यता महाराष्ट्राला आज जी कांहीं कळली आहे, तीपेक्षां कितीतरी अधिक कळावयाची राहिली आहे. त्यांना महाराष्ट्राचे जॉनसन् असें कांहींजण म्हणतात पण जॉन्सन् या आंग्लकोशकारापेक्षां केतकरांनी, स्वदेशाची आणि स्वभाषेची कितीतरी अधिक सेवा केलेली आहे. कोठल्याहि भाषेचा दर्जा ठरवितांना तींत कोशस्वरूपी वाङ्मय किती आहे, उच्च आणि स्वतंत्र विचार प्रदर्शित करणारे ग्रंथ किती आहेत, नवे शास्त्रीय सिद्धान्त त्या भाषेंतून किती मांडलेले आहेत, यासारखें परीक्षण करण्यांत येत असतें. डॉ. केतकर यांनीं आपले भारदस्त विचारांचे ग्रंथ मराठींतच रचिले आणि सर्व जगांतील विविधज्ञान आपल्या महाराष्ट्रीय ज्ञानकोशांत खच्चून भरलें, यामुळें मराठीला जगांतील मोठमोठ्या भाषांत एक मानाचें स्थान लाभलें आहे.

त्यांनीं २३ भागांत पुरा केलेला मराठी ज्ञानकोश हा एक अपूर्व ग्रंथराज आहे. कोठलीहि माहिती यांत सांपडते. विद्यार्थ्यांना तर आपल्या अभ्यासांत याचें साहाय्य घेतल्यावांचून चालणार नाहीं, हें खरें; पण आपल्याकडे संदर्भ-ग्रंथांचा योग्य उपयोग करण्याची संवय अद्याप लागावयाची आहे. तेव्हां ज्ञानकोशाची माहिती फारच थोड्या विद्यार्थ्यांना असेल; असो.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश हा महाराष्ट्रीय दृष्टीनें रचला आहे. महाराष्ट्राच्या विद्वानांना स्वतंत्र बुद्धि आहे, त्यांना संशोधक दृष्टि आहे व व्यापक ज्ञानाची महति पटलेली आहे हें इतरांना केतकरांच्या ज्ञानकोशावरून कळून आलें. डॉ. केतकर हे पाश्चात्य देशांत जाऊन

तेथील चिकित्सात्मक अभ्यासाची आणि तुलनात्मक मांडणीची तऱ्हा हस्तगत करून इकडे आले व ती त्यांनीं आपल्या लेखांत आणि समाजावलोकनांत उपयोजिली. प्रत्येक गोष्टीची ते छाननी करून तीवरून तिच्या घटनेचा इतिहास दाखवीत. तिच्या भवितव्या-विषयीं सिद्धांत बांधीत.

प्राचीन वैदिक समाजाचा त्यांनीं जो इतिहास दिला आहे तो या कारणानें अगदीं नवीन आहे. पाश्चात्य पंडितांची नुसती शागिर्दी त्यांना आवडत नसे. इतिहासाचार्य राजवाड्यांप्रमाणेंच त्यांच्या ठिकाणीं आत्मविश्वास फार दांडगा होता. त्यापाठीमागें विद्वत्ता पण तशीच होती. हिंदुस्थानात समाजशास्त्राचा सूक्ष्म अभ्यास ज्यांचा आहे, ज्यांनीं त्यासाठीं आपल्याला वाहून घेतलें आहे अशीं माणसें हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीं-त्यांतून महाराष्ट्रांत बहुधा नाहींच- असें म्हणावें लागे. पण डॉ. केतकर यांनीं ही उणीव भरून काढिली होती. आपल्या या खंडतुल्य देशांतील अनेक जाती, धर्म आचार, विचार, व्यवहार इ० त्यांनीं बारकाईनें पाहून, विचार करून त्यांसंबंधीं ठाम सिद्धांत बसविले होते. त्यांच्या कादंबऱ्या नीट वाच-ल्यास आपल्या समाजघटनेचा इतिहास चांगला कळून येतो. त्यांनीं ज्या कादंबऱ्या लिहिल्या त्या लोकांनीं वाचून नुसती करमणूक करून घ्यावी म्हणून नव्हे, तर त्यांनीं त्यांपासून सुधारणेचा कोणता प्रकार इष्ट, कोणता अनिष्ट हें स्वतःच ठरवावें व बुद्धिप्रामाण्यवादी बनावें याकरितां होय. सुधारक म्हणून ज्याचा डांगोरा पिटला जातो त्यांना समाजशास्त्राचें मुळींच ज्ञान नसतें, त्यामुळें त्यांनीं सांगितलेले सुधा-रणामार्ग चुकीचे आहेत, असें डॉ. केतकर निर्भीडपणें म्हणत.

वाङ्मयावर जगणारा वर्ग आपल्याकडे नाहीं, तो निर्माण झाला पाहिजे असें ते आपल्या उदाहरणानें दाखवून देत. इतर उद्योगधंद्यां-

प्रमाणें वाङ्मयनिर्मितीचाहि एक धंदा आहे व तो करण्यास मोठ्या विद्वानांनीं आणि सुशिक्षितांनीं पुढें आलें पाहिजे. फावल्यावेळीं ग्रंथसंपादन करण्याचे दिवस गेले. त्यांनीं ज्ञानकोश प्रसिद्ध करण्या-साठीं व्यापारी पद्धतीची एक लिमिटेड कंपनी काढली व यशस्वी करून दाखविली. त्यांचाच कित्ता त्यांच्या ज्ञानकोशांतील सहकाऱ्यांनीं व इतरांनीं उचलून मरीव वाङ्मयोत्पादनासाठीं अशाच कंपन्या आज चालविलेल्या दिसतील. म्हणजे डॉ. केतकरांची परंपरा कायम आहे. *आपलीं* दीर्घाभ्यासानें तयार झालेलीं प्रामाणिक मतें समाजापुढें मांडण्याचें कार्य डॉ. केतकर यांनीं जितकें केलें तितकें कोणींच केलेलें नाहीं. त्यांना अर्धवटपणा, गुळचटपणा, खोटा शिष्टाचार मुळींच आवडत नसे. त्यामुळें ते जिवंतपणीं बऱ्याच मंडळींत अप्रिय झाले होते; त्यांना सामान्य लोक विक्षिप्त म्हणत. पण त्यांचा हा विक्षिप्त स्वभाव कशापोटीं उत्पन्न झाला आहे याचा विचार करणारे व त्यांना मानणारे फार थोडे. त्यांचे विचार पचविण्याचें सामर्थ्य त्यांच्या सम-कालीन विद्वानांतहि कमीच होतें. असें सामर्थ्य यापुढें जेव्हां महा-राष्ट्रांत निर्माण होईल तेव्हां डॉ. केतकरांसारख्या समाजहितैषी पंडिताची खरी योग्यता त्याला कळून येईल.

या अष्टपैलू पंडिताची भाषा तुम्हाला खडबडीत आणि इंग्रजी वळणाची वाटेल; पण तींत खालून किती तरी रसाचे झरे वहात आहेत. त्यांचें लेखन खरोखरीच ज्ञानदायी आणि विचारप्रवर्तक आहे. देशाभिमान आणि भाषाभिमान तर जागजागीं उमळून आलेला दिसेल.

"मराठी भाषेत महाराष्ट्राचा राज्यकारभार चालणें यालाच मी स्वराज्य समजतों. जो कायदा मराठींत मांडला नाहीं, तो कायदा महाराष्ट्रास बंधनकारक नाहीं. महाराष्ट्राचा जो गव्हर्नर असेल त्याची सही देखील मराठींत नसली तर ती बेकायदेशीर व्हावी."

कोण हा जळजळीत भाषाभिमान ! हा विलायतेहून एम्. ए., पीएच्. डी. होऊन आलेला, युरोपियन बाईशीं विवाहबद्ध झालेला गृहस्थ इतका स्वकीयांचा अभिमान बाळगतो याचें इंगित आपण ओळखा. महाराष्ट्रांत प्रखर तेजस्विता आहे, महाराष्ट्रांत थोर कर्तृत्वशक्ति आहे, हें डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनीं आपल्या जीवनक्रमावरून अखिल जनतेस पटवून दिलें.

[ निबंध–संकलन भाग १ ला ]

# डॉ. केतकर आणि महाराष्ट्रीय ज्ञानकोश

### दृष्टिक्षेप पांचवा

डॉ. श्री. व्यं. केतकर यांनीं 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' या तेवीस खंडांच्या अपूर्व संदर्भग्रंथाची रचना सिद्ध करून आपलें नांव मराठी भाषेच्या साहित्यांत अजरामर करून ठेविलें आहे. प्रस्तुत ग्रंथाची प्रत्यक्ष रचना करावयास जरी बारा वर्षें लागलीं, तरी त्याची मूळ कल्पना त्यांच्या मनांत उदय पावून ती कृतींत उतरेपर्यंत तिच्या अनेक पायऱ्या होत्या आणि कालाची एकूण मर्यादा याहिपेक्षां दीर्घ होती. केतकर अमेरिकेंत गेले त्याच्या मुळाशीं वाङ्मय कार्याहून अगदीं निराळी कल्पना होती, ही गोष्ट त्यांनीं स्वतःहि अनेक परिचित गृहस्थांशीं बोलतांना उघड केली होती. परंतु येथें परत आल्यावर मात्र त्यांनीं आपलें बुद्धिबल व कर्तृत्व मराठी वाङ्मयाच्या सेवेस वाहिलें, ही गोष्ट सर्वश्रुत आहे. अमेरिकेस जाण्यापूर्वीच त्यांनीं अमरावतीचे आपले स्नेही श्री. बाळकृष्ण संतुराम गडकरी यांच्या सहकार्यानें 'महाराष्ट्र-वाग्विलास' या नांवाचें एक मासिक पुस्तक कॉलेजमध्यें शिक्षण घेत असतांच सुरू केलें होतें व परदेशांत असतांना कांहीं स्फुट कविता रचिली होती. तसेंच हिंदुस्थानास परत येण्यापूर्वीच महाराष्ट्र भाषेच्या सेवेकडे त्यांच्या मनाची निश्चित अशी प्रवृत्ति होत असावी असें वाटतें. कां कीं, ते जेव्हां पीएच. डी. च्या परीक्षेस प्रथम बसले तेव्हां त्यांना ती पदवी पहिल्या वर्षीं देण्यांत आली नाहीं याचें एक कारण, त्यांचें युरोपीय भाषांचें ज्ञान अधिक खोल असावयास पाहिजे, असा त्यांच्यावर आक्षेप घेण्यांत आला होता. तेव्हां त्यांनीं आपल्या परीक्षकांस पाठविलेल्या पत्रांत असें म्हटलें होतें कीं, "मला माझ्या देशांत स्वभाषेंतून लेखनकार्य करावयाचें असल्यामुळें युरोपीय

भाषांच्या विशेष ज्ञानाचें एवढें महत्त्व नाहीं." तसेंच केतकरांना अमेरिकेंत तीन वर्षे बडोदें सरकारची जी शिष्यवृत्ती लाभली होती तिची अट ते परत आल्यावर त्यांनीं कांहीं काल त्यांची सेवा करावी अशी होती; परंतु हिंदुस्थानांत आल्यानंतर आपण मराठी भाषेंतच कांहीं कार्य करावयाचें योजिलें असून तशी सोय, म्हणजे मराठी विश्वविद्यालय इत्यादि जर बडोद्यांत होणार असेल तर आपण तेथें सेवा करण्यास येऊं, असें डॉ. केतकर यांनीं श्रीमंत सयाजीराव महाराजांस कळविलें होतें; आणि तशी सोय तेथें नसल्यामुळें म्हणा किंवा कांहीं अन्य कारणामुळें म्हणा, त्यांच्या नोकरीच्या अटीसंबंधीं विशेष आग्रह बडोदें सरकारनें धरला नाहीं एवढें खरें.

अर्थात् मराठींत लेखनकार्य करण्याची डॉ. केतकर यांची मनीषा तेव्हांच व्यक्त झाली होती. पण मराठींत लेखनकार्य करण्याचें जरी त्यांनीं प्रथमपासून योजिलें होतें, तरी 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' हेंच कार्य त्यांनीं कसें ठरविलें या संबधानेंहि थोडा पूर्वेतिहास आहे. इकडे आल्यावर श्री. वि. का. राजवाडे यांच्याविषयीं त्यांच्या मनांत विशेष आदर असल्यामुळें त्यांच्याशीं त्यांचा प्रत्यक्ष परिचय होऊन ऐतिहासिक संशोधनादि कार्याविषयीं त्यांचा पत्रव्यवहार झाला होता; आणि ऐतिहासिक कागदपत्रांचें संशोधन—प्रकाशन हें कार्य किती दुर्घट व श्रमाचें आहे, तसेंच त्याला द्रव्य किती विपुल पाहिजे व तें मिळणें कसें कठीण आहे याबद्दल एक विस्तृत पत्र श्री. राजवाडे यांनीं डॉ. केतकर यांस पाठविलें होतें. हें पत्र मला कै. श्री. अच्युत सिताराम साठे यांच्याकडे (ते बुलढाण्यास सबजज्ज असतांना) वाचावयास मिळालें होतें आणि तें बरेंच महत्त्वाचें असून प्रकाशित करण्यासारखें आहे. याप्रमाणें डॉ. केतकर यांनीं अनेक कार्यांसंबंधीं प्रथम विचार करून शेवटीं '**महाराष्ट्रीय ज्ञानकोश**' हें कार्य निश्चित केलें असावें. ते अमेरिकेंत असतां तेथें प्रकाशित

होणाऱ्या ‘ इंटर नॅशनल सायक्लोपीडिया ’ नांवाच्या एका ज्ञान-कोशाचे कांहीं दिवस प्रचारक होते; त्या वेळीं तो ज्ञानकोश प्रसिद्ध करणाऱ्या कंपनीनें आपल्या जाहिरात पत्रकांत ‘ एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका ’ आणि इतर ज्ञानकोश यांमधील वैगुण्यांचें वर्णन करून आपला ग्रंथ त्यापेक्षां कसा वरचढ आहे हें दाखविलें होतें. या कार्य पद्धतीचा व लेखनाचा त्यांच्या मनावर बराच परिणाम झाला होता. तसेंच हिंदुस्थानांत आल्यानंतर त्यांनीं जो देशभर प्रवास केला त्यांत त्यांनीं बंगाली विश्वकोश. आणि त्याच वेळीं प्रकाशित होत असणारा एक हिंदी विश्वकोश हे पाहिले होते. विशेषतः मद्रास येथील डॉ. लक्ष्मीपति यांच्या साहाय्यानें श्री. के. व्ही. लक्ष्मणराव या महाराष्ट्रीय आंध्र पंडितानें अंगावर घेतलेल्या ‘ आंध्रविज्ञानसर्वस्वमु ’ या तेलगु ज्ञानकोशाचें कार्य डॉ. केतकर यांच्या अवलोकनांत येऊन त्यांच्याशीं त्यांनीं या बाबतींत बरीच चर्चा केली होती व त्यामुळें ‘ महाराष्ट्रीय ज्ञानकोश ’ रचनेच्या विचाराला विशेष चालना मिळाली. या वेळीं तेलगु ज्ञानकोशाची सर्व योजना छापलेली असून त्याचे दोन खंडहि प्रकाशित झाले होते. याप्रमाणें त्यांनीं ‘ महाराष्ट्रीय ज्ञानकोश ’ हें कार्य आपलें मराठी भाषेंतील आद्य कर्तव्य म्हणून निश्चित केलें.

ज्ञानकोश—रचनेचें कार्य हातीं घ्यावयाचें निश्चित झाल्यावर डॉ. केतकर यांनीं तो उद्योग नागपुरास सुरू करण्याचें ठरविलें. याच्या मुळाशीं मुख्यत्वें त्यांचा प्रांतिक अभिमान होता. त्यांचा जन्म रायपुरास आणि हायस्कूलचें शिक्षण अमरावतीस झालें असल्यामुळें त्यांस नागपूर-वऱ्हाडाविषयीं अधिक आपलेपणा वाटे. तसेंच त्यांच्या बरोबरचे बरेच विद्यार्थी आतां तेथें वकील वगैरे असून चांगल्या स्थितींत होते व त्यांचें साहाय्य मिळणें सुलभ होतें. त्या मानानें त्यांना स्वतःला पुण्यास महत्त्व कमी; व पुणेकरांपैकीं कांहीं

प्रमुख मंडळीस अनुकूल करून घेऊन त्यांस आपल्या कार्यांत महत्त्वाचें स्थान दिल्याशिवाय तें कार्य पुण्यास सुरू करणें शक्य झालें नसतें. उलट, असलें कार्य नागपुरास नवीन असल्यामुळें प्रांताभिमानानें त्यांस आरंभींच तिकडे उत्तेजन मिळणें स्वाभाविक होतें.

यानंतर ज्ञानकोशाच्या सांपत्तिक संघटनेविषयीं लोकांत 'भवति न भवति' होऊन, प्रत्येकीं १०० रुपयांचे ९०० भाग काढून लिमिटेड कंपनी उभारावी व हप्त्याहप्त्यानें वर्गणी घेऊन विशेषतः सुशिक्षित मध्यम वर्गांतून ग्राहक मिळवावे, असें ठरलें आणि त्याप्रमाणें नागपुरचे एक प्रसिद्ध वकील व 'उद्यम' मासिकाचे संपादक श्री. माधवराव पाध्ये आणि अकोला येथील डॉ. केतकरांचे आप्त, चाहते व वकील श्री. नारायणराव फडके यांच्या आद्य पुरस्कारानें **'महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ लिमिटेड'** ही कंपनी सुमारें एका वर्षाच्या सतत खटपटीनंतर ता. ८ जुलै १९१६ रोजीं नागपूर येथें नोंदण्यांत आली. ता. ६।१।१९१७ रोजीं पहिली भागमजुरी करण्यांत आली, त्या वेळीं मंडळाचे २४१ भाग दिले गेले. ता. ४।३।१७ ला कार्यारंभास परवानगी मिळाली; आणि ता. ३१।३।१७ च्या सभेंत ज्ञानकोशाची संपूर्ण योजना चालकांपुढें मांडण्यांत येऊन तदनुसार उद्योग सुरू झाला.

ज्ञानकोशरचनेस योग्य लेखकवर्ग मिळविण्यासाठीं डॉ. केतकर यांनीं बरीच खटपट केली. ज्या लेखकांस पूर्वीं कोणत्याना कोणत्या कारणांनीं महत्त्व आलेलें होतें अशा बहुतेक लेखकांशीं त्यांनीं पत्रव्यवहार केला. अनेकांस त्यांनीं कचेरींत येऊन पगारी साहाय्यक होण्यास विनंती केली. परंतु बऱ्यापैकीं प्रत्यक्ष लेखनकार्य केलेल्या कोणत्याहि लेखकाचें साहाय्य त्यांस मिळालें नाहीं. कांहीं कांहींनीं विशिष्ट विषयावर लेख लिहिण्याचें मान्य केलें; परंतु प्रत्यक्ष असे फारच थोड्या लेखकांकडून लेख आले; आणि तेहि जुन्या कस-

लेल्या लेखकांकडून प्राय: मुळींच आले नाहींत. याचें एक कारण म्हणजे, प्रथितयश लेखकांसहि ज्ञानकोशांत लेख लिहिण्यासंबंधीं निश्चित कल्पना नसावी असें कांहीं आलेल्या लेखांवरूनच दिसलें, तर कांहींस आपले लेख संपादकीय चाळणींतून जावे हें रुचलें नसावें व दुसऱ्या कांहींना आपला लेखनव्यवसाय स्वतंत्रपणेंच चालविणें इष्ट वाटलें असावें. एकंदर ज्ञानकोशरचनेस बाहेरचें लेखनसाहाय्य शास्त्रीय विषयांखेरीज इतर विषयांवर मुळींच झालें नाहीं म्हटलें तरी चालेल; आणि त्यांतहि कांहीं शास्त्रीय विषयांच्या लेखकांनीं प्रथम काम अंगावर घेऊन मागाहून तें सोडून दिल्यामुळें बहुतेक सर्व कार्य कचेरींतच करून घ्यावें लागलें.

सामान्यत: मार्च १९१७ पासून जुलै १९१९ पर्यंत नागपुरास मुख्य कार्यालय असून तेथें प्राथमिक लेखन बरेंच झालें. परंतु मध्यंतरीं डॉ. केतकर व इतर चालक याच्यामध्यें अनेक बाबतींत मतभेद होऊन कामास अडथळेहि होऊं लागले. तसेंच तेथें मिळणारा लेखक वर्ग लेखनकार्यास परिचित नसल्यामुळें फारसा समाधानकारक नव्हता. छापण्याचें कामहि ज्या गतीनें व्हावें अशी अपेक्षा होती त्या गतीनें होणार नाहीं, हें 'महाराष्ट्र वाङ्मयसूचि'च्या छपाईवरून दिसून आलें. तेव्हां पुण्यास राहून ज्ञानकोशरचना केल्यास संपादकीय कार्य विशेष सुलभतेनें करतां येईल अशी मीं सूचना केली; व त्याप्रमाणें जुलै १९१९ मध्यें संपादकीय कचेरी वास्तविक मुख्य कचेरीच–पुण्यास आणण्यांत आली. यापुढें कंपनीची नोंदलेली कचेरी जरी नागपुरास होती तरी ती नांवापुरती राहिली आणि सर्व कार्य पुण्यासच होऊं लागलें. या गोष्टीला नागपूरकर मंडळींचा विरोध होता; तथापि कार्याच्या दृष्टीनें झाली हीच व्यवस्था शेवटीं यशस्वी ठरली. यापूर्वींच पुण्यास एक संपादकीय शाखा उघडण्यांत आली होती. परंतु मुख्य कचेरी पुण्यास येण्यापूर्वीं जें कार्य पुण्यास

झालें होतें त्यावरून ज्ञानकोशाच्या लेखनाची कल्पना लेखकवर्गास यथायोग्य नसावी असें दिसून आलें; आणि त्या लेखनापैकीं फारच थोडा भाग ज्ञानकोशाच्या प्रत्यक्ष उपयोगीं पडला.

ज्ञानकोशांतील लेखांची निवड प्रथम न करतां अनेक ग्रंथ वाचून त्यांतील ज्ञानकोशास उपयुक्त भागाचे वेंचे काढावयाचे व असे अनेक वेंचे तयार झाल्यावर ज्यास स्वतंत्र लेखाचें स्थान देतां येईल त्यास तसें स्थान देऊन बाकीच्या टिपणांचा कोणत्यातरी लेखांत अंतर्भाव करावयाचा, अशी ही कार्यपद्धति होती. ग्रंथ वाचन व टिपणें काढणें हें विषयानुरोधानें करावयाचें असून याकरितां ज्ञान-कोशाच्या १००० पृष्ठांची विभागणी विषयवार कशी करावयाची याची एक योजना तयार केली होती व तीस अनुसरून निरनिराळीं टिपणें काढण्यांत येत. एकंदर ग्रंथवाचन अफाट झालें; पण त्यांतल्या-त्यांत उपयुक्त व थोडक्यांत माहिती ज्यांत मिळेल अशा ग्रंथांची प्रथम निवड करण्यांत येई. यामुळें ज्यांच्या डोळ्यांसमोर एकंदर योजना होती त्यांनीं केलेली निवड शेवटीं अधिक फलदायी झाली आणि पुणें शाखेची तितकी फलदायी झाली नाहीं.

ज्ञानकोशलेखनाची पूर्व तयारी म्हणून मराठींत तोंपर्यंत प्रसिद्ध झालेल्या वाङ्मयाचा पूर्ण उपयोग करावयाचा अशी दृष्टि होती आणि त्याकरितां मराठी भाषेंतील वाङ्मयाचा आढावा घेण्यासाठीं श्री. दाते व श्री. देशमुख यांच्याकडून 'महाराष्ट्रीय वाङ्मयसूचि' हा मराठींतील पुस्तकें व मासिकांतील लेख यांची माहिती देणारा संदर्भग्रंथ मुद्दाम तयार करण्यांत आला. याची हस्तलिखित प्रत अवघ्या सत्तर दिवसांत तयार झाली, पण ती छापावयास एक वर्ष लागलें! मात्र यामुळें 'ज्ञानकोश' छापण्याच्या कामीं काय अडचणी येतील याची बरीच कल्पना आली.

जुलै १९१९ मध्यें संपादकीय मुख्य कचेरी पुण्यास आल्यानंतर काम सुरळीत चालूं झालें. 'प्रस्तावनाखंड' म्हणून पहिले पांच भाग सांस्कृतिक इतिहासरूपानें द्यावयाचें, ही कल्पना पुणें येथेंच प्रथम निघाली.

पहिली योजना ५०० पृष्ठांचे दोनच भाग प्रास्ताविक म्हणून द्यावयाचे अशी होती; पण ती पुढें बदलून तिचा पांच भागांत विस्तार करण्यांत आला. असें करण्यांत या विद्वत्तापूर्ण लेखनामुळें वाचकांच्या मनावर ज्ञानकोशग्रंथासंबंधीं अनुकूल परिणाम करणें हा एक हेतु होता. कारण, पहिलाच विभाग अकारविल्ह्याचा निघता तर लोकांस तो इतका आकर्षक व महत्त्वाचा वाटला नसता. अर्थात् सामाजिक व राष्ट्रीय प्रश्नांसंबंधीं विवेचक असा भारदस्त मजकूर देणारा '**हिंदुस्थान आणि जग**' हा पहिला खंड बाहेर पडल्यामुळें वाचकांचा ज्ञानकोशासंबंधीं एकदम अनुकूल ग्रह झाला, आणि काहीं विरुद्ध टीका करावयास उत्सुक असलेल्या मंडळींचीं तोंडें बंद पडलीं. किंबहुना या आद्य प्रस्तावना खंडाचा स्वीकार जनतेकडून विशेष आदरपूर्वक झाल्यामुळें पुढील भागासंबंधीं फारशी चिकित्सा झाली नाहीं; आणि अनेक वाचकांस या पहिल्या पांच भागांत भरपूर खाद्य मिळालें.

पुण्यास कचेरी आल्यावर ती पुनः नागपुरास नेण्याचा, किंबहुना डॉ. केतकर यांजकडे फक्त संपादकीय कार्य तेवढें ठेवून व्यवस्थापक दुसरा नेमण्याचा प्रयत्न नागपूरकर मंडळींनीं केला व डॉ. केतकर यांनीं योग्य मनुष्य मिळाल्यास त्याच्याकडे व्यवस्थापकाचें काम देण्याची तयारीहि दाखविली. परंतु व्यवस्थापकाचें काम घ्यावयाचें म्हणजे पैसे जमविण्याची जोखीम अंगावर घ्यावयाची व ती घेण्यास तिकडील मनुष्य तयार होईना. आणि ज्या गृहस्थांचें नांव पुढें आलें होतें त्यांनींहि तें काम अंगावर घेण्याचें टाळलें,

यामुळें नागपूरकर मंडळींची ही सर्व खटपट फुकट गेली. मात्र या काळांत डॉ. केतकर यांस बराच त्रास झाला. यासंबंधीं त्यांनीं एका चालकास लिहिलेल्या पत्रांतहि ही गोष्ट निदर्शनास आणली होती. " माझ्या डोक्यांत कांहीं निरनिराळे कप्पे नाहींत कीं एक उघडा ठेवून दुसरा बंद करतां यावा; व त्यामुळें व्यवस्थेसंबंधीं चाललेल्या घोटाळ्यामुळें संपादकीय कामावरहि परिणाम होऊन तें माझ्यानें सध्यां बरोबर होत नाहीं. " असें त्यांनीं म्हटलें होतें. या वेळीं ज्ञानकोशाचे पहिले दोन भाग मुंबईस छापत होते. या अस्वस्थतेमुळें एकंदर कामाची बरीच हानि झाली व सांपत्तिक अडचणीस प्रारंभ या कालापासूनच झाला. परंतु पुढें पुण्यास कचेरी स्थिर झाल्यावर येथीलच चालक मंडळी निवडली गेली व त्यांनीं डॉ. केतकर यांस जवळजवळ पूर्ण स्वातंत्र्य देऊन स्वतः द्रव्यसाहाय्य केलें. यामुळें कचेरीच्या बाबतींत त्यांस फारशी व्यग्रता भासली नाहीं.

पुण्यास कचेरी आणल्याचा परिणाम ग्राहकवर्गावरहि झाला. पुणें शहरांत व इकडील प्रांतांत ग्राहकवर्ग बराच वाढला. परंतु नागपूर—वऱ्हाड या भागांत मात्र यापुढें ग्राहकांची संख्या फारशी वाढली नाहीं. तथापि प्रत्यक्ष पुणें शहरीं नागपुरापेक्षां अधिक ग्राहक मिळाले व मुंबईनें तर पुष्कळच साहाय्य केलें. याकरितां मुंबईस एक शाखा पूर्वींच काढली होती; पण ग्राहकांची संख्या प्रत्यक्ष ज्ञानकोशाचे भाग लोकांस मिळूं लागल्यावर लवकर वाढली.

डॉ. केतकर यांस संपादकीय व व्यवस्थापकीय अशीं दोन्ही कार्यें करावयाचीं असत. परंतु त्यांपैकीं संपादनाचें प्रत्यक्ष कार्य करण्यास त्यांस फारच थोडी फुरसत मिळे व त्याची विभागणी बरीच झाली होती. ते स्वतःहि " मी एकचतुर्थांश संपादक व तीनचतुर्थांश व्यवस्थापक किंवा प्रचारक आहें " असें म्हणत; आणि त्यामुळें त्यांना बराचसा वेळ पैसा जमवून आणण्याकडे खर्च करावा लागे. या

कामीं ते किती परिश्रम घेत हें सर्वश्रुतच आहे. मुंबईस कित्येक वेळां भर पावसांत ते सकाळपासून जे कचेरींतून पायीं बाहेर पडत ते रात्रीं परत येत. एकदां तर पावसानें भिजलेले सर्व कपडे एका मित्राकडे शेगडीवर वाळवून पुन: घालण्याचा प्रसंग त्यांजवर आला होता! त्यांना विशेष पीडा झाली ती पैसा जमविण्याच्या कामीं. तथापि ते अत्यंत आशावादी व प्रयत्नवादी असत. ते कधींहि हताश झाले नाहींत. त्यांचा एक मोठा गुण म्हणजे ते उद्यांबद्दल नेहमीं निश्चित असत. पुढें काय होईल याची त्यांस कधींहि पर्वा नसे व त्यामुळें ते अनेक धाडसाच्या गोष्टी करीत. उदाहरणार्थ, ज्ञानकोशाकरितां छापावयाचें यंत्र घेतेवेळीं त्यांच्या खिशांत फक्त शंभर रुपये होते; पण तेवढें आगाऊ भरून त्यांनीं चार हजार रुपये किंमतीच्या यंत्राची मागणी केली आणि पुढें अनेक मित्रांच्या मदतीनें ती पुरी केली. हें यंत्र घेतल्यामुळेंच पुढील भाग सत्वर बाहेर पडले व एकंदर कार्य पूर्ण झालें.

ज्ञानकोशाच्या कार्याविषयीं लोकांची सहानुभूति चांगली होती व त्यामुळें डॉ. केतकर यांचा एककल्ली स्वभावदोषहि फारसा त्या कार्याच्या आड आला नाहीं. इतकेंच नव्हे, तर एकदोन प्रसंगीं ज्ञानकोशासंबंधीं टीका करणारी मंडळीहि निषेधकांच्या मनोवृत्तींतून अभिनंदन करण्याच्या मनोवृत्तींत शिरली. तथापि प्रस्तुत कार्यास जनतेची आरंभीं जितकी निर्मळ सहानुभूति होती तितकी ती शेवटपर्यंत टिकली नाहीं. तरी पण एकंदरीनें लोकांची कार्याला मदत करण्याचीच बुद्धि दिसून आली व तें पूर्ण व्हावें अशी सर्वांचीच इच्छा होती, हें अनेक वेळां अनुभवास आलें; आणि स्पष्ट विरोध असा कोणाकडूनहि झाला नाहीं. आरंभींच्या सहानुभूतीची ऊर्मि कमी होण्यास अनेक कारणें होतीं. एक तर डॉ. केतकरांचें फार थोड्या लोकांशीं खरोखर जमत असे. त्यांचा स्वभाव एककल्ली व अधिक

सडेतोड असल्यामुळें व्यावहारिक मनुष्य ज्या गोष्टी स्पष्टपणें बोलणार नाहीं त्या ते चटकन बोलून टाकीत. यामुळें कांहीं लोकांस ते असंतुष्ट करीत. त्यांच्या परदेशीय विवाहामुळेंहि कांहीं मंडळीचा त्यांच्यासंबंधीं प्रतिकूल ग्रह झाला. परंतु ते जितके स्पष्टवक्ते अथवा फटकळ तितकेच दिलदार असत. त्यांच्या मनांत केव्हां कोणाबद्दल किंतु नसे. झाल्यागेल्या गोष्टी विसरून मनमोकळेपणानें पुनः मिळतें घेण्यास ते सदा तयार असत; आणि आपली बाजू चूक असल्यास मागें घेण्यासहि ते कधीं अनमान करीत नसत.

डॉ. केतकरांशीं संभाषण करण्यांत अनेकांस आनंद वाटत असे; आणि थोडक्या वेळांत ते अनेक विषयांचा ऊहापोह गमतीदार रीतीनें करून करमणूक व ज्ञान या दोन्ही गोष्टींची प्राप्ति श्रोत्यांस करून देत असल्यानें ते कोठेंहि बसले तरी त्यांच्याभोंवतीं श्रोत्यांचा घोळका असावयाचा. कोणत्याहि समाजांत आपण अनेक लोकांच्या लक्षाचें केंद्र झालें पाहिजे असें ते म्हणत. तसेंच एखाद्या सभेंत एखादें आश्चर्यकारक विधान ठोकून देऊन ते आपणांकडे सर्वांचें चित्त वेधीत. " आपल्यावर अनुकूल प्रतिकूल कशी तरी टीका झाली पाहिजे, तरच आपणांकडे व आपल्या कार्याकडे लोकांचें लक्ष जाईल आणि आपली जाहिरात होईल", असें त्यांचें म्हणणें असे; आणि अशा संधीचा ते नेहमीं उपयोग करून घेत. उपेक्षेसारखी हानि नाहीं असें ते म्हणत. पण त्यांच्या या प्रकारच्या कांहीं गोष्टी लोकांस फारच विपरीत वाटत व त्यामुळें कांहीं लोकांचा ग्रह त्यांच्याबद्दल प्रतिकूलहि होत असे. त्यांचे जाहिरात करण्याचे अनेक मार्ग असत व घरांतील भुताटकी हा प्रकार देखील त्यांपैकींच असावा अशी कित्येकांची समजूत होण्यास कारणें झालीं होतीं.

ज्ञानकोशाच्या एकंदर कार्यास चार लक्ष रुपये लागले; व हे सर्व महाराष्ट्रीय मध्यम वर्गाकडून पुरविले गेले ! सरकार किंवा संस्थानिक

यांच्याकडून म्हणण्यासारखें साहाय्य झालें नाहीं. सर्वांत मोठी मागणी म्हणजे बडोदें सरकारची होय आणि ती वीस ग्रंथांची होती. ती मिळविण्यास मी जेव्हां बडोद्यास गेलों होतों तेव्हां मला विशेष साहाय्य कोणाकडून झालें नाहीं. परंतु कै. शारंगपाणि यांनीं मात्र माझी पूर्वीची फारशी ओळख नसतां आपण होऊन विद्याधिकाऱ्यांस पत्र दिलें व त्याचा चांगला उपयोग झाला. विद्याधिकाऱ्यांनीं ( हे युरोपियन गृहस्थ होते ) स्वतः पन्नास प्रती घेण्याचें आश्वासन दिलें व तशी शिफारसहि केली; परंतु कौन्सिलांत फक्त वीस प्रतींस मंजुरी मिळाली ! श्रीमन्महाराजांची या कामीं भेट होऊन विशेष बोलणें झालें नाहीं त्यामुळें यापेक्षां अधिक साहाय्य होऊं शकलें नाहीं. मुंबई सरकारनें सर्व ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर पंधरा प्रतींची मागणी केली व ते पैसे श्री. अडवानी याचें कागदाचें देणें फेडण्यास उपयोगी पडले. इंदूरच्या ग्रंथोत्तेजक मंडळीनें पहिल्या पांच भागांच्या वीस प्रती घेऊन एक हजार रुपये दिले;पण ते संच पुढेंहि पूर्ण केले नाहींत. याखेरीज ठळक अशी गिऱ्हाइकी किंवा देणगी कोणाचीच मिळाली नाहीं. सर्व पैसा महाराष्ट्रांतील मध्यम वर्गाकडून मिळाला. अर्थात त्यावेळीं लोकांची सांपत्तिक स्थिति बरीच अनुकूल होती. आजकाल ग्रंथखरेदीच्या कामीं एकरकमीं शंभर रुपये खर्च करणारे गृहस्थ फारच विरळा; आणि अशा परिस्थितींत एवढें मोठें कार्य शक्यहि झालें नसतें.

ज्ञानकोशाच्या ग्राहकवर्गात समाजाच्या वरच्या थरापासून खालच्या थरापर्यंत सर्व प्रकारचे लोक असत. वकील, डॉक्टर, प्रोफेसर, शिक्षक हे तर ज्ञानकोशाचे आधारस्तंभच होत; परंतु डॉ. केतकर यांनीं उपहारगृहाचे मालक, वॉशिंग कंपनीचे एक मुसलमान चालक व एका केशकर्तनालयाचे मालक यांसहि ग्राहक केले होते ! महंमद पैगंबरासंबंधींच्या मजकुराबद्दल वादविवाद सुरू झाल्यावर

एका निषेधपर सभेच्या अध्यक्षासहि त्यांनीं ग्राहक केलें आणि एका पंथाच्या धर्मगुरूकडून शालीचा अहेर मिळविला ! याप्रमाणें प्रचारकाच्या जातिवंत गुणांचा प्रकर्ष त्यांच्या ठिकाणीं झाला होता, ही गोष्ट अनेक वेळां स्पष्ट झाली आहे. म्हणूनच निर्धन महाराष्ट्रांतून एवढा पैसा ते उभा करूं शकले. त्यांची स्वतःची अपेक्षा प्रथम हें काम एक लक्ष रुपयांत होईल अशी होती; पण प्रत्यक्ष उलाढाल चार लक्षांची झाली. श्री. राजवाडे यांनीं तर या कार्यास दहा लक्ष रुपये लागतील असें म्हटलें होतें !

ज्ञानकोशाचें कार्य करतांना केवळ लोकांस पुस्तकी ज्ञान देण्यापेक्षां महाराष्ट्रात वैचारिक चळवळ उत्पन्न करावी अशी डॉ. केतकरांची इच्छा होती. त्याप्रमाणें त्यांचीं प्रचारकार्य करतांना होणारीं व्याख्यानें नेहमीं विचारप्रवर्तक असत. तसेंच या कार्याच्या अनुषंगानें महाराष्ट्रांत बरेंचसें संशोधन व्हावें व कांहीं विषयांवर तरी मराठींत अशी ग्रंथरचना व्हावी कीं, ती वाचावयास अन्यभाषीय पंडितांस मराठी शिकण्याची इच्छा व्हावी, अशी त्यांची महत्त्वाकांक्षा असे. या दृष्टीनें ' हिंदुस्थान आणि जग ' या ज्ञानकोशाच्या पहिल्या खंडांतील त्यांचें समाजशास्त्रीय आणि दुसऱ्या व तिसऱ्या खंडातील वेदविषयक लेखन फार महत्त्वाचें आहे. वेदांचा अभ्यास कसा करावा आणि एकंदर वैदिक वाङ्मयाचें अध्ययन करण्यास यज्ञसंस्थेचा व तत्कालिन समाजाचा सूक्ष्म अभ्यास करणें किती आवश्यक आहे, हें ' वेदविद्या ' या खंडांत प्रतिपादिलें आहे. या कामीं शास्त्रीमंडळी व आधुनिक विद्वान यांची सांगड घालून बरेंचसें वैदिक वाङ्मयाचें पृथक्करण व अभ्यास ज्ञानकोशकार्यालयांत करून घेण्यांत आला; आणि त्यामुळें ' वेदविद्या ' व ' बुद्धपूर्व जग ' या खंडांमध्यें उपयुक्त अशी बरीच माहिती देऊन सामान्य लोकांस या विषयाची गोडी लावण्याचा प्रयत्न करण्यांत आला.

ज्ञानकोशाची मूळ योजना, प्रत्येकीं पांचशें पृष्ठांचे वीस भाग करून एकंदर दहा हजार पृष्ठांपैकीं पांच हजार पृष्ठें सांस्कृतिक व पांच हजार पृष्ठें शास्त्रीय मजकूर द्यावयाचा अशी होती; परंतु ही योजना शेवटपर्यंत टिकली नाहीं. शास्त्रीय विषयांस लेखक मिळणें फार कठीण गेलें. कारण, जे शास्त्रांत निष्णात होते त्यांस मराठींत लेखन करणें मुळींच अवगत नव्हतें. यामुळें शास्त्रीय लेख तयार करण्यास व तपासण्यास पंचाईत पडली. कांहीं लेखकांनीं मदत देण्याचें प्रथम हौसेनें कबूल केलें पण पुढें लेखनाच्या कामांतील अडचणी कळून येऊन त्यांच्यानें तें कार्य पार पडलें नाहीं. कांहीं लेखकांच्या मदतीस कचेरीकडून शास्त्रीय पदवीधर लेखक देण्यांत आले, तरीहि त्यांजकडून कार्य करून घेणें त्यांस शक्य झालें नाहीं. शास्त्रीय लेखनांत परिभाषेची एक अडचण होती. ती दूर करण्याकरितां परिभाषा अथवा शास्त्रीय संज्ञा कशा तयार कराव्या यासंबंधीं चर्चा करण्यांत आली होती; व जुन्या प्रसिद्ध झालेल्या सर्व मराठी ग्रंथांतील शास्त्रीय संज्ञा जमविण्यांत आल्या होत्या. परंतु ही अडचण दूर होऊं शकली नाहीं. तथापि रसायनशास्त्रांतील परिभाषेची एक योजना तयार करण्यांत येऊन ती सहाव्या भागाच्या आरंभीं दिली आहे. याप्रमाणें इतरहि शास्त्रांतील कांहीं संज्ञा तयार करण्यांत आल्या होत्या व तें साहित्य संज्ञाकोशास बरेंच उपयुक्त होण्यासारखें आहे. एकंदरींत ज्ञानकोशांतील शास्त्रीय विषयांवरील लेख समाधानकारक झालें असें म्हणतां येणार नाहीं. तथापि गणित, ज्योतिष, वैद्यक, रसायन, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, स्थापत्य व शेतकी या शास्त्रांतील लेख तयार करण्यास आम्हांस इतरांचें बरेंच साहाय्य झालें. गणितशास्त्रांतील लेख तपासण्याचें कार्य करण्याचें माझ्या एका परदेशांतील महाराष्ट्रीय मित्रानें कबूल केल्यावरून त्याच्याकडे सर्व लेखांच्या नकला करून पाठ-

विल्या; पण पुढें त्या परत आल्या नाहींत व पत्राचें उत्तरहि येईना. सुदैवानें मला मूळ लेख पाठविण्याऐवजीं त्यांच्या नकला पाठविण्याची बुद्धि झाल्यामुळें मूळ लेख तरी आमचेजवळ राहिले !

सांस्कृतिक भागांतील लेख अनेक उपलब्ध साधनांवरून तयार करावयाचे होते व या कामीं शक्य ती खटपट कचेरीनें केली. पण मूळच्या वीस भागांपैकीं प्रस्तावनेस पांच भाग. म्हणजे तीन हजार पृष्ठें खर्ची पडल्यामुळें पुढें बरीच कुचंबणा झाली. प्रस्तावना खंडामुळें एक महत्त्वाचें लिखाण प्रकाशित झालें, तरी त्यामुळें ज्ञानकोशांतील लेखनाचा संकोच करावा लागला. कचेरींत तयार असलेला सर्व मजकूर समाविष्ट करणेंहि जड जाऊं लागलें आणि तयार मजकुरांत आजतागायतपणा राखण्याच्या कामीं पुढेंपुढें संपादकवर्गास फार अडचण होऊं लागली. ती इतकी कीं, शेवटीं डॉ. केतकर यांनीं जवळजवळ नवीन लेखन करूंच नये अशी सूचना दिली, तरीहि वीस भागांचे एकवीस भाग झाले. सूची प्रथम वीस भागांतच अंतर्भूत व्हावयाची होती; परंतु तो खंड स्वतंत्र करण्याची माझी सूचना ग्राह्य झाली; आणि हिंदुस्थान व महाराष्ट्र हे दोन स्वतंत्र खंड करावे अशीहि योजना करण्यांत आली. त्यांपैकीं हिंदुस्थानखंड सूचीखंडाच्या पूर्वींच प्रसिद्ध झाला; पण महाराष्ट्रखंड संकल्पांतच राहिला आणि त्यास दिलेले संदर्भ अर्थशून्य राहिले ! मात्र या पूर्वतयारींतून पुढें डॉ. केतकर यांनीं अंगावर घेतलेल्या प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासाची उत्पत्ति झाली. ज्ञानकोश–कचेरींत जें एकंदर साहित्य तयार झालें होतें त्याचा पूर्ण उपयोग करून व त्यांत योग्य ती भर घालून सर्व लेखांस आजतागाईतपणा आणावयाचा असतां तर हल्लींच्या दुप्पट पृष्ठसंख्या झाली असती ! पण एवढा ग्रंथ घेणें महाराष्ट्रीय ग्राहकांच्या आवाक्याबाहेर गेलें असतें व सरकार किंवा विद्यापीठ अशा मोठ्या संस्थेच्या आश्रयाशिवाय तें कार्य अशक्य झालें असतें.

ज्ञानकोशाची एकंदर योजना जरी डॉ. केतकर यांनीं केली, तरी त्याप्रमाणें प्रत्यक्ष संपादनकार्याकडे लक्ष पुरविणें त्यांस शक्य झालें नाहीं. प्रस्तावना-खंडांची कल्पना त्यांनीं नवीन काढली व त्यास एक हजार संकल्पित पृष्ठांऐवजीं तीन हजार खर्चीं पडलीं. त्यांतील पहिल्या खंडांत त्याचें सामाजिक लेख बरेच घालण्यांत आले; पण त्यांत सूचित केल्याप्रमाणें आर्थिक विवेचन पुढें कोठेंहि करण्यांत आलें नाहीं. वैदिक संशोधनास मात्र त्यामुळें पुष्कळच चालना मिळाली आणि पांचवा ‘ विज्ञानेतिहास ’ हा महत्त्वाचा खंडहि पूर्व संकल्पाव्यतिरिक्त असा बाहेर पडला. त्याच्या शेवटीं ‘उपसंहार’ या प्रकरणांत डॉ. केतकर यांनीं शास्त्रीय संशोधन व ज्ञानाचें महत्त्व चांगल्या रीतीनें पटवून दिलें आहे.

ज्ञानकोशाच्या सहाव्या विभागापासूनचें पुढील लेखनाचें कार्य बहुतेक संपादकीय कचेरीवरच पडलें. मधून मधून सवडीप्रमाणें डॉ. केतकर तें चाळून पाहत व कांहीं ठिकाणीं स्वतः दुरुस्ती करीत किंवा पुरवणी मजकूर घालीत. पण मुख्य भार संपादकीय कचेरीवरच असे. या पुरवणी मजकुरामुळें कांहीं ठिकाणीं विसंगति झाल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें आहे. उदाहरणार्थ, काव्यासंबंधींचा बहुतेक लेख कचेरीनें उपलब्ध साहित्यावरून तयार केलेला असून त्याची विचारसरणि भिन्न असतां शेवटला मजकूर डॉ. केतकर यांनीं घातला व त्यामुळें बरीच खळबळ उडाली, हें सर्वश्रुतच आहे. पण ‘ज्ञानकोश’ ही सामुदायिक जबाबदारीची गोष्ट असून त्यांत मुख्य संपादकाचा शब्द निर्णायक असणें हें शिस्तीस धरूनच असतें. एकंदरींत सहा ते एकवीस ह्या भागांतील मजकूर मुख्यांशानें कचेरींतील निरनिराळ्या संपादक मंडळींनेंच तयार केला व ज्यांच्या खालीं नांवें आहेत ते लेख तेवढे बाहेरच्या लेखकांकडून आले.

अशा प्रचंड कार्यास खरोखर भरपूर वेळ व पैसा अत्यवश्य

असतो. अधिक वेळ खर्च केला तर कचेरीचा खर्च वाढतो. अर्थात् जवळ पैसा असेल त्या मानानें काम आखावें लागतें. मूळ योजना कितीहि चांगली असली तरी ती पूर्णांशानें सिद्ध होत नाहीं. दुसरी गोष्ट म्हणजे, ज्ञानकोश हा पूर्ण होईतोंच मागासलेला होतो. कारण, रोज नवीन नवीन शोध लागून ज्ञानांत भर पडत असते;व ज्ञानाची प्रगति सर्व जगांत इतकी झपाट्यानें होत आहे कीं, तिजबरोबर कोणीहि पाऊल टाकूं शकत नाहीं.

ज्ञानकोशरचनेरचनेच्या प्रारंभीं " तुमच्याजवळ तज्ज्ञ लेखक कोठें आहेत ? तुम्ही त्यांच्याशिवाय ज्ञानकोश कसा रचणार ? " असे प्रश्न करण्यांत आले होते. पण त्यास उत्तर म्हणजे, आपण जगाच्या इतकें मागें आहों कीं, त्याच्या बरोबरीस येऊन नंतर कोणतेंहि कार्य करावयाचें असें आपण म्हणूं तर तें कधींहि शक्य होणार नाहीं. कारण, आपण आधींच मागें व जगाची प्रगति तर फारच झपाट्यानें होत आहे. तेव्हां ज्यास कार्य करावयाचें आहे त्यानें तात्काल आरंभ करावा व शक्य तितका प्रयत्न करून तें चांगलें करण्याची ईर्षा धरून काम करावें हेंच शक्य आहे. याच दृष्टीनें जितकें यश येईल तितकें आपलें, अशी बुद्धि ठेवून या कार्यांत पडलेल्या लोकांनीं उद्योग केला; आणि अनेक अडचणी सोसून नेटानें काम केल्यामुळेंच एवढें तरी दृश्यफल त्यास आलें. ' महाराष्ट्रीय ज्ञानकोश ' हा केवळ प्रारंभ असून जसजसें मराठी भाषेचें महत्त्व वाढून तिची सेवा करणारे विद्वान् अधिक निपजतील तसतसें तें कार्य पूर्णावस्थेस जाणार आहे.

ज्ञानकोशाच्या कार्यामुळें दुसरा एक महत्त्वाचा लाभ महाराष्ट्रास झाला आहे. या उद्योगामुळें एक नवीन अभ्यासू लेखकवर्ग तयार होऊन महाराष्ट्रांत नवीन कोशयुगाचा अवतार झाला एवढेंच नव्हे, तर अनेक उपयुक्त कार्यांचा पाया घालण्यांत आला. ज्ञानकोशांतील

डॉ. केतकर यांच्याव्यतिरिक्त इतर प्रमुख मंडळी जरी 'महाराष्ट्र शब्दकोशा' चें कार्य आज करीत असतांना दिसतात, तरी यांशिवाय अनेक कार्यकर्त्यांस प्राथमिक शिक्षण ज्ञानकोश कार्यालयांतच लाभलें आहे. नागपूर येथें 'ऑल-इंडिया रिपोर्टर' या नांवाची सर्व हिंदुस्थानभर प्रसिद्ध अशी कंपनी चालविणारे प्रमुख चालक श्री. चितळे हे आरंभीं ज्ञानकोशाचे प्रचारक होते व त्यांचे प्रारंभींचे एक साहाय्यक श्री. मुंडले व सध्याचे एक साहाय्यक श्री. दातार हे कांहीं काल ज्ञानकोशाच्या लेखकवर्गांत होते. 'प्राचीन चरित्रकोश व 'ऋग्वेदाचें मराठी भाषांतर' यांचे कर्ते श्री. चित्रावशास्त्री यांनीं ही विद्या ज्ञानकोश कार्यालयांतच संपादिली व 'स्वाध्याय' कर्ते श्रौताचार्य बापटशास्त्री यांनींहि वेदाभ्यास व यज्ञसंस्थेचा अभ्यास करण्याची दृष्टि ज्ञानकोशकार्यालयांतच उचलली. वेदशास्त्रोत्तेजक सभेस हजारों रुपये मिळवून देणारे मयूरमंडळाचे चालक श्री. पराडकरशास्त्री यांसहि सार्वजनिक कार्याचा ओनामा ज्ञानकोशमंडळानेंच घालून दिला. याप्रमाणें ज्ञानकोश या संस्थेनें निरनिराळ्या क्षेत्रांत अनेक कार्यकर्ते निर्माण केले असून अनेकांस ती प्राथमिक शिक्षणभूमि झाली. अर्थात् 'महाराष्ट्रीय ज्ञानकोशा' नें महाराष्ट्रांत एक नवीन युग निर्माण केलें व त्या युगाचे प्रवर्तक डॉ. केतकर हे होत यांत शंका नाहीं. [ लोकशिक्षण, मे–जून १९३७ ]

# ज्ञानकोशांतील डॉ. केतकरांचें लिखाण

दृष्टिक्षेप सहावा

कल्पना आणि कार्यसिद्धि या संबंधींचें ज्ञानकोशाचें सर्व श्रेय डॉ. केतकर यांकडे जातें हें कोणी नाकबूल करणार नाहीं. तसेंच ज्ञानकोशांतील सर्वच लिखाण डॉक्टरांच्या हातचें आहे असें प्रतिपादण्याची चूकहि पण कोणी करणार नाहीं. ज्ञानकोशासारखे अति प्रचंड आणि व्यापक संदर्भग्रंथ एकट्या दुकट्याच्यानें होत नसतात. त्याला अनेकांचें ज्ञात–अज्ञात साहाय्य झालें असतें. रणक्षेत्रावरच्या निरनिराळ्या आघाडीवर निरनिराळे सेनाधिकारी असतात व ते सरसेनापतीच्या धोरणानें पण स्वतःच्या बुद्धीनें लढाया करीत असतात. सरसेनापतीला प्रत्यक्ष संग्रामांत उडी टाकण्याची बहुधा वेळ आणूं देत नाहींत. या गोष्टीप्रमाणेंच ज्ञानकोशांत डॉ. केतकर यांचें स्वतःचे लेख फार थोडे सांपडतील. जे आहेत ते त्यांच्या इंग्रजी ग्रंथांचें भाषांतर करून केलेले, नियतकालिकांतील त्यांच्या लेखांतील उतारे, किंवा त्यांनीं तोंडी सांगितल्यावरून लिहून घेतलेले असे आढळतील. ग्रंथारंभींच्या प्रस्तावना मात्र त्यांच्या आहेत. वाङ्मयसूचीला आरंभीं जोडलेली सुमारे ४५ पानांची त्यांची प्रस्तावना महाराष्ट्र समाजाची सर्वांगीण पाहणीच आहे. तिच्याकडे फारच थोड्या विद्वानांचें लक्ष गेलें आहे. ‘ हिंदुस्थान आणि जग ’ या ज्ञानकोशाच्या पहिल्या विभागाचीं हिंदुस्थान आणि बाह्य जग यांचा परस्पर संबंध दाखवून दिल्यानंतरचीं प्रकरणें त्यांच्या इंग्रजी ग्रंथांवरून तयार केलेलीं आहेत; तीं निःसंशय नवविचारप्रवर्तक आणि मननीय वाटतील. डॉक्टरांचें सर्व हृद्गत त्यांत ओतलेलें दिसेल. दशोपप्रकरणात्मक ‘ इतिकर्तव्यता ’ हें प्रकरण प्रत्येक राष्ट्रीय वृत्तीच्या महाराष्ट्रीयानें अवश्य वाचावें व त्याबरोबरच

' विज्ञानेतिहास ' या पांचव्या विभागांतील " महाराष्ट्रीय महत्त्वाकांक्षा आणि तन्मूलक कर्तव्यें " हें शेवटचें प्रकरण डोळ्यांखालीं घालावें. यांतील डॉ. केतकरांचे विचार अंधदेशभक्तिमूलक नसून निःपक्षपाती विचारवंत शास्त्रज्ञाचे आहेत. यावर केसरींतून टीका झालीच. टीकाविषय झालेला दुसरा लेख म्हणजे काव्यावरचा. हा लेख उपसंपादकांनीं तयार केला होता; फक्त त्यांतील मराठी काव्याच्या विवेचनारंभीं डॉक्टरांनीं आपले थोडे सामान्य विचार मांडले होते. त्यांत जगांतील इतर वाङ्मयाशीं मराठीची तुलना करून मराठी काव्याचा हीनपणा दाखवून दिला होता. कांहीं कांहीं लेखांतून डॉक्टर केतकर आपले स्वतःचे विचार अगदीं थोडक्यांत पण ठासून मांडीत. पण त्यामुळें तेवढेच शब्द निराळे उठून दिसत व त्यावर कोणाची दृष्टि गेल्यास टीका होई. ' अस्पृश्यता ' या श्री. वि. रा. शिंदे यांच्या लेखानंतर शेवटीं थोडी संपादकीय टीप मारलीच आहे.

" अर्थशास्त्र " या लेखांत हिंदी अर्थशास्त्र नांवानें एक विभाग घातला आहे तो डॉ. केतकर यांच्या ' इंडियन इकॉनॉमिक्स ' या लहानशा ग्रंथाचा सारांश आहे. त्यावर प्रि. ध. रा. गाडगीळ यांनीं स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्र उत्पन्न करण्याची मुळींच जरूरी नाहीं अशी विद्यासेवकांतून सडेतोड टीका केलेली आढळेल. ' धर्म आणि धर्मशास्त्र ' या लेखाला आधार त्यांच्या ' हिंदुइझम ' पुस्तकाचा आहे. ' समाजशास्त्र ' हा लेख त्यांच्या सहींनेंच मुळीं छापला आहे. या ठिकाणीं तो फार लहानच आहे; त्याहून मोठा असा 'भारतीय समाजशास्त्र ' हें हिंदुस्थान खंडांतील दहावें प्रकरण आहे. याप्रमाणें त्यांचें स्वतःचें कांहीं लिखाण दाखवून देतां येईल.

त्यांचे स्वतःचे वैदिक विचार दुसऱ्या व तिसऱ्या विभागांत मांडलेले आहेत. ते संशोधनीय स्वरूपाचे असून डॉ. केतकर

यांनीं एके ठिकाणीं भवभूतीप्रमाणें समकालीन समाजाच्या अनभिज्ञतेची कींव केली ती फारशी अयथार्थ नाहीं. हे दोन विभाग वैदिक अभ्यासकाला वाचावे लागतील. एरवीं त्याच्या अभ्यासाला पूर्णता येणार नाहीं. यज्ञसंस्था व तिचें महत्त्व, सूत संस्कृति, ब्राह्मण्य, वेदपूर्व आर्यन् संस्कृति इ. त्यांचें संशोधन या दोन विभागांत त्यांनीं स्वतःच्या देखरेखीखालीं परिश्रमपूर्वक मांडून घेतलेलें आहे.

ज्ञानकोशासाठीं माहिती जमा करतांना त्यांनीं अनेक पत्रकें, प्रश्नावली, योजना छापून ठिकठिकाणीं ज्या पाठविल्या होत्या त्यावरूनहि डॉक्टरांच्या लेखणीची कल्पना येईल. 'महाराष्ट्रापुढील धर्मशास्त्रीय प्रश्न,' 'व्यापारी वर्गास विनंती,' 'नृत्याभिज्ञ स्त्री-पुरुषांस प्रश्न,' 'सर्व जातींच्या पुढाऱ्यास विनंती,' ज्ञानकोशाची पहिली घटना (पत्रक) हीं सर्व आजहि उपयुक्त वाटतील.

[ प्रतिभा, केतकर अंक ]

———

# ज्ञानकोशाचें अंतरंग

## दृष्टिक्षेप सातवा

" ज्ञानकोश म्हणजे अत्यंत व्यापक वाङ्मय होय. यानें भाषा तयार व्हावयाची, आणि प्रगमनशील जग आणि अप्रगत महाराष्ट्र यांतील बौद्धिक अंतर कमी व्हावयाचें. "

" ज्ञानकोशाचा उद्देश महाराष्ट्रीयांस अनेक शास्त्रांचें ज्ञान करून देण्याचा आहे. प्रस्तावनाखंडाचे उद्देश दोन आहेत. एक उद्देश जें ज्ञान गोष्टींच्या रूपानें मांडणें अधिक चांगलें तें त्या रूपांत मांडणें हा आहे व दुसरा उद्देश प्रत्येक शास्त्राविषयीं जिज्ञासा उत्पन्न करून देण्याचा आहे. "

" ज्ञानकोशांतील अनेक विषयांकडे लक्ष गेलें तरच ज्ञानकोशाचा उपयोग होणार. अनेक विषयांसंबंधानें जिज्ञासा उत्पन्न होण्यास वाचकांस अगोदर विविध माहिती असावी लागते. जर जिज्ञासा नसेल तर ज्ञानकोशाचा बराचसा भाग उपयोगांत येणार नाहीं. आज स्थिति अशी आहे कीं, आपल्या देशांतील सामान्यतः सुशिक्षित समजला जाणारा वर्ग अर्वाचीन संस्कृतीच्या अनेक अंगांपासून दूर आहे. एवढेंच नव्हे, तर भारतीयविषयक इतिहास, शास्त्र, कला, वाङ्मय, यांची सामान्य माहितीहि त्यांस नाहीं. "

याप्रमाणें वेळोंवेळीं डॉ. केतकर यांनीं ज्ञानकोशाचा उपयोग व त्याची मांडणी लोकांना पटवून दिलेली आहे. प्रस्तावना, शरीर आणि पुरवणी असे तीन खंड विषयांच्या आणि सोयीच्या दृष्टीनें पाडले आहेत. नुसता पांच भागांचा प्रस्तावना खंड, निदान त्यांपैकीं एखादा जरी भाग वाचला तरी कोणाहि वाचकांस किती तरी नवीन ज्ञान आणि दृष्टि येणार आहे. शरीरखंडांतील लेख विशिष्ट विषयाची माहिती देण्यासाठीं आहेत, पण प्रस्तावनाखंड जगाच्या

सर्वांगीण ज्ञानाचें स्थूल स्वरूप समजण्यासाठीं, व आपल्या देशानें किती प्रगति केली व पुढें किती करावयाची राहिली आहे हें स्पष्ट कळण्यासाठीं रचलेला आहे. हिंदुस्थानची एकत्र माहिती पुरवणी-खंडांत दिलेली आहे.

महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचे चार खंड आहेत: १ ला—प्रस्तावना खंड; २ रा—शरीरखंड; ३ रा—हिंदुस्थानखंड; व ४ था—सूचीखंड. पहिल्याचे पांच, दुसऱ्याचे सोळा, तिसऱ्याचा व चवथ्याचा एकेक असे एकंदर तेवीस विभाग आहेत.

## ज्ञानकोश—प्रस्तावनाखंड ( विभाग १—५ )

### विभाग पहिला " हिंदुस्थान आणि जग "

यांत गेल्या दोन हजार वर्षांत हिंदुस्थानचा आपली संस्कृति जगज्जेत्री करण्याचा प्रयत्न आणि त्या प्रयत्नाचा यूरोप, आफ्रिका, चीन, जपान व दक्षिणमहासागरांतील बेटें यांवर झालेला परिणाम वर्णन केला आहे. बाह्य संस्कृतींतून भारतीयांनीं काय घेतलें याची सविस्तर माहिती दिली आहे. शिवाय भारतवर्षाच्या व जगाच्या आणि एकंदर सामाजिक इतिहासापासून समाजशास्त्रीय नियम काय निघतात आणि ते नियम कार्य करीत राहिले असतां सामाजिक भवितव्यता काय, यावर प्रचंड माहितीच्या साहाय्यानें अत्यंत स्पष्ट व निर्भिडपणें विचार व्यक्त केले आहेत.

### विभाग दुसरा " वेदविद्या "

हा अत्यंत अपूर्व माहितीनें भरला आहे. यांत चारहि वेदांचें म्हणजे संहिता, ब्राह्मणें, आरण्यकें, उपनिषदें, यांतील माहितीचें, विचारांचें व कथांचें वर्णन केलें आहे. श्रौतधर्म म्हणजे यज्ञसंस्था व वेदकालीन देवता यांचें अत्यंत सूक्ष्म वर्णन आलें असून यज्ञसंस्थेच्या भिन्नत्वामुळें उत्पन्न झालेल्या वैदिक वाङ्मयाच्या निरनिराळ्या

शाखांमध्यें काय फरक उत्पन्न झाला त्याचीं कोष्टकेंहि दिलीं आहेत. पौराणिक कथांचें वैदिक पूर्वस्वरूप दिलें आहे आणि वेदकालीन आचार्यवर्गांतील चळवळी व त्यामुळें ब्राह्मण जातीची उत्पत्ति व विभागणी कशी काय झाली हें स्पष्ट केलें आहे. जें ज्ञान आजपर्यंत गूढ राहिलें होतें, तें अनेक विद्वानांच्या साहाय्यानें सार्वजनिक केलें आहे.

विभाग ३ व ४. " बुद्धपूर्व जग व बुद्धोत्तर जग "
जगाचा इतिहास

या भागांत भारतीयांच्या अत्यंत प्राचीन इतिहासास साधन जे वेद त्या वेदांचें सूक्ष्म पृथक्करण करून अत्यंत प्राचीनकालच्या स्थितीचें जितकें व्यापक वर्णन देतां येणें शक्य आहे तितकें दिलें आहे. त्यांत आलेल्या माहितीनें लोकांची वेदकालीन इतिहासाची कल्पना अगदीं बदलून जाणार आहे. हिंदुस्थानच्या अत्यंत प्राचीन काळांत त्यांचा असुर, ग्रीक, रोमन, इराणी या सर्व संस्कृतींशीं संबंध येतो तो सर्व भाग या ग्रंथांत दिला आहे. आणि अर्वाचीन काळांत ब्रिटिश राज्य होऊन स्वातंत्र्याची परिसमाप्ति होईपर्यंत, महंमदी जग व युरोपांतील अनेक राष्ट्रें यांशीं निकट संबंध आला त्याचा इतिहास " बुद्धोत्तर जग " या ग्रंथांत दिला आहे.

विभाग पांचवा " विज्ञानेतिहास "

या विभागांत प्राथमिक व प्रौढ स्वरूपाच्या बहुतेक शास्त्रांच्या भारतांतील व पाश्चात्य देशांतील वाढीचा इतिहास दिला आहे. म्हणजे लेखनपद्धति, संख्यालेखन आणि कालगणना या प्राथमिक स्वरूपाच्या ज्ञानाच्या व नंतर छंद, संगीत, निरुक्त, व्याकरण. मीमांसा, वैद्यक, ज्योतिष, रसायन, पदार्थविज्ञान, गणितशास्त्र, भूस्तर शास्त्र, जीवशास्त्रें इत्यादि शास्त्रांच्या इतिहासाचा परामर्ष घेतला आहे.

**ज्ञानकोश–शरीरखंड ( विभाग ६–२१ )**

या खंडांत अकारविल्ह्यानें पुढील विषयांवरील लेख आहेत.

**हिंदुस्थान**—राष्ट्रें, धर्म, जाति आणि संस्कृति यांचे इतिहा प्रांत आणि संस्थानें यांचे प्रादेशिक इतिहास आणि भूगोल.

**इतर प्रादेशिक खंड**—अमेरिका, आफ्रिका, आशिया, ऑस्ट्रे लिया यूरोप–यांतील ऐतिहासिक चरित्रें, जाती, दैवतें, प्रादेशिक इतिहास आणि भूगोल.

**वाङ्मयेतिहास**—राष्ट्रांचें आणि भाषांचें वाङ्मय. संस्कृत, प्राकृत, अर्वाचीन देशी भाषा व इतर खंडांतील भाषा यांतील वाङ्मयेतिहास. साहित्यिकांची चरित्रें.

**शास्त्रें**—आधिभौतिक आणि आध्यात्मिक. पदार्थविज्ञान, रसायन, वैद्यक, शासन, समाज, सृष्टिविज्ञान इत्यादि शास्त्रें; सर्व कला, भाषा आणि व्याकरण, धर्म आणि संप्रदाय, न्याय, नाट्य, व्यापार, उद्योग धंदे, अर्थशास्त्र इत्यादि. शास्त्रज्ञांचीं आणि कलावंतांचीं चरित्रें.

**ज्ञानकोश सूचीखंड— ( विभाग २२ वा )**

ज्ञानकोशाच्या २१ विभागांत उल्लेखिलेल्या विषयांची आणि व्यक्तींची विस्तृत सूची. हिचे पुन्हां विषयसूची आणि अकारविल्ह्यानें ची असे दोन भाग पाडले आहेत. ही सर्वांत शेवटीं १९२९ सालीं यार झाली.

**ज्ञानकोश–हिंदुस्थानखंड ( विभाग २३ वा )**

नकोश संपल्यानंतर त्याला पुरवणी म्हणून एक दोन भागांचा खंड काढण्याचा विचार होता. पहिला हिंदुस्थानविभाग महाराष्ट्रखंड राहिला. त्याचें भिन्न स्वरूप म्हणजे 'प्राचीन

महाराष्ट्राचा इतिहास'. 'गॅझेटियर' स्वरूपाचा हा हिंदुस्थान खंड आहे. भारतीय संस्कृतीचें आद्यमापन, भरतखंड वर्णन, इतिहास, लोकसमाज, राज्यव्यवस्था, प्रांतवर्णन, सांपत्तिक स्थिति, बौद्धिक प्रगति, आरोग्य, समाजशास्त्र आणि सद्य:स्थिति हे यांतील विषय आहेत. याला शेवटीं सूची आहे. [ प्रतिभा, केतकर अंक ]

---

# डॉ. केतकर यांचीं नियतकालिकें

दृष्टिक्षेप आठवा

## ( १ ) ‘ विद्यासेवक ’

नियतकालिकांतून विविध विषयांवर आपले विचार मांडण्याची, प्रचलित प्रश्नांवर आपलीं मतें सांगण्याची आणि बेधडक वाद खेळण्याची डॉ. केतकरांना हौस असे. कॉलेजांत असतांनाच १९०६ सालीं त्यांनीं ‘ महाराष्ट्र–वाग्विलास ’ नांवाचें मासिक आपले अमरावतीचे एक स्नेही श्री. बाळकृष्ण संतूराम गडकरी यांच्या सहकार्यानें सुरू केलें होतें. अमेरिकेहून परत आल्यानंतर ‘ लोकशिक्षण, ’ ‘ केसरी, ’ ‘ महाराष्ट्र ’ इत्यादि सुप्रसिद्ध नियतकालिकांतून ते लेख लिहूं लागले. मात्र ज्ञानकोशाचें काम सुरू केल्यानंतर त्याचे दहा भाग होईपावेतों त्यांना इतर गोष्टी करण्यास विशेष फुरसत मिळाली नव्हती. त्यानंतर ज्ञानकोशांतील लेखांत जो काही उणेपणा राही तो दूर करण्याकरितां म्हणून किंवा मागाहून जी अधिक माहिती मिळे तिचा मुख्यत्वें अंतर्भाव करण्याकरितां म्हणून एक मासिक काढावें, अशी कल्पना १९२४ च्या जून–जुलैमध्यें डॉ. केतकर यांना आली; आणि, सेप्टेंबरपासून ‘ विद्यासेवक ’ नांवाचें ज्ञानकोशाच्या आकाराचें १६ पानी मासिक त्यांनीं ज्ञानकोश मंडळाच्या द्वारेंच सुरू केलें. प्रस्तुत मासिक ज्ञानकोशछापखान्यांत छापलें जात असून डॉ. केतकर त्याचे मुद्रक व प्रकाशक होते; आणि ज्ञानकोशाचे संपादकीय व्यवस्थापक श्री. यशवंत रामकृष्ण दाते यांजकडे त्यांनीं त्याचें संपादकत्व दिलें होतें. मासिकाची वार्षिक वर्गणी फार थोडी, म्हणजे अवघी १॥ रुपाया ठेविली होती. ज्ञानकोशाच्या तीन हजार ग्राहकांपैकीं निदान दोन हजार ग्राहक

आरंभीं एकदम मिळून मासिक 'ज्ञानकोश' संपल्यानंतरहि पुढें स्वतंत्रपणें फायदेशीर चालेल, अशी यासंबंधीं चालकांची वाजवी अपेक्षा होती. 'विद्यासेवक' मजकुराच्या दृष्टीनें ज्ञानकोशाला पूरक व्हावें अशी या मासिकाची मुख्यत्वें योजना असली, तरी विविध विषयांवरील स्वतंत्र, संशोधनपर व चिकित्सात्मक लेख आणि टिपणें हींहि यांत द्यावयाचीं, असें संपादकीय धोरण प्रसिद्ध झालें होतें. तसेंच "शुद्ध भौतिक शास्त्रें, यांत्रिक कला इत्यादि गोष्टी यांतून वगळल्या जातील," अशी सूचना देऊन "लेखन, प्रकाशन आणि मुद्रण या धंद्यांतील मंडळींनीं विशेषेंकरून हें मासिक आपलें समजावें." असें सांगण्यांत आलें होतें.

या लहानशा मासिकांत मुख्यत्वें ज्ञानकोशांतील संपादकांचेच लहान लहान टाचणवजा लेख येत व विचारजागृतीच्या कामीं त्यांचें महत्त्व सुशिक्षित वाचकांना अतिशय वाटे. लेख महत्त्वाचे अर्थात् चिरसंग्रहणीय, तेव्हा कागद चांगला वापरावा अशी प्रो. पोतदारांची लवकरच आस्थेवाईक सूचना आली. मूळ अपेक्षेप्रमाणें ज्ञानकोशाच्या ग्राहकवर्गांतील बरेचजण याचे ग्राहक बनले; वृत्तपत्रें, मासिकें भेटीला येऊं लागलीं; व परीक्षणार्थ नवीन पुस्तकेंहि ग्रंथकार धाडूं लागले. अशा रीतीनें पहिल्या सहामाहीच्या आंतच या मासिकानें नांव मिळविलें व आपलें स्वतंत्र स्थान निर्माण केलें. तेव्हा रॉयल ४८ पृष्ठांच्या पाक्षिकांत याचें रूपांतर करावें कीं काय असा विचार डॉ. केतकरांच्या मनांत आला. पण शेवटीं दुसऱ्या वर्षापासून सहामाही पुरतेंच वरील आकाराचें मासिक काढण्याचें ठरून, सहा अंक तसे निघाले. आकाराबरोबर पूर्वीचें संपादकीय धोरणहि बदललें व कथा कादंबऱ्याहि त्यांत येऊं लागल्या. तिसऱ्या वर्षी (वरील सहामाही-नंतर) मासिकाचीं ६४ पृष्ठें करण्यांत येऊन वर्गणी ४ रु. झाली. चौथ्या वर्षाच्या आरंभींच्या तीन अंकांबद्दल डॉ. केतकर यांची

' आशावादी ' कादंबरी एका हप्त्यांतच ग्राहकांकडे रवाना झाली. व शेवटच्या ११ व १२ ह्या दोन अंकांबद्दल ' महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण ' हा मोठा प्रबंध देण्यांत आला. यानंतर ' विद्या-सेवका ' चें पांचवें वर्ष सुरू झालें. यावेळीं श्री. दाते, कर्वे प्रभृति संपादकांनीं ' ज्ञानकोशमंडळ ' सोडून ' शब्दकोशमंडळा 'चा उद्योग सुरू केला, त्यामुळें डॉ. केतकर स्वतःच ' विद्यासेवका 'चे संपादक झाले. आतां ज्ञानकोशमंडळाचें कार्य पुरें झालें होतें; सूचीखंडाची छपाई चालू होती; व ती संपल्यानंतर मंडळाचें रूपान्तर होणार होतें. तेव्हा पांचव्या वर्षाचें पांचच अंक निघून मासिक बंद पडलें !

यानंतर डॉ. केतकर यांनीं प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास लिहि-ण्यास घेतला व तो प्रायः पुरा झाल्यानंतर १९३५ च्या सप्टेंबर-पासून म्हणजे प्रथम निघाल्यापासून बरोबर दहा वर्षांनीं त्यांनीं १६ पानी ' विद्यासेवक ' पुनः सुरू केलें व त्याची वर्गणी एक रुपाया दोन आणे ठेविली. परंतु या ' प्रसिद्धिपत्र 'वजा मासिक पत्रिकेचें सहाव्या वर्षाचे आठच अंक व तेहि फार अनियमितपणें निघाले. शेवटचा चारपानी अंक आर्टपेपरवर आपल्या नव्या छोट्या ज्ञानकोश छापखान्यांत त्यांनी छापला होता ( डिसेंबर १९३६ ). या अंकावरूनच वाचकांना ' विद्यासेवका 'ची पुनः समाप्ति होणार अशी भीति वाटूं लागली आणि ती दुर्दैवानें संपादकाच्या मृत्यूनें खरी ठरली !

या पांचसहा वर्षांच्या हयातींत ' विद्यासेवकां 'त अनेक लहान मोठे चांगले लेख येऊन गेले. ' गोविंदपौत्र ' या टोपणनांवाखालीं डॉ. केतकर यांच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. ' गोंडवनांतील प्रियंवदा ' ' परागंदा, ' व ' आशावादी ' या तीन मोठाल्या कादंबऱ्या; ' महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण 'व ' निःशस्त्रांचें राज-कारण ' हे मोठे प्रबंध; आणि ' स्त्रीसत्तापराभव ' नाटक

( अपूर्ण ), ही डॉ. केतकरांची महत्त्वाची वाङ्मयनिष्पत्ति या मासिकांतूनच झाली. ‘ निरनिराळ्या देशांतील कहाण्या ’ सांगण्यांत आल्या. डॉ. केतकर यांचे राजकीय, सामाजिक व आर्थिक विषयांवरील विचारप्रवर्तक लेख, ‘ वाङ्मयतिमाही ’चीं श्री. दाते यांचीं परीक्षणें, श्री. कर्वे यांचें ‘तिमाही राजकारण,’ ज्ञानकोशांतील संपादक मंडळींनीं लिहिलेलीं ऐतिहासिक व सामाजिक विषयांवरचीं विविध टांचणें, बाजीप्रभूंच्या शौर्यासंबंधीं चर्चा, ग्रंथसमीक्षा इत्यादि गोष्टींमुळें ‘ विद्यासेवक ’ विद्वानांनाहि वाचनीय वाटे. कै. वि. का. राजवाडे यांनीं देखील ‘ भारतीय इतिहासाचीं मूलतत्त्वें ’ आणि ‘ खड्गराट् ’ हे दोन लेख लिहून त्याला महत्त्व दिलें होतें; आणि त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्यासंबंधींचा एक स्वतंत्र विशेषांक काढून त्यांच्या संस्मरणीय व मनोरंजक आठवणीहि संग्रहित केल्या होत्या.

‘ विद्यासेवकां ’तून डॉ. केतकर यांनीं आपल्या अनेक योजना प्रसिद्ध केल्या. जातींची माहिती देणारा ‘ डिरेक्टरी ’ सारखा ‘ ज्ञातिनामकोश ’ काढावा, राजवाड्यांचा ‘ धातुकोश ’ आणि त्यांचे विविध लेख प्रसिद्ध करण्यासाठीं एक संस्था उभारावी, पाश्चात्य ललित वाङ्मयांतील उत्कृष्ट भागाचें भाषांतर देण्यासाठीं ‘ कथामंदिर ’ उघडावें, एक ‘ सेमिनार ’ स्थापून कांहीं विद्वानांनीं राजकीय प्रश्नांचा पंडिती अभ्यास करावा व आपले निष्कर्ष प्रसिद्ध करण्यासाठीं एक त्रैमासिक चालवावें, ‘ स्वयंनिर्णय संघ ’ सुरू करावा इत्यादि योजना त्यांनीं मधूनमधून मांडिल्या आहेत आणि त्यांवरून त्यांचें विचाराचें व कार्याचें क्षेत्र किती मोठें होतें हें सहज ध्यानांत येतें.

मासिक लोकप्रिय करण्यासाठीं वाचनपरीक्षण, छायाचित्रस्पर्धा, कूटें, समस्यापूर्ति इत्यादि आधुनिक क्लृप्त्याहि ते योजीत व यशस्वी उमेदवारांना बक्षिसें देत. ‘ ज्ञानकोश ’ आणि ‘ प्राचीन महाराष्ट्र ’

यांच्या जाहिराती देण्याच्या त्यांच्या अपूर्व पद्धतीहि प्रस्तुत मासिकांत पाहावयास सांपडतात.

## (२) ‘ पुणें समाचार ’

१९२७ सालच्या एप्रिलमध्यें महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचा २१ वा विभाग निघून त्या ग्रंथाचें संकल्पित कार्य पुरें झालें, तेव्हां मंडळानें त्यापुढें कोणतें कार्य हातीं घ्यावें याविषयीं संपादक मंडळींत जोरानें विचार चालू झाला. बारा वर्षें एवढ्या श्रमानें जमविलेला लेखकवर्ग, ग्रंथसंभार व मुद्रणसाहित्य हीं त्यापुढेंहि शक्य तितका काळ एकत्र ठेवावीं अशी साहजिकच सर्वांची इच्छा होती. ‘ ज्ञानकोशमंडळ ’ हें एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका कंपनीप्रमाणें कायमचें अस्तित्वांत असावें आणि त्यानें दर पांचदहा वर्षांनीं ज्ञानकोशाच्या पुरवण्या काढाव्या व इतर संदर्भग्रंथ रचावे, असा डॉ. केतकरांचा ज्ञानकोश स्थापनेपासूनच हेतु होता. त्याचप्रमाणें पुण्यास ‘ ज्ञानकोश वसाहत ’ करावी म्हणून त्यांनीं १९२० सालीं योजनाहि केली होती. पण त्या कामास लागणारा पैसा ‘ ज्ञानकोश ’ छापणें चालू असतां व नंतरहि मंडळापाशीं शिल्लक नव्हता. उलट, ज्ञानकोश समग्र कसा बाहेर पडेल याची विवंचना संपादकवर्गास लागून राहिली होती.

तथापि मंडळाचें सातत्य राखण्यासाठीं व आपले प्रचलित विषयांवरील विचार प्रदर्शित करण्यासाठीं एक दैनिक काढल्यास कदाचित् त्यांचा चांगला जम बसेल, या अपेक्षेनें डॉ. केतकर यांनीं १ जून १९२७ पासून ‘ पुणें समाचार ’ या नांवाचें दैनिक काढण्याचें ठरविलें. वास्तविक त्यांच्याव्यतिरिक्त ज्ञानकोश-मंडळांतील इतर कार्यकर्त्यांना हें दैनिक नीट चालेल अशी आशा आरंभापासूनच वाटत नव्हती. कारण, आधींच सांपत्तिक स्थिति प्रतिकूल, आपला विशिष्ट पक्ष नाहीं, त्यांतच पुण्यांतील समर्थ असा केळकर-पक्ष त्यांनीं

स्वत: दुखविलेला; अशा परिस्थितींत दैनिकपत्र चांगलें चालविणें फार जड जाईल आणि मंडळाचें असेल नसेल तें सर्व द्रव्य यां प्रयोगांत खर्च होऊन पुढें अगदींच दैन्य ओढवेल, या विचारानें इतराना चिंता वाटत होती. तथापि डॉ. केतकर पूर्ण आशावादी ! "अमेरिकेंत एकेका शहराचीं दैनिकें छान चालतात. त्यांत बहुतेक बातम्या व गोष्टी त्या शहरासंबंधींच असतात. त्याप्रमाणें नुसतें पुणें शहरच घेऊन त्यासंबंधाच्या सर्व असतील नसतील त्या गोष्टी, चर्चा, विचार, संस्थावृत्तें, चळवळी, उदीम, व्यापार इत्यादि एकूण-एक बाजू या पत्रांत मांडीत गेल्यास या दीड दोन लाख वस्तीच्या शहराला 'पुणें समाचार' हें आपलें मुख आहे, आपलें मन आहे; असें वाटेल आणि चांगला खप होईल. बाहेरचें राजकारण यांत आणावयाचें नाहीं व आणावयाचें झाल्यास पुण्याचा त्यांत भाग कोणता हें दाखविण्यापुरतेंच. पहिले चार अंक मीच एकटा भरून काढीन व तुम्हांला धोरण आंखून देईन" अशी आम्हांला त्यांची उत्साहाची सांगणी ! तेव्हां नेहमींप्रमाणें निमूटपणें पडेल तें काम करण्यास संपादकवर्गापैकीं कायते आम्ही उरलेले दोघेतिघेजण तयार झालों.

संन्याशाच्या लग्नाची कशीबशी तयारी झाली. निष्णात बातमीदार 'धनुर्धारी' पुत्र व मुंबईचे आजचे नवे 'धनुर्धारी' टिकेकर आणि दुसरे एक गृहस्थ यांना पुण्यांतील बातम्या आणण्याचें काम सांगितलें. आम्हीं इंग्रजी दैनिकांतून निवडक बातम्यांचीं भाषांतरें देऊन पहिल्या चार अंकांनंतर लहान स्फुटें व लेखहि लिहूं लागलों. लवकरच खानपाणंदीकर–विवाहाची तुफानी वार्ता टिकेकरांनीं आणून खळबळ उडवून दिली ! डॉ. केतकरांचा या विवाहांत सपत्नीक भाग होता. त्यांनीं या मिश्र विवाहावर बरेच तात्त्विक लेखहि लिहिले. पण ही खळबळ शमल्यावर पत्रहि थंड पडत चाललें ! बातमीदार कमी

झाले. डॉ. केतकरांचा पहिला हुरूप जाऊन दैनिक चालविणें हें जादाकाम उपसंपादकांच्याकडे आलें. जो ज्या कामाकडे अधिक आस्थेनें लक्ष देईल व तें करण्याची तत्परता दाखवील त्याकडेस तें काम आपोआप जाई. बुद्ध्या निवड अशी केली जात नसे. शिवाय ज्ञानकोशमंडळांत असा एक अलिखित परिपाठ पडून गेला होता कीं, जाग्यावर जो माणूस असेल त्यानें जबाबदारी घेऊन पुढें आलेलें काम पार पाडावें. त्याच्या बरेवाईटपणाबद्दल कोणी मागाहून टीका करीत नसे. त्यामुळें थोडीं साधनें आणि थोडीं माणसें असतांनाहि 'ज्ञानकोश', 'विद्यासेवक' आणि 'पुणें समाचार' यांचें प्रकाशन एकाच वेळीं बरेंच सुरळीत चाले. हाताखालच्या माणसांवर जबाबदारी टाकून त्यांना पुढें आणावयाचें, असें डॉ. केतकरांचें नेहमीं धोरण असे; आणि त्यामुळें सहकाऱ्यांना पुरेसें वेतन नसतांहि त्यांनीं योजिलेलीं कामें पार पडत.

लो. टिळकांच्या मुलांच्या वतीनें ट्रस्टींविरुद्ध 'पुणें-समाचारां'त लेख आले, तेव्हां तर त्याच्या भवितव्याविषयीं अधिकच चिंता वाटूं लागली. डॉक्टरांच्या कल्पनेप्रमाणें दैनिक फार खपेना. "प्रत्येक पुणेंकरांस हें पत्र वाचावयास लावील," ही त्यांची प्रतिज्ञा फोल ठरली; आणि हें असें व्हावें यांत विशेष आश्चर्य नव्हतें, हें आजकालच्या दैनिकांच्या परिस्थितीवरून समजून येईल. परंतु यामुळें ज्ञानकोशमंडळाची परंपरा टिकविण्याच्या योजनेची पायमोड झाली. 'पुणें-समाचारा'चा प्रयत्न फसला, आतां दुसरी कांहीं योजना मंडळ टिकविण्याच्या कामीं केली पाहिजे, असें संपादकांना दिसून आलें; आणि त्याप्रमाणें आम्हीं कांहीं योजना आंखून डॉ. केतकरांच्या संमतीसाठीं त्यांच्यापुढें टाकल्या. परंतु त्यांना कोणतीच पसंत पडेना! तथापि तो प्रश्न वेगळा.

'पुणें-समाचार' एकदम बंद करूं नये म्हणून ६४ अंक निघा

त्यानंतर दैनिकाचें साप्ताहिक केलें. विशेषत: पुणें जिल्ह्याचें मुखपत्र म्हणून तें चालवावें असें धोरण ठेविलें. आमच्या सरस्वतीमंदिर–संस्थेचे कांहीं इंग्रजी वर्ग तालुक्यांच्या गांवीं होते; तेव्हां तेथील शिक्षकांना तालुक्यांतील बातम्या पुरविण्यास सागून त्यांच्याकडून येणारा व इतर वृत्तपत्रांतील जिल्ह्यासंबंधींचा मजकूर या साप्ताहिकांत देऊं लागलों. मधून मधून जुळणीखर्च वांचावा म्हणून 'विद्यासेवक', 'ज्ञानकोश इतिहास', 'काव्यपरीक्षण,' 'प्राचीन महाराष्ट्र' या ग्रंथांत पुढें येणारा मजकूर '**पुणें-समाचारां**'तच प्रथम प्रसिद्ध होऊं लागला. पण यामुळें तो कांहीं वाचकांस साहजिकच शिळा वाटूं लागला, तर कांहींना या साप्ताहिकांत अप्रस्तुत वाटूं लागला. तेव्हां वर्षअखेर हें साप्ताहिकदेखील बंद करण्यांत आलें ! विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे, शेवटच्या अंकांत डॉ. केतकर यांनीं अगदीं मोकळ्या मनानें आपण वृत्तपत्र चालविण्यास नालायक आहों, असा आपला पराभव कबूल केला ! ही त्यांची शिपाईगिरीची निगर्वी दिलदार वृत्ति पुष्कळांस आवडली. याप्रमाणें या अल्पायु वृत्तपत्राचा इतिहास आहे.

वाइटांतूनहि चांगलें असें कधींकधीं निघतें, त्याप्रमाणें '**पुणें-समाचारा**'मुळें ज्ञानकोशाच्या संपादकवर्गाला संपादकीय क्षेत्रांतील एक नवा अनुभव मिळाला. डॉक्टरांच्या वहिवाटीप्रमाणें दोनचार अंकांनंतर सर्व जबाबदारी त्यांनीं प्रस्तुत लेखकावर टाकली. मधून-मधून मात्र ते स्वत: लोकांचें लक्ष वेधेल, विशिष्ट पक्षांत खळबळ उडेल, असा मजकूर देत. अशक्त आणि रोगी यांसाठीं कुक्कुटांड-पाक ( एग्-सूप ), क्लीहारस, मांसामिश्रित पौष्टिक अन्न इत्यादि मिळ-ण्याची शहरांतून प्रमुख जागीं व्यवस्था झाली पाहिजे, अशा आशयाची एक सूचना त्यांनीं केली होती ! 'पुणें शहराची ऐतिहासिक पाहणी' ही श्री. आबा चांदोरकर यांची लेखमाला संशोधनपर व

उपयुक्त असे. बडोद्यास जलप्रलय झाला असतां, श्री. य. रा. दाते गुजराती ज्ञानकोशाच्या कामासाठीं तेथें होते. तेव्हां त्यांनीं या जलप्रलयासंबंधीं प्रत्यक्ष पाहिलेली हकीकत खाजगी पत्रद्वारां जी लिहून कळविली, ती या वृत्तपत्रांतून खरीखुरी प्रथमच लोकांना वाचावयास मिळाली. या पत्राच्या द्वारें आपली व आपल्या अल्प कार्याची फुकट जाहिरात करण्याची संधि कांहीं शठ व घट लोक घेऊं लागले. विकतच्या जाहिराती मात्र फारशा मिळाल्या नाहींत. " ज्ञानकोशाला ग्राहक मिळविण्यासाठीं जसें तुम्ही जातां, तसें पत्राला जाहिराती मिळविण्यासाठीं दुकानदार-कारखानदार यांजकडेहि जात जा, " असें डॉ. केतकर बजावीत. तेव्हां जाहिराती मिळविण्याचाहि आम्हीं संपादकांनीं थोडाफार उद्योग केला. चार-आठ आण्यांच्या जाहिरातींसाठीं मोठ्या पगाराचा संपादकवर्ग लावणें हें गैरकिफायतीचें व गैरमुत्सद्दीगिरीचें तर खरेंच, पण त्यावेळीं तेंच काम महत्त्वाचें समजलें जाई. असो; ' पुणें-समाचारा'ची यापेक्षां अधिक विस्तृत कहाणी सांगणें नलगे. कारण, ह्या प्रकरणानें एकंदरींत डॉ. केतकरांच्या लौकिकांत भर पडली असें म्हणवत नाहीं.

[ लोकशिक्षण, मे–जून १९३७

# डॉ. केतकर यांचीं विविध कार्यें व योजना

दृष्टिक्षेप नववा

डॉ. केतकर यांनीं महाराष्ट्रीय ज्ञानकोश हें एक प्रचंड कार्य पूर्ण केलें. पण साधारणतः सार्वजनिक कार्यामध्यें पडणाऱ्या गृहस्थास एकच कार्य करतांना पण अनुषंगानें अनेक कार्यांत पडावेंच लागतें; व अशा कांहीं सार्वजनिक कार्यांत प्रथम काम केल्याशिवाय व त्याची हौस असल्याशिवाय मनुष्य कोणतेंहि मोठें कार्य करूं शकत नाहीं.

डॉ. केतकर हे विद्यार्थी असतांपासूनच एक चळवळे विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होते व त्यांच्या शाळेंतील व कॉलेजांतील आयुष्य-क्रमांतील आठवणी जर त्यांच्या सहाध्यायी मंडळींनीं प्रसिद्ध केल्या तर त्या बऱ्याच गमतीदार आढळतील.

डॉ. केतकर शाळेंत असतांपासून लहानमोठ्या कविता करीत असावे. त्यांनीं केलेल्या कवितांचें एक बाड ज्ञानकोश कचेरींत बरेच दिवस पडून होतें.

**महाराष्ट्र वाग्विलास—**

कॉलेजमध्यें असतांना त्यांनीं त्यांचे सहाध्यायी मित्र रा. बाळकृष्ण संतुराम गडकरी यांच्या सहकार्यानें 'महाराष्ट्र वाग्विलास' या नांवाचें एक मासिक चालविलें होतें, व त्याचें प्रचार-कार्य करीत असतां त्यांस मुंबईतील आलेले विविध अनुभव ते मोठ्या चटकदार रीतीनें सांगत असत.

बी. ए. च्या परीक्षेंत अपयश आल्यावर ते अमेरिकेंत गेले. मध्यंतरीं पुण्यास असतांना त्यांच्या मनावर लो. टिळकांच्या राज-कारणाचा बराच परिणाम झाला होता व कांहीं तरी राजकीय कार्य करण्याची पूर्वतयारी करण्याकरितां म्हणून ते अमेरिकेंत गेले

होते. अमेरिकेंत असतांना त्यांनीं समाजशास्त्र हा विषय अभ्यासाकरितां घेतला होता व त्यामुळें त्यांनीं तिकडील समाजाचें व आपल्या समाजाचें तुलनात्मक निरीक्षण केलें होतें. त्यामुळें त्यांच्या पुढील सर्व आयुष्यामध्यें प्रत्येक गोष्टीकडे समाजशास्त्राचा अभ्यासक या दृष्टीनें पाहण्याची त्यांस संवय लागली, व प्रत्येक गोष्टीचा एकंदर समाजावर कसकसा परिणाम पूर्वीं झाला व आज होत आहे या दृष्टीनें ते विचार करीत असत.

त्यांच्या एकंदर लिखाणांत या समाजविषयक विचाराचीच छाप सर्वत्र पडलेली दिसून येते. अमेरिकेंतील अभ्यासक्रम संपवून परत येतांना ते इंग्लंडमध्यें सुमारें दीड वर्ष राहिले. तेथेंहि त्यांनीं इंग्रज समाजाचें सूक्ष्म अवलोकन केलें व अनेक विषयांवरील ग्रंथांचें वाचन केलें. अमेरिकेंत पदवीकरितां त्यांनीं मनुस्मृतींतील समाजरचना व विशेषत: जातिभेद हा विषय घेतला होता व त्या विषयावरील निबंधावरूनच (हिस्टरी ऑफ कास्ट व्हॉ. १) त्यांस डॉक्टर ही पदवी देण्यांत आली होती. इंग्लंडमध्यें त्यांनीं याच जातिपद्धतीवर दुसरा ग्रंथ लिहिला व तो तेथेंच लुझाक आणि कंपनीनें प्रसिद्ध केला (हिस्टरी ऑफ कास्ट व्हॉ. २). तेथें त्यांस हिंदुस्थानांतील विद्यार्थीहि बरेच आढळले व त्यांच्या आयुष्यक्रमाचें त्यांनीं सूक्ष्म अवलोकन केलें. 'परागंदा' या कादंबरींत कांहीं अमेरिकन आयुष्यक्रमाचें व 'गांवसासू' या कादंबरींत इंग्लंडांतील आयुष्यक्रमाचें त्यांनीं चित्रण केलें आहे. इंग्लंडांत असतांच त्यांची मिस कोहन यांशीं ओळख झाली व विवाहनिश्चय झाला.

इंग्लंडमधून ते १९१२ सालीं हिंदुस्थानास परत आले, व त्यानंतर कलकत्ता येथें प्रोफेसरी करून नंतर कांहीं दिवस ते हिंदुस्थानाच्या बऱ्याच भागांत हिंडले व सीलोनासहि त्यांनीं भेट दिली सीलोनमधील समाजस्थिति अवलोकन करून त्यांनीं लोकशिक्षणांत

कांहीं लेख लिहिले. तेच पुढें ज्ञानकोशाच्या पहिल्या भागांत सामील केले. या प्रवासांतहि त्यांनीं एकंदर निरनिराळ्या प्रांतांतील राहणीचा सूक्ष्म अभ्यास केला व यासंबधीं संभाषण करतांना ते कांहीं वेळां मोठ्या मनोरंजक रीतीनें त्यांचें वर्णन करीत.

## विद्यामंदिर–

पुढें नागपुरास आल्यावर त्यांनीं 'विद्यामंदिर' या नांवाची एक संस्था स्वतःच सुरू केली व पुढील सर्व कार्य ह्या विद्यामंदिरा-मार्फत व्हावें अशी त्यांची इच्छा होती. ज्ञानकोशाच्या पहिल्या प्रकाशनावर (प्रॉस्पेक्टसवर) या विद्यामंदिराचा उल्लेख आहे. पुढें या संस्थेमार्फत त्यांनीं कांहीं विशेष कार्य केलें नाहीं, परंतु जेव्हां आम्हीं पुण्यास 'सरस्वतीमंदिर' ही संस्था नाइट हायस्कूल चालवि-ण्याच्या व इतर उद्देशांनीं स्थापन केली तेव्हां त्यांनीं आम्हांस अशी योजना सुचविली होती कीं, या संस्थेस जर तुम्ही 'विद्यामंदिर' हें नांव देत असाल, तर मी माझीं छापील सर्व पुस्तकें, (संकीर्णलेख, हिस्टरी ऑफ कास्ट भाग २, इंडियन इकॉनमिक्स व हिंदु लॉ) देऊन टाकीन परंतु आम्हीं सरस्वतीमंदिर ही संस्था ज्ञानकोशाचा किंवा डॉ. केतकर यांचा प्रत्यक्ष संबंध न ठेवतांच काढावयाची असें ठरविलें असल्यामुळें ती योजना आम्हीं मान्य केली नाहीं. ज्ञान-कोशाचें काम नागपुरास चालू होतें तोंपर्यंत 'विद्यामंदिर' ही पाटी त्यांच्या बसावयाच्या खोलींत दिसत असे.

## चातुर्वर्ण्य–संरक्षक पीठ–

त्याचवेळीं त्यांच्या मनांत हिंदुसमाजास नियंत्रक अशी शक्ति नसल्यामुळें एखादी संस्था काढून तिमार्फत हिंदुसमाजाचें नियंत्रण करावें अशी इच्छा होती. शंकराचार्य हे जगी समाजाचे नियंत्रक समजले जातात तरी त्यांस तसा वास्तविक अधिकार नाहीं. शंकरा-

चार्यांचीं पीठें अद्वैतमतप्रसारार्थ स्थापन झालीं व त्यांचें काम फक्त अद्वैतमतप्रसाराचें असून धर्मशास्त्र अथवा आचार नियंत्रणाचें कार्य पूर्वी काशी, पैठण, कऱ्हाड, नाशिक वगैरे मोठमोठ्या क्षेत्रांतील विद्वान् शास्त्री मंडळी करीत असत, व धर्मशास्त्रीय प्रश्नांवर निर्णय देत असत, व यासंबंधीं न्याय करण्याचें काम अष्टप्रधानांतील पंडित-राव किंवा न्यायाधिशाचें असे. शंकराचार्यांचें कधींच नव्हतें व त्यांस तसा अधिकार कधीं प्राप्त झाला नव्हता, असें त्यांचें म्हणणें असे. याकरितां डॉ. केतकर यांनीं एक 'चातुर्वर्ण्य–संरक्षक पीठ' या नांवाची संस्था स्थापन करावी म्हणून एक योजना छापून प्रसिद्ध केली होती व ती महाराष्ट्रांतील अनेक विद्वानांकडे पाठविली होती. डॉ. केतकर यांस चातुर्वर्ण्ययुक्त हिंदु समाजरचनेचा मोठा अभिमान असे व त्यांतल्या त्यांत ब्राह्मण्याचा फार मोठा अभिमान असे. ज्ञानयुक्त अशी जी समाजाच्या नेहमीं पुढें असणारी व समाजाच्या विचारांचें नियंत्रण करणारी संस्कृति ती ब्राह्मणी संस्कृति असून आपण आपलें सामाजिक उच्चत्व कायम ठेवलें पाहिजे, इंग्रजांचें अनुकरण करून त्यांस ब्राह्मणी संस्कृतीचें नेतृत्व देऊन आपण त्यांचें शूद्रत्व ऊर्फ वैचारिक दास्य पतकरूं नये, असा त्यांचा आग्रह असे. या बाबतींत कै. वि. का. राजवाडे यांचे व त्यांचे विचार बरेच जुळत असत. परंतु या नंतर लवकरच पुण्यास ज्ञानकोश कचेरी आणण्यांत आली, व त्यानंतर लवकरच त्यांचा विवाह झाल्यामुळें आणि म्हणून चातुर्वर्ण्यांतील त्यांचें स्वतःचेंच स्थान डळमळीत झाल्यामुळें या संस्थेची योजना तशीच पडून राहिली.

**केतकर्स बँक अँन्ड एजन्सी लि.–**

नागपुरास असतांना ज्ञानकोश मंडळास मधून मधून पैशाची अडचण आली असतां तेथील डागा यांच्या पेढींतून ओव्हर ड्राफ्ट

आणून ती भागविण्यांत येत असे. पण याकरितां जर आपणच एखादी योजना केली तर अधिक बरें असें वाटून त्यांनीं कांहीं मित्रांच्या साहाय्यानें 'केतकर्स बँक अँन्ड एजन्सी लि.' या या नांवाची एक खाजगी लिमिटेड कंपनी स्थापन केली होती. परंतु त्या कंपनीनें फारसा व्यवहार केला नाहीं व पुढें ती लवकरच गुंडाळण्यांत आली.

## ज्ञानकोश सेमिनार—

पुण्यास आल्यानंतर येथील एकंदर संपादकवर्गांत विचारांची देवघेव व्हावी, कार्यांत एकसूत्रीपणा असावा, परस्परांच्या वाचनाचा व ज्ञानाचा परस्परांस फायदा मिळावा, म्हणून सर्व संपादकवर्गानें पंधरा दिवसांनीं एकदां एकत्र जमून कोणीतरी एकानें कांहीं विषयावर निबंध वाचावा अगर व्याख्यान द्यावें, व नंतर सर्वांनीं चर्चा करावी असा उपक्रम करण्यांत आला. या प्रसंगीं इतरहि कांहीं विद्वान् मंडळीस निमंत्रण करण्यांत येत असे व श्री. तात्यासाहेब मेहेंदळे, प्रो. पोतदार, रा. दिवेकर वगैरे कांहीं मंडळी या कार्यक्रमास सतत पुढें मधून मधून हजर असत. पण पुढें डॉ. केतकर यांचा विवाह झाल्यामुळें व त्यांस प्रचारार्थ वगैरे बाहेर जावें लागल्यामुळें त्यांची उपस्थिति फारशी होईनाशी झाली, व इतरहि मंडळी हळूहळू कंटाळली व हा उपक्रम बंद झाला! या संस्थेचा पुन्हां एकदां जीर्णोद्धार करण्याचें त्यांनीं विद्यासेवकांत जाहीर केलें होतें पण तें प्रत्यक्षांत उतरलें नाहीं.

## स्त्रीकर्मसदन—

डॉ. केतकर यांच्या विवाहानंतर मिसेस केतकर या प्रथम प्रथम उत्साहानें कांहीं कांहीं गोष्टींत भाग घेत असत व आपण कांहीं कार्य करावें अशी त्यांची इच्छा असे. विशेषतः स्त्रियांकरितां अथवा

मुलांकरितां कांहीं तरी कार्य करावें अशी त्यांची इच्छा होती. त्याप्रमाणें डॉ. केतकर यांनीं त्यांचेकरितां एक शिवणकामाचा कारखाना काढून दिला. यास 'स्त्रीकर्मसदन' असें नांव देण्यांत आलें. यांत स्वतः मिसेस केतकर या देखरेख करीत असून, स्त्रियांस शिवण काम देऊन स्वावलंबी करावें अशी त्यांची योजना होती. कटर मात्र एक ख्रिश्चन पुरुष ठेवण्यांत आला. होता, व चार पांच शिवण्याचीं यंत्रें घेऊन व एकदम कापडाचे तागे घेऊन तयार शर्ट वगैरे करून विकावे असा उपक्रम करण्यांत आला. पण लवकरच तो कारखाना बंद करण्यांत आला व या कामीं त्यास कांहीं घस सोसावी लागली.

## पुणें नगर–परिषद्–

याच सुमारास त्यांनीं पुणें शहराची सुधारणा झाली पाहिजे असें मनांत योजून एक 'पुणें नगर–परिषद्' या नांवाची संस्था स्थापन केली. व तीमार्फत 'पुणें १९३०' या नांवाची, १० वर्षांत पुण्यांत करावयाच्या सुधारणा दाखविणारी, एक योजना प्रसिद्ध केली. या संस्थेचा उपयोग म्हणजे त्यावेळीं नवीन होणाऱ्या कौन्सिलाकरितां आपण उभें रहावें व या संस्थेमार्फत व संस्थेच्या खर्चानें आपला प्रचार करावा, अशी त्यांची मनीषा दिसली. तसेंच, या परिषदेच्या सभा मिसेस केतकर यांनीं स्त्रीकर्मसदनाकरितां घेतलेल्या जागेंत भरविण्यांत येत. तेव्हां जागाभाडें म्हणून त्या संस्थेस कांहीं रक्कम द्यावी अशीहि त्यांनीं सूचना केली, व स्वतःस प्रवर्तक म्हणजे सर्वाधिकारी असें ठरवून घेतलें. त्यामुळें इतर सर्वांचा उत्साह एकदम मावळून ती संपुष्टांत आली.

## ज्ञानकोश व्याख्यानमाला–

डॉ. केतकर यांस कै. वि. का. राजवाडे यांजबद्दल फार आदर असे. नागपुरास कचेरी असतां त्यांनीं त्यांस मुद्दाम तेथें एकदां रहा-

वयास बोलाविलें होतें व संपादकवर्गास त्यांनीं कांहीं व्याख्यानें द्यावीं असें सुचविलें होतें. त्याप्रमाणें त्यांनीं येऊन ऐतिहासिक संशोधनासंबंधीं कांहीं विचार एकदोन व्याख्यानांत सांगितले व कांहीं पत्रांच्या ( कऱ्हाड–गिजरे या प्रकरणांतील ) नकलाहि करून घेतल्या. परंतु तेथें त्यांची प्रकृति बरी न राहिल्यामुळें एक आठवड्याच्या मुक्कामानंतर ते लागलींच परत आले. डॉ. केतकर यांनीं स्वतः ज्ञानकोशाच्या लेखकवर्गासाठीं एक व्याख्यानमाला गुंफली व त्यांची एक परीक्षाहि घेतली होती.

## समाशास्त्रमंडळ–

पुढें पुण्यास कचेरी आल्यावर मधून मधून राजवाडे कचेरींत येत. त्यांच्या पुरस्कारानें एक 'समाजशास्त्रमंडळ' नांवाची संस्था १९२० मध्येंच स्थापन करण्यांत आली. हींत प्रारंभींचे सभासद, प्रत्येकीं पंचवीस रुपये देणारे असे, श्री. तात्यासाहेब मेहेंदळे, प्रो. दत्तोपंत पोतदार, डॉ. केतकर, रा. स. मा. दिवेकर, रा. य. रा. दाते व रा. शं. रा. राजवाडे असे होते. रा. वि. का. राजवाडे यांनीं दर पंधरवड्याच्या सभेंत समाजशास्त्रीय निबंध नियमानें दोन वर्षेपर्यंत वाचावयाचें कबूल केलें, व त्यांचें प्रकाशन वगैरे मंडळानें करावें असें ठरलें. परंतु चार–पांच बैठकीनंतर रा. राजवाडे यांच्याकडून निबंधहि आले नाहींत व तेहि येतनासे झाले, व वाचलेले निबंधहि स्वतःच घेऊन जात. आम्हीं कांहीं दिवस ज्ञानकोशाकरितांच तयार केलेले कांहीं समाजशास्त्रविषयक लेख वाचून दाखविले. पण ते ज्ञानकोशांत याव-याचे असल्यामुळें त्यांच्या वाचनांत गोडी लागेना. अखेरीस, ज्यांच्या-कडून पंचवीस रुपये आले होते त्यांचे त्यांपैकीं खर्चाकरितां पांच रुपये वजा करून राहिलेले वीस रुपये परत करावे असा ठराव करून

मंडळ बंद करण्यांत आलें. रा. शं. रा. राजवाडे यांजकडून कांहींच वर्गणी आली नव्हती तेव्हां त्यांस परत द्यावयाचा प्रश्नच नव्हता.

## स्वयंनिर्णयसंघ–

डॉ. केतकर यांचा राजकारणाकडे प्रथमपासून ओढा होता हें पूर्वीं सांगितलेंच आहे. प्रत्यक्ष जरी त्यांनीं वाङ्मयकार्य हातांत घेतलें असलें, तरी मधून मधून त्यांस राजकारणाची उसळी येत असे. नागपुरास येण्यापूर्वीं ते एका कॉंग्रेसला जाऊन आले होते, व आंध्र-प्रांतांत फिरत असतां त्यांस प्रिय असलेल्या भाषावार प्रांतरचना या प्रश्नास त्यांनीं बरीच चालना दिली. या दौऱ्यांत त्यांनीं कांहीं संस्कृत भाषेंतहि व्याख्यानें दिलीं. विशेषतः ते संस्कृत श्लोक म्हणून दाखवीत. यानंतर नागपुरास आल्यावर ते एक राजकीय चळवळेच समजले जात व प्रवासांत पुष्कळ दिवसपर्यंत त्यांचेबरोबर एक सरकारी 'बॉडी-गार्ड' असे. एकदां भुसावळ स्टेशनवर ड्यूटीवर असलेला पोलीस बदलून दुसरा आला, तेव्हा त्यानें यांचा चार्ज दुसऱ्याकडे देतांना भलत्याच मनुष्याकडे बोट दाखवून चॉर्ज दिला. तेव्हां डॉ. केतकर यांनीं तो नंबर माझा असून त्यांचा नव्हे असें त्या पोलिसास सांगितलें. पोलिसांचें कार्य सुकर व्हावें व आपलेंहि काम व्हावें म्हणून अनेकवेळीं ते स्टेशनावरील पोलिसासच आपलें तिकिट काढून आणण्यास सांगत. असो. याप्रमाणें नागपुरांत अधिष्ठित झाल्यावर, त्यांनीं व्हाइसरॉय साहेबांकडे एक खलिता पाठवून त्यांत निझामच्या राज्यास तोड म्हणून नागपुरास पुन्हां एक हिंदु संस्थान करावें व भोसल्यांचें राज्य पुनरुज्जीवित करावें अशी विनंती केली होती.

एकंदर जगांतील हिंदूंची पहाणी ब्रिटानिका व इतर साधनें यांचें साहाय्य घेऊन व कॉन्सल लोकांशीं पत्रव्यवहार करून त्यांनीं कर-ण्याचा प्रयत्न केला होता, व त्याचें फल लोकशिक्षणांत कांहीं लेख

लिहून वाचकांपुढें मांडलें होतें. राजकारणांत ते टिळक पक्षीय होते. पुण्यास आल्यावर पहिल्या कौन्सिलाच्या वेळीं आपण कौन्सिलास उभे राहण्याचें त्यांनीं जाहीर केलें होतें, व पुणें नगर–परिषद् ही संस्था त्याकरितांच काढली होती, यासंबंधीं वर उल्लेख केलाच आहे. लो. टिळकांच्या निधनानंतर त्यांनीं कांहीं सूचनात्मक एक खलिता महात्मा गांधी यांचेकडेहि पाठविला होता, पण त्यांनीं त्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. येरवड्याहून सुटून आल्यावर ससून हॉस्पिटलमध्यें महात्मा गांधींचा मुक्काम असतां ते त्यास भेटून यासंबंधीं कांहीं चर्चाहि करून आले होते. पुढें याच कल्पना त्यांनीं विस्तृत करून विद्यासेवकाच्या कांहीं अंकांत लेखमालारूपानें छापल्या व त्यांचेंच थोडें विस्तृत पुनर्मुद्रण 'निःशस्त्रांचें राजकारण' या पुस्तकांत केलें. ही चळवळ चालविण्याकरितां 'स्वयंनिर्णयसंघ' या नांवाची एक संस्था त्यांनीं काढली होती, व एक लिमिटेड कंपनीहि काढण्याचा त्यांचा विचार होता. अशा रीतीनें राजकारणांत आपण मोठी खळबळ उडवूं शकूं असें त्यास वाटत होतें. या कंपनीचा व चळवळीचा खर्च राजकाणावर निरनिराळे ग्रंथ लिहून ते खपवून चालवावयाचा अशी कल्पना होती, व 'निःशस्त्रांचें राजकारण' हें त्यांपैकीं पहिलें पुस्तक होतें. याच्या पांच हजार प्रती काढण्यांत आल्या होत्या. परंतु त्याचा खप फारसा न झाल्यामुळें ती कल्पना मग मागें पडली. या कार्याकरितां एक त्रैमासिकहि काढण्याचा त्यांचा विचार होता. १९२६ सालीं ते कौन्सिलाकरितां उभेहि राहिले होते. पण पुढें कांहीं लोकांच्या विनंतीवरून त्यांनीं माघार घेतली. त्यानंतर राजकारणासंबंधीं स्वयंनिर्णय परिषद्, भारतमंत्र्यावर फिर्याद, प्रांतिक कॉंग्रेसच्या कमिटीच्या अध्यक्षांवर फिर्याद, निरनिराळ्या तारा वगैरे गोष्टी सर्व परिचितच आहेत; त्यांचें येथें वर्णन करावयास नको.

## इतर योजना--

ज्ञानकोशाचें कार्य चालू असतां अनेक योजना त्यांनीं मनांत आणल्या होत्या व कांहींचा उपक्रमहि करण्यांत आला होता. परंतु त्या सर्व कमी अधिक प्रमाणांत अपूर्णच राहिल्या अथवा मुळींच मूर्त स्वरूपांत आल्या नाहींत. अशा तऱ्हेच्या योजनांपैकीं, इंडियन अँटिक्वेरीसारखीं जीं संशोधनात्मक नियतकालिकें आहेत त्यांतील लेखांची सूची करावी असा उपक्रम नागपुरास असतांना सुरू करण्यांत आला, व त्याकरितां एक 'बिब्लिओग्राफिक सिंडिकेट' म्हणून स्थापन करण्यांत आली व इंडियन अँटिक्वेरी या नियतकालिकांतील कांहीं ग्रंथांचीं सूचीपत्रेंहि करण्यांत आलीं. परंतु सदर सूची भांडारकर इन्स्टिट्यूट करीत असल्याचें समजलें व तें काम तसेंच सोडून देण्यांत आलें. याप्रमाणेंच भरतखंडांतील आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या शिलालेख, ताम्रपट वगैरेंचें पृथक्करण करून त्यांच्या व्यक्तिविषयक, स्थानविषयक, कालविषयक व विषयवार सूची कराव्या अशी एक योजना तयार करून ती भांडारकर इन्स्टिट्यूट, भारत इतिहास संशोधक मंडळ यांच्या सहकार्यानें पार पाडावी, असेंहि योजण्यांत आलें होतें, व त्याप्रमाणें या संस्थांस सहकार्याबद्दल लिहिलें होतें. परंतु असें सहकार्य मिळालें नाहीं व ती योजनाहि तशीच राहिली. याप्रमाणेंच श्रुति-स्मृति, सूत्रें वगैरे धर्मशास्त्रीय ग्रंथांतील धर्मशास्त्रविषयक वचनांचा विषयवार संग्रह करावा अशी एक योजना रा. वै. का. राजवाडे हे पुणें शाखेचे प्रमुख असतांना त्यांजकडे पाठविण्यांत आली होती. त्यावेळीं पुणें शाखेंत वे. शा. सं. धुंडिराजशास्त्री बापट दीक्षित व शंकरशास्त्री पराडकर ही मंडळी प्रत्यक्ष कार्य करीत होती व त्यांच्याकडून हें कार्य करावयाचें योजलें होतें; पण हेंहि कार्य प्रत्यक्ष झालें नाहीं. वाईच्या प्राज्ञपाठशाळेनें आतां धर्मकोशरूपानें

हें कार्य केलें आहे. हीं कार्यें सर्व ज्ञानकोशाकरितां जी माहिती जमवावयाची त्याची पूर्वतयारी म्हणून करावयाचीं होतीं. अशा तऱ्हेचें 'महाराष्ट्रीय वाङ्मयसूचि' हें कार्य मात्र प्रत्यक्ष कार्यरूपांत उतरलें. ज्ञानकोशाकरितां पूर्वतयारी म्हणून अशाच तऱ्हेचीं कांहीं आणखी कार्येंहि योजिलीं होतीं. ज्ञानकोशांत जे जैनधर्मविषयक लेख यावयाचे त्यांस आधारभूत म्हणून जैन धर्मासंबंधींच दोन ज्ञानकोशाच्या खंडांच्या आकाराचे स्वतंत्र ग्रंथ तयार करावे, व त्यांस लागणारें द्रव्यसाहाय्य जैन मंडळींनीं पुरवावें, अशी एक योजना नागपूर येथील जैन समाजाच्या पुढाऱ्यांपुढें मांडण्यांत आली होती; पण ती फलद्रूप झाली नाहीं. निरनिराळ्या जातींची यथायोग्य माहिती मिळण्याकरितां त्या त्या जातींचीं संशोधकमंडळें काढण्याचाहि प्रयत्न करण्यांत आला. निदान या संशोधनास चालना मिळावी म्हणून नौकशीच्या रूपानें उपक्रम करण्यांत आला. पण त्यांत आरंभीच गैरसमज व वादविवाद व पक्षोपक्ष निर्माण झाल्यामुळें हा उपक्रमहि सोडावा लागला. वैदिक संशोधनाकरितां पूर्व तयारीचें बरेंचसें लिखाण कचेरींत तयार करण्यांत आलें व या विषयांचा अभ्यासहि कार्यांत बराच झाला. त्यामुळें संपादकवर्गांत या अभ्यासाची गोडीहि बरीच उत्पन्न होऊन स्वतः डॉ. केतकर, रा. दाते व इतर शास्त्री-मंडळींनीं या संशोधनांत बरीच प्रगति केली. अवेस्ता वाङ्मयाचाहि अभ्यास अशाच पद्धतीनें करण्यांत आला होता. पण त्यास प्रत्यक्ष दृश्यफल फारसें आलें नाहीं. 'विद्यासेवक' हें मासिकहि ज्ञानकोशांत आलेल्या व पुढें येणाऱ्या विषयांसंबंधीं चर्चा करण्याकरितां म्हणून प्रथम काढण्यांत आलें होतें. व त्यासच 'ज्ञानकोश पुरवणी'चें रूप देण्याचा विचार होता पण त्याचें पुढें पर्यवसान तसें झालें मात्र नाहीं. 'पुणें समाचार' हें मात्र एक स्वतंत्र म्हणुन सुरू करण्यांत आलें होतें. पण त्याचा पृथक्‌पणा ठेवतां न आल्यामुळेंच तें इतकें लवकर

डबघाईस आलें. ज्ञानकोश पूर्ण झाल्यावर करावयाच्या योजनाहि अनेक होत्या. 'विद्यासेवक' मासिक म्हणून चालू ठेवणें ही एक योजना होती. 'हिंदुस्थान'खंडाप्रमाणें 'महाराष्ट्र खंड' काढणें व पुढें 'ज्ञानकोश पुरवणी खंड' काढणें अशीहि एक योजना होती. 'महाराष्ट्र खंडा'च्या योजनेंतून 'महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास' निघाला. वैदिक संहितांतील निवडक सूक्तें भाषांतरासह प्रसिद्ध करावीं अशीहि एक योजना होती व त्याकरितां सूक्तांची निवडहि रा. दाते यांनीं केलेली प्रसिद्ध करण्यांत आली होती.

ज्ञानकोशाचें निरनिराळ्या भाषांत भाषांतर करणें ही एक महत्त्वाची योजना कांहीं थोडचाफार प्रमाणांत सुरूहि झाली होती, व त्याप्रमाणें गुजराती ज्ञानकोशाच्या कार्यास सुरुवातहि झाली. आणि ज्ञानकोश मंडळाची घडी मोडली नसती तर तो ज्ञानकोश कधींच पुरा झाला असता. महाराष्ट्रीय ज्ञानकोशास गुजराती स्वरूप देतांना त्यांत कोणता फेरफार करावा यासंबंधींच्या टिपणाचे दोन ग्रंथ रा. दाते यांनीं तयार केले होते त्यावरूनच पुढें काम चालू होतें.पण या बाबतींत डायरेक्टरमध्यें ऐकमत्य नव्हतें, व डॉ. केतकर यांनीं तें वैयक्तिक जबाबदारीवर करण्याचें ठरविलें, त्यामुळें त्याची घडी मंडळाच्या घडामोडींबरोबर विसकटली ती पुन्हां नीट बसली नाहीं. त्याचप्रमाणें हिंदी, कानडी, तेलगू, तामिळ वगैरे हिंदुस्थानांतील सर्व भाषांत ज्ञानकोश इष्ट त्या फेरफारासह, पण महाराष्ट्रीय ज्ञानकोशावर आधारलेले असे, तयार व्हावे अशी त्यांची योजना असून त्याकरितां त्यांनीं त्या भाषांतील पुढाऱ्यांशीं विचारविनिमयहि केला होता. पैकीं गुजरातीचे दोन भाग तयार झाले व हिंदीचाहि एक भाग बाहेर पडला आहे. या कार्याकरितां लेखक वर्ग तयार करावा म्हणून त्यांनीं एक अकॅडमी काढण्याची योजना केली होती. पण तीस फारसे विद्यार्थी न मिळाल्यामुळें ती निघाली नाहीं.

हिंदुधर्माच्या आधुनिक स्वरूपास अनुसरून एक ' श्रीधरस्मृति ' तयार करावी अशी त्यांची एक कल्पना होती. तिचा उल्लेख त्यांनीं 'गोंडवनांतील प्रियंवदा' या कादंबरीच्या अखेरीस केला आहे. मध्यंतरीं त्यांच्या ओळखीचे एक आफ्रिकेंत राहणारे इंजिनिअर आले होते. त्यांनीं तेथें घायपाताचे मोठमोठे मळे असतात असें सांगितलें. तेव्हां डॉ. केतकर यांनीं, येथेंहि थोड्या खर्चांत भिकार जमिनीवर घायपाताची लागवड करतां येईल असें योजून, कॅनालच्या बाजूच्या घायपाताची व सिंहगडच्या आसपासच्या जमिनीची पहाणी केली होती, व स्वत:च्या कंपाउंडभोंवतीं घायपात लावून या योजनेचा आरंभ केला होता. पण त्यास पुढें दृश्य फळ आलें नाहीं.

अशा तऱ्हेनें, त्यांच्या अनेक कल्पनांत, त्यांच्या स्वभावांत असलेलें वैशिष्ट्य व वैचित्र्य पूर्णपणें दृष्टीस पडत असे.

[ प्रतिभा केतकर अंक ]

# डॉ. केतकर यांचें प्रापंचिक जीवन

## दृष्टिक्षेप दहावा

डॉ. केतकर यांचा स्वभाव कुटुंबशील होता असें वाटत नाहीं. त्यांचें बालपण किंवा विद्यार्थिदशा कुटुंबांत राहूनच गेली असली तरी ते कुटुंबाला चिकटून राहिले नाहींत किंवा कुटुंबाविषयीं फारशी आस्था त्यांना वाटत नसावी. कारण, घरांतील कामें करण्याची एखाद्याला जशी हौस असते किंवा अंगावर पडल्यानंतर जसा तो घरकाम करतांना दिसतो, तसें डॉक्टरांना पाहिल्याचें फारसें कोणाच्या आठवणींत नाहीं. लग्नापूर्वी त्यांना गृहसौख्य असतें तर ते विलायतेला जाण्यापूर्वी किंवा नंतरहि फटिंगाप्रमाणें वागतेना. वेळच्या वेळीं निजणेंउठणें, खाणेंपिणें, अभ्यास करणें इत्यादि संवयी जशा कुटुंबांतील साधारण मुलाला सहज लागतात, तशा त्या डॉक्टरांना नव्हत्या. त्यांचे वडील अगदीं लहानपणींच वारले व नंतर ते आपल्या चुलत्याकडे राहत असत. तेव्हां स्वतःचें घर असें त्यांना नव्हतें. विक्षिप्तपणा हें जें त्यांचें वैशिष्ट्य पुढें गणिलें गेलें त्याला कांहीं अंशीं कारण त्यांची बालपणची गृहस्थिति असावी. अगदीं आबाळलेला मुलगा जसा शेवटपर्यंत कांहींसा विचित्रच वागतो तशी वागणूक डॉक्टरांची वाटे.

सुशिक्षित स्त्रियांनीं पुरुषांबरोबर मनमोकळेपणानें बोलावें चालावें, लैंगिक मानसशास्त्रासारख्या विषयांवरहि निर्भीड विचार प्रदर्शित करावे, थट्टामस्करी करावी, वरून पातिव्रत्याचा खोटा आव घालून मनांतून अधर्म्य गोष्टींची इच्छा करण्याचें सोडून द्यावें, यांसारखीं त्यांचीं मतें लग्नापूर्वीं लिहिलेल्या ‘ गोंडवनांतील प्रियंवदा ’ या कादंबरींतून जीं आढळतात तीं त्यांना पटलेलीं अशींच होतीं.

आपली पत्नी ' प्रियंवदे ' सारखी असावी असें कोणाहि सुशिक्षित सुधारकास ती कादंबरी वाचून वाटेल; मग स्वतः कादंबरीकारालाहि तसें वाटत नसेल असें म्हणवत नाहीं. सुपरिचय, सहवास झाल्या-नंतर विवाह व्हावा अशी त्यांची आनुभविक सांगणी असे. पित्यानें आपल्या मुलांमुलींना विवाहपूर्व प्रेमाराधन करूं द्यावें, पण त्यांना पतिपत्नी निवडण्याच्या कामांत सल्लागार व्हावें, यासारखे विचार ' विचक्षणें'त डॉ. लोंढे यांचे आहेत. ' विचक्षणे 'तील डॉ. लोंढे व ' आशावादी 'तील देवीदासपंत अत्रे ऊर्फ ब्रम्हगिरिबुवा हीं बऱ्याच अंशीं डॉक्टरांचीं स्वतःचीं चित्रें आहेत, हें सुज्ञ वाचक जाणतातच. वडील माणसांनीं जुळवून दिलेले, विशेषतः निवळ वराचा दर्जा, पैसा इत्यादि बाह्य गोष्टी पाहून जुळविलेले संबंध, सुखाचे कसे होत नाहींत हें ' आशावादी 'तील विश्वामित्र–विहंग-मेच्या उदाहरणावरून त्यांनीं स्पष्ट केलें आहे. तसेंच सुशिक्षितता आणि सुसंस्कृतता या बाबतींतील पतिपत्नींमधील अंतर जेवढें कमी ठेवतां येईल तेवढें वैवाहिक सौख्यास हितकर होतें, हें याच कादं-बरींतील नंदिका–लालनाथ यांच्या द्वारें त्यांनीं दाखविलें आहे. डॉ. केतकर यांनीं आपला स्वतःचा विवाह जो परदेशी व परधर्मी प्रौढ कुमारिकेशीं जमविला त्याला इतर दुसरीं कारणें असलीं, तरी त्यांच्या स्वतःच्या मनावर अशा विचारांचा पगडा फार मोठा असला पाहिजे असें वाटतें. इकडील एखाद्या अशिक्षित ( विद्येनें किंवा विचारानें ), पण श्रीमंत प्रौढ तरुणीशीं विवाहबद्ध होऊन पुढें आचारविचारांत न जमल्यामुळें कष्टानें कसाबसा संसार चालवावयाचा किंवा नवराबायकोनीं विभक्त राहावयाचें, यापेक्षां पाश्चात्य देशांत राहिल्यामुळें आपल्या अंगवळणीं पडलेल्या युरोपीय राहणीची युरो-पीय वधू स्वयंवरानें पत्करणें श्रेयस्कर, असेंच डॉक्टरांना वाटलें असलें पाहिजे. पाश्चात्यविद्याविभूषित अशा हिंदु तरुणीशीं आपलें लग्न

व्हावें, अशी आशा धरून त्यांनीं त्या दिशेनें थोडीफार खटपट केल्याचेंहि ऐकिवांत आहे; परंतु ती खटपट फलद्रूप झाली नाहीं. व्रात्यस्तोमानें हिंदुकृन अशा युरोपीय सुशिक्षित महिलेशीं जेव्हां डॉ. केतकरांचा विवाह झाला, तेव्हां अनेक सनातनी आणि सुधारक लोकांत तो थट्टेचा—चर्चेचा विषय होऊन बसला होता. कोणी डॉक्टरांचें महत्त्व इतकें कसें वाढलें म्हणून असूया बाळगीत, तर कोणी बाई खरोखरीच राजीखुषीनें, अक्कलहुषारीनें विवाहबद्ध झाल्या असतील का. याची रिकामी चौकशी करीत बसत. मिस् मिलरच्या लग्नाच्या वेळींहि अशा शंका निघाल्या होत्या, हें वाचकांस आठवत असेलच. एकदा एका अहंमन्य, महत्त्वाकांक्षी, पुनर्विवाहेच्छु संस्थानी अधिकाऱ्यानें, त्यांच्या घरीं '**ज्ञानकोश**' खपविण्यासाठीं आम्हीं गेलों असतां बोलतां बोलतां डॉक्टरसाहेबांस कुतूहलानें पृच्छा केली कीं, "आपण या बाईशीं कसें व कां लग्न केलेंत?" थोडेसें विषण्ण होऊन पण, हंसतच डॉक्टरांनीं त्याला मार्मिक उत्तर दिलें कीं, "मला येथें बायको कोण देत होता? कसेंतरी जमविलें झालें!" या सहजासहजीं दिलेल्या उत्तरांत त्यांचा अनुभव आणि समाजनिरीक्षण हीं दोन्ही प्रतीत होतात यांत संशय नाहीं. डॉक्टरांसारख्या व्यापक विचाराच्या आणि वृत्तीच्या माणसाला वीस वर्षांपूर्वी आपल्या समाजांत मनाजोगी बायको मिळणें शक्य झालें असतें काय?

डॉक्टरांची लग्नापूर्वीची कांहींशी—का बरीच अव्यवस्थित देशी राहणी लग्नानंतर झपाट्यानें बदलत चालली. हिंदु पोशाख टाकून ते नीटनेटके साहेबी कपडे चढवूं लागले; तथापि हा नवा पेहराव अघळपघळ वागण्याला आपल्या सोयीचा आहे असें त्यांनाच वाटत नसावेंसें दिसून येत होतें. घरांतहि पाश्चात्य चालीचीं दृश्यें दिसूं लागलीं व घरगुती भाषा इंग्रजी झाली. तेव्हां हें पाहून साहजिकच

त्यांचे सहकारी आणि स्नेही आपआपसांत बोलतांना या ' ट्रॅन्सफर सीन ' वर टीका करून म्हणत कीं, " डॉक्टरांनीं बायकोला हिंदु करण्याचा प्रयत्न केला, पण तिनेंच उलट त्यांना ख्रिस्ती बनविलें ! " इंग्रजी चालीप्रमाणें चारचौघांत पत्नीला 'डार्लिंग ' म्हणून संबोधणें, निरोप घेतांना गालांना ओष्ठस्पर्श करणें, गाडींतून चढतांउतरतांना स्त्रीला हात देणें इत्यादि गोष्टी आपल्या समाजांत पाळणें डॉक्टरांना कितपत आवडत होतें याची शंका आहे. अशा पाश्चात्य चालींवर त्यांनीं कडक टीकाहि केलेल्या आहेत. मग भिडेनें ते तसें करीत होते कीं काय नकळे ! आपले विचार अखिल जगाला पटवूं अशी धमक बाळगणाऱ्यांना घरांतच निष्प्रभ होण्याचे प्रसंग मनाला किती खात असतील याची कल्पना करावी. दुसरी एक अशीच गोष्ट म्हणजे, लग्नापूर्वी व नंतरहि कांहीं दिवस ते गांवांत भर ब्राह्मणवस्तींत राहात होते; पण स्वतंत्रपणा आणि बंगलेवजा घर यांची आवश्यकता वाटल्यानें व विशेषतः या वेळीं त्यांचे सासरे आणि मेहुणी हें कोहन-कुटुंब इंग्लंडाहून इकडे कायमचें राहण्यास आल्यानें, फर्ग्युसन कॉलेज रस्त्यावरील पद्मभुवनांत डॉक्टरांचें बिऱ्हाड हाललें. पण तीहि जागा लवकरच अप्रशस्त वाटून, शिवाय आतां पुण्यास स्थाईक होण्याची वेळ आल्यानें त्यांनीं पी. वाय. सी. सी. जिमखान्यामागें एक जागा भाड्यानें घेतली व तीवर लहानसा बंगला बांधला. तथापि या स्वतःच्या बंगल्यांतहि ते फार काळ नांदूं शकले नाहींत. पत्नीला हिंवतापाचा आजार आणि प्रपंचाला पाहिजे त्या जिनसा मिळण्याच्या गैरसोई इत्यादि गोष्टींमुळें ते जे लष्करांत जाऊन राहिले ते शेवटपर्यंत. तीनचार वर्षांपासून त्यांचें ' आशास्थान ' भरवस्तींत आलें असूनहि तेथें परत राहण्यास ते आले नाहींत. छोटी ज्ञानकोश कचेरी व छापखाना मात्र तेथें ठेविला होता आणि ते लष्करांतून तेथें रोज हेलपाटे घेत. या बाहेर राहण्यानें त्यांचा काय फायदा झाला

असेल तो असो, पण ते आपल्या हिंदु समाजापासून दुरावले खरे. टीकेला भिऊन स्वजनांमध्यें न राहतां, समाजाशीं फटकून श्रीमंत सुधारक लोक बाहेर स्वतंत्रपणें राहतात व परभारें सुधारणेचा टेंभा मिरवितात, अशा आशयाच्या डॉक्टरांनीं मागें अनेकदां कडक टीका केल्या आहेत. खऱ्या समाजसुधारकानें आपल्या समाजांतच, सनातनी लोकांकडून होणारा छळ सोसून, हालअपेष्टेंतहि राहून इष्ट सुधारणा समाजांत रुजविण्याचें कार्य केलें पाहिजे, असें ते जोरानें प्रतिपादीत. आणि त्यांनाच स्वतःला टीकाविषय होण्याची जी वेळ आली ती त्यांना टाळतां आली नसती असें नाहीं. पण प्रतिष्ठित पत्नीच्या मनाविरुद्ध जाण्याचें ते दूरदृष्टीनें बहुधा टाळीत. गृहशांति राखण्याविषयीं जपण्यांत त्यांची थंड प्रकृति, तशीच त्यागवृत्ति दिसून येते. पत्नीविषयीं त्यांना फार आदर असे. त्या जें करतील तें आपल्या कुटुंबाच्या हितार्थेच असणार याविषयीं त्यांना शंका नसे. श्रीमती शीलवतीबाईंनींहि प्रथम कांहीं दिवस हिंदु स्त्रीसमाजांत वावरण्याची हौस दाखविली होती; पण या स्त्रीसमाजाचें अपरिहार्य अज्ञान किंवा जुने आचारविचार यांविषयीं वीट मानूनच कीं काय, त्या या समाजांत पुढें मिसळेनाशा झाल्या; आणि त्यांच्या हातून येथील स्त्रीसमाज सुधारण्याचें कांहीं भरीव उपयुक्त कार्य होईल अशी जी सामान्य अपेक्षा डॉक्टरांच्या चाहत्यांनीं बाळगिली होती, ती फलद्रूप झाली नाहीं हें खरें. उलट, त्यांना आपला जन्मजात ख्रिस्ती समाज जवळचा वाटूनच कीं काय त्या छावणींतील साहेब लोकांच्या वस्तींत राहण्यास गेल्या व आमच्या डॉक्टरांना त्यांचा प्रिय हिंदु समाज आणि साहित्यिकवर्ग दूरवर्ती झाला, असे प्रवाद सारखे उठल्यास नवल नाहीं. यांत बाईंकडे जाणूनबुजून घडलेला विशेषसा दोष येत नसेल; तरी डॉक्टरांच्या वारंवार भेटी व दीर्घ सहवास यांचा लाभ गेलीं दहाबारा वर्षें पुणें शहरांतील लोकांस

विशेष घडत नसे, ही गोष्ट खोटी नाहीं. यामुळें, लोकांत त्यांच्याविषयीं अधिकाधिक वृद्धिंगत होत जावयाची सहानुभूतीहि खुंटून बसली. ते जवळच राहते तर त्यांच्या धंद्यालाहि जास्त फायदा झाला असता व उलट, त्यांच्या विद्वत्तेचा आणि व्यापक विचारांचा लाभ लोकांस सहजासहजीं मिळता, असें प्रामाणिकपणें पुष्कळांस वाटतें. यांत त्यांची चूकहि होत असेल कदाचित्.

गृहसौख्यासाठीं डॉक्टरांना कांहीं बाबतींत रुचिस्वातंत्र्य गमवावें लागलें व तें अवश्यहि होतें. त्यांच्या कोठें तरी कांहीं तरी भरमसाट खाण्यापिण्यावर पत्नीचें नियंत्रण पडलें. हें नियंत्रण त्यांना केव्हां केव्हां जाचक होत असावें, असें दिसे. कारण, घराबाहेर असतांना कधीं कधीं ते पुनः पूर्वपदावर येत. तथापि नियंत्रणाचा त्यांना प्रकृतिस्वास्थ्याच्या कामीं चांगला उपयोग झाला यांत संशय नाहीं. " मी रोज काय खातों, सिगारेट किती ओढतों यावर त्यांचें ( शीलवतीबाईंचें ) लक्ष असे, व या बाबतींत मी त्यांच्या नेहमीं धाकांतच असें, " असें डॉक्टर स्वतःच कबूल करितात. ही बाईंची कामगिरी निःसंशय पतिव्रताधर्माला अनुसरूनच होती म्हणावयाची. डॉक्टरांच्या आरोग्याविषयीं त्या फार जपत व जे डॉक्टर इतरांचें ऐकणार नाहींत ते निमूटपणें बाईंचें ऐकत. यांतच दोघांचा दांपत्य-धर्म दिसून येतो.

लग्नानंतर डॉक्टरांच्या कांहीं विचारांवरहि त्यांच्या पत्नीचा पगडा बसलेला दिसून येई. एखाद्या गोष्टीविषयीं बरेवाईट ग्रह ते धरून बनवून येत असें वाटे ! त्यांच्या घरांत भुताटकीचे प्रकार होत असलेले जगजाहीर झाले आहेच. त्या प्रकारांवर डॉक्टरांचा एवढा कसा दृढ विश्वास बसला याचेंच सर्वांना राहून राहून आश्चर्य वाटे ! एवढे बुद्धिप्रामाण्यवादी आणि पाखंडी मताचे विद्वान् भुताटकीला बळी पडतात व ती घालविण्यासाठीं गुरु, मंत्रतंत्र, केडगांव-

वेटाची वारी इत्यादि अज्ञजनसंमत उपायांचा अंगीकार करितात, हें पाहून वयाच्या मानानें आणि हालअपेष्टेच्या योगानें त्यांच्या बलवान् मेंदूची शक्ति क्षीण होत चालली कीं काय, अशी भीति त्यांच्या स्नेह्यांना सकारण वाटूं लागली होती. नारायण-पेठेंत सदावर्त्यांच्या रामाच्या देवळांत गोंदवलेकर महाराजांचे एक शिष्य राहत होते. त्यांच्या घरीं रात्रीं महाराजांची आरती होते, त्यावेळीं एका भक्ताच्या अंगांत महाराज येऊन आर्तांच्या प्रश्नांचीं उत्तरें देतात, असें कोणीं सांगितल्यावरून मी आणि डॉक्टर भूतबाधा झालेल्या मुलाला घेऊन आरतीस गेलों होतों; तेव्हां अंगांत येऊन महाराजांनीं मुलाला भिकारदास मारुतीचें दर्शन घेण्यास व मारुतिस्तोत्राचा जप करण्यास सांगितलें! मी डॉक्टरांकडे सारखा पाहात होतों, पण त्यांच्या चेहऱ्यावर अविश्वासाची छटा दिसत नव्हती, तर काळजी ची दिसत होती–इतकी त्यांना घरच्या भुताट-कीची सत्यता पटवून दिली गेली होती! ही भुताटकी अद्यापि मूळ धरून आहे असा केतकर–कुटुंबाचा समज राहिला आहेच; आणि त्यासाठीं दैवी उपायहि चालू असतात. या प्रकारानें आपलें हंसें होत आहे, हें डॉ. केतकर यांना समजत नव्हतें असें म्हणवत नाहीं; पण पत्नीच्या भावनांविषयीं त्यांना अत्यंत आदर असल्यानें मनः-कल्पित भूतबाधानिवारणार्थ त्यांना सारे भाबडे प्रकार करावे लागले!

त्यांनीं दोन मुलें जीं बाळगिलीं तींहि त्यांना स्वतःला मुलांची विशेष आवड होती म्हणून बाळगिली असें वाटत नाहीं. शीलवती-बाईंना स्त्रीधर्माप्रमाणें मुलांचा सहवास पाहिजे आहे व त्यांचें लालन पालन करण्याची मातृवत्सलता त्यांच्या ठिकाणीं जागृत झाली आहे, अशी त्यांच्या निकटवर्तियांची दृढ समजूत असे. एरवीं उपऱ्या मुलांचें लचांड व त्यासाठीं होणारा मोठा खर्च डॉक्टरांसारखे भावना-रहित अर्थशास्त्री मार्गे लावून घेते ना. पहिला मुलगा तीनचार

वर्षांचा ब्राह्मणजातीचा ठाण्याच्या अनाथगृहांतून आणिला. पण तो शिशुसंवर्धनाला मोठा पडूं लागला म्हणून कीं काय दहा दिवसांच्या आंतली एक मुलगीहि मुंबईच्या एका प्रसूतिगृहांतून त्यांनीं मिळविली. अगदीं लहान—वर्षाच्या आंतलें मूल सांभाळण्यास पाहिजे अशी त्यांनीं यापूर्वीं वर्तमानपत्रांतून जाहिरातहि दिली होती ! या लहान मुलीचें शरीरपोषण करण्यास एका दाईचीहि साहजिकच जरूरी लागली. याप्रमाणें डॉक्टरांच्या घरीं मुलांचें रडणें खेळणें ऐकूं येऊं लागलें व दुधाची तहान ताकावर भागली. पुढें साहजिकच सहवासानें डॉक्टरांच्या ठिकाणीं अपत्यवात्सल्य उत्पन्न झालें असावें. ते मुलाचें नांव ‘ दामोदर हरि बापट ’ या ऐवजीं ‘ दामोदर श्रीधर केतकर ’ असें लावूं लागले. मुलाचें दत्तविधान आणि मुंजहि त्यांनीं गतवर्षीं एक दिवस श्री. चित्रावशास्त्री यांस बोलावून पार पाडल्याचें प्रसिद्ध झालेंच होतें. या मुलाचें शाळेंतील शिक्षण मात्र त्यांना अनेक अडचणींमुळें नीट करतां आलें नाहीं. याविषयीं बाईंना जेव्हां साहजिक रुखरुख वाटे, तेव्हां डॉ. केतकर पाठशालीन शिक्षणाचें वैयर्थ्य पटवून त्यांचें समाधान करीत. आपल्या धंद्याची व्यवस्था त्यानें पाहावी अशा इच्छेनें त्यांनीं एकदोन वर्षांपासून आपल्या दामूला ज्ञानकोशकचेरींत काम दिलें होतें. मुलगी वरि, तेराचौदा वर्षांची आहे, तरी ती जाणती व आईबापांविषयीं अधिक ममता बाळगणारी आहे असें वाटतें. हीं मुलें ज्याचा डॉक्टरांना जाज्वल्य अभिमान असे त्या ब्राह्मणी किंवा हिंदु संस्कृतींत देखील वाढलीं नाहींत; तेव्हां या मानीव अपत्यांकडून डॉक्टरांची परंपरा चालविली जाईल व त्यांचें नांव निघेल अशी अपेक्षा करण्याला आजतरी कांहीं जागा नाहीं, असें कष्टानें म्हणावें लागतें. डॉक्टरांची औरस संतति कशीहि निघाली असती तरी त्यांचें नांव हक्कानें चालविलें गेलें असतें आणि तिच्यासंबंधीं कांहीं जबाबदारी हिंदु समाजाला वाटली असती. असो.

डॉक्टरांच्या पत्नी श्रीमती शीलवतीबाई या चांगल्या सुविद्य आणि स्वतःवरची मोठी जबाबदारी विशेषत्वानें ओळखणाऱ्या आहेत. त्यांनीं इंग्लंडांतून येऊन धर्मांतर करून गांद पंडित, पण श्रीमान् नसलेल्या पुरुषाशीं विवाहबद्ध होण्यांत जो स्वार्थत्याग व तत्त्वनिष्ठा दाखविली, आणि पतीच्या मृत्यदिनापर्यंत त्याची एकनिष्ठेनें सेवाचाकरी केली, आणि त्याला जनसेवा व साहित्यसेवा करण्याला स्वास्थ्य मिळवून दिलें, याबद्दल कोणीहि त्यांना धन्यवाद देईल. डॉ. केतकरांच्या मागेंहि त्यांचे ग्रंथ प्रकाशित करण्याचें बिकट कार्य त्यांनीं कर्तव्य म्हणून अंगीकारिलें आहे व त्यासाठीं त्या हल्लीं अतिशय परिश्रम घेत आहेत. तेव्हां त्यांच्यामुळेंच महाराष्ट्राला डॉ. केतकरांचें उर्वरित अप्रकाशित साहित्य लाभणार आहे यांत शंका नाहीं. हे श्री. शीलवतीबाईंचे गुण आणि कर्तव्यनिष्ठा ध्यानांत घेऊन हि डॉक्टरांच्या एकंदर वैवाहिक जीवनाकडे पाहतां कांहीं विचारी इष्टमित्रांना असें वाटल्यावांचून राहत नाहीं कीं, डॉक्टरांनीं आपल्या समाजांतील एखाद्या सुशिक्षित हिंदु स्त्रीबरोबर संसार थाटला असता तर अधिक बरें होतें. जहागिरदार घराण्यांतील माणूस कितीहि गरिबीनें राहूं लागला तरी त्याच्या पूर्वीच्या संवयी आणि चालीरीती त्याला साधारण माणसापेक्षां अधिक मिजासखोर आणि खर्चिक बनवितात; पण अधिक खर्च होऊनहि त्याला पाहिजे तें सुख लागत नाहीं. अशीच गोष्ट युरोपीय पद्धतीच्या राहणीची आहे. त्या राहणीचा दर्जा आणि उच्च विचारांबरोबर येणाऱ्या कृति यांमुळें साधारण श्रीमंत हिंदु कुटुंबाला जो खर्च लागेल त्यापेक्षां कितीतरी जास्त खर्च युरोपीय राहणीला लागतो. डॉक्टरांना ज्ञानकोशांतून साधारणपणें दरमहा चारशें रुपये बारा वर्षें उचलतां आले, असें त्यांनींच ज्ञानकोशाच्या इतिहासांत आंकडे देऊन पटविलें आहे. तेव्हां एवढ्या प्राप्तींत त्यांना 'प्रॉव्हिन्शियल सर्व्हिस' च्या सरकारी

अधिकाऱ्याप्रमाणें बिनअडचणीनें—स्वास्थ्यानें राहतां आलें नसतें काय, असें साहजिकच कोणालाहि वाटेल. हिंदु पत्नीमुळें आपल्या समान सांपत्तिक दर्जाच्या समाजांतच त्यांचें बिऱ्हाड राहून त्यांना आणि समाजालाहि परस्परांपासून लाभ झाला असता व त्यांच्या कुटुंबाविषयीं समाजाला इतका परकेपणा वाटता ना. परंतु स्वदेशीय विवाह अधिक श्रेयस्कर झाला असता कीं नाहीं हा प्रश्न सोडविणें फार नाजुक आणि अवघड काम आहे. तिऱ्हाइताला जें वाटतें तें बरोबरच असतें असें नाहीं. शिवाय घडलेल्या प्रसंगावर मागाहून टीका करणें अप्रशस्त असतें. तेव्हां हा प्रश्न इतकाच सोडणें बरें.

डॉक्टरांच्या वर्तनामध्यें करडा हिशेबीपणा नसे. ते प्रथम अंदाजपत्रक तयार करतांना फार काटेकोरपणानें आंकडे मांडीत व तोंड मिळवणी करीत. इतकेंच नव्हे, तर भला मोठा फायदाहि शेवटीं जमेला धरीत. पण प्रत्यक्ष व्यवहार सुरू झाला कीं, ते अंदाजखर्चाकडे न पाहातां कार्यक्षमता आणि सौकर्य यांकडेच लक्ष देत. एखादी कल्पना आली कीं, तिच्या महत्त्वानें ते भारले जात व कृतीला लगेच प्रारंभ म्हणून कांहीं पैसा खर्च करीत. पुढें लवकरच त्यांना तिचें वैयर्थ्य आढळून येई. पण ते घातलेल्या पैशाबद्दल किंवा झालेल्या नुकसानीबद्दल मात्र हळहळत बसत नसत. ज्ञानकोशमंडळानें प्रत्यक्ष ज्ञानकोशप्रकाशनाखेरीज कितीतरी गोष्टींत असा पैसा खर्च केला आहे. त्याचा अजमास केला तर पंचवीस हजार रुपयांपर्यंत तो आंकडा जाईल ! अशा नवीन उपक्रमांपासून संपादकवर्गास सहजासहजीं नवीन नवीन ज्ञानाचा लाभ झाला यांत शंका नाहीं. स्वतःच्या खासगी खर्चांतहि त्यांचा असाच गैरहिशेबीपणा दिसे. बंगला सुमारें चार हजारांत होईल असा अंदाज केला, पण लागले पैसे दुप्पट व व्याज आणि कोर्टखर्च यांनीं ते तिप्पट झाले ! तो बरींच वर्षें वापरण्यांत नसल्यानें त्याची किंमत मूळ अंदाजाइतकी उतरली. डॉक्ट-

रांना या बंगल्यापासून अर्थात् फार नुकसान पोंचलें व स्वास्थ्यहि गेलें. छपाईचीं यंत्रें घेण्याच्या बाबतींतहि अशाच गोष्टी घडल्या आहेत. त्यांचा दुर्दम आशावाद त्यांना वस्तुस्थितीकडे डोळेझांक करण्यास लावी. कधीं कधीं त्यांचा उदारपणाहि त्यांना नडला आहे. तथापि चांगल्या हाताखालच्या हिशेबनिसाशीं ते दबकून वागत व आपला हिशेब चोख देत. हिशेबनिसाची किंमत व व्यवस्थित हिशेबाचें महत्त्व ते फार ओळखीत. त्यांच्याजवळ चांगला सल्लागार चिटणीस आणि हिशेबनीस असेल तर ते फार पद्धतशीर असत. मोठ्या विद्वान् माणसाला व्यावहारिक जमाखर्च, पत्रलेखन, बाजारहाट इत्यादि सामान्य गोष्टी नीट करतां येत नाहींत, हा सर्वत्र अनुभव आहेच. तेव्हां या वैगुण्यानें डॉक्टरांचा मोठेपणा कमी होतो असें नाहीं. फक्त या ठिकाणीं एवढेंच स्पष्ट नमूद करून ठेवावेंसें वाटतें कीं, चांगल्या सल्लागारांच्या विचारें डॉक्टर नेहमीं चालते तर झालें यापेक्षाहि जास्त कार्य जास्त सुखानें त्यांना करतां आलें असतें; आणि त्यांचें जीवनहि शेवटीं कष्टमय बनलें नसतें.

डॉक्टरांसारखी अद्वितीय वैशिष्ट्यपूर्ण व्यक्ति प्रपंचभारासाठीं उपयोगींच नाहीं. तिचें कार्य भिन्न आणि साधनेंहि अभिनव. एखादा माणूस जसा केवळ संसाराला जुंपलेला-वाहिलेला असतो, तसा दुसरा माणूस केवळ साहित्यसेवेला, लोकसेवेला म्हणूनच निर्माण केलेला असतो. एकाची तुलना दुसऱ्याशीं करून चालणार नाहीं. याप्रमाणें डॉक्टरांना नेटका प्रपंच करतां आला कीं नाहीं या विचारावरून त्यांची इतर क्षेत्रांतील कर्तबगारी कमी किंमतीची मुळींच ठरणार नाहीं. केवळ चरित्र म्हणून त्यांच्या प्रापंचिक जीवनाकडे पाहावें, त्यांत उणेपणा कां आला याची वाटल्यास मीमांसा करावी, पण दोष देऊं नये.

डॉ. केतकरांचें प्रापंचिक जीवन रेखाटणें हें फार नाजूक व जबाब-

दारीचें काम आहे. प्रथम माहिती पूर्ण आणि खरीखुरी पाहिजे व ती मांडण्यांतहि विशेष शिष्टाचार आणि तारतम्य ठेविलें पाहिजे. या दृष्टीनें प्रस्तुत लेखक फारसा अधिकारी नाहीं, हें तो जाणतो. तथापि डॉ. केतकरांच्या चरित्र लेखनाचीं साधनें जितकीं उपलब्ध करून ठेवितां येतील तितकीं या विशेषांकांत करून ठेवावीं या हेतूनें ' लोकशिक्षणा ' च्या संपादकांनीं अशा लेखाची आग्रहानें मागणी केल्यामुळेंच लेखणी हातीं धरावी लागली. तेव्हां प्रस्तुत लेखाचा बरेवाईटपणा व त्यांतील सत्यासत्यता हीं अधिकारी वाचकांनींच ठरवावयाचीं आहेत.

[ लोकशिक्षण, जुलै १९३७ ]

# उपसंहार

आतां पावेतों जे दृष्टिक्षेप टाकले ते (पहिला सोडून) डॉ. केतकर यांच्या निधनानंतर थोड्याच दिवसांतील वा महिन्यांतील होते. तेव्हां त्यांत तत्कालीन आणि प्रासंगिक तेवढ्याच छटा उमटणें साहाजिक आहे. त्यावेळीं डॉ.केतकरांचें यथातथ्य गुणदोष वर्णन करण्याला अद्यापि अवधि होता. हा अवधि फार लांबवूं नये अशी अनेक विचारी विद्वानांनीं इच्छा प्रदर्शित केली होती. डॉक्टरांशीं अल्पपरिचित व त्यांच्या कांहीं नवमतवादी विचारामुळें सहानुभूति उत्पन्न झालेले तरुण लेखक त्यांची अवास्तव स्तुति करून समाजाला जेव्हां दोष देत, तेव्हां वरील मंडळी डॉक्टरांच्या निकट सान्निध्यांतील म्हणून आम्हांला डॉक्टरांचें सत्य चरित्र लिहिण्याचा आग्रह करीत. पण आम्ही डॉक्टर जसे होते तसे रंगवूं लागलों तर आमच्यावर गहजब होईल व विनाकारण कृतघ्नतेचा आरोप आम्हीं ओढवून घेऊं, अशी आम्हाला साधार भीति वाटे व अद्यापिहि वाटते. डॉक्टरांचे अद्वितीय गुण जसे आम्हांला पूर्णपणें ज्ञात होते तसेंच त्यांचे कार्यहानिकर असे दोषहि सुपरिचित होते. तेव्हां आमच्या चरित्रलेखनांत या दोहोंचा योग्य परामर्ष आला नाहीं तर कांहीं उपयोग नाहीं. आमच्याबद्दलच्या अपेक्षा फोल ठरल्यासारखें होईल. तेव्हां डॉक्टरांचें चरित्र आम्हीं लिहावयाचें तर तें बरेंच विस्तृत आणि सर्वांगीण होणार. या कामाला प्रस्तुत युद्धकाल योग्य नाहीं. तथापि डॉ. केतकरांच्या संबंधीं आम्ही अनुभवानें जें कांहीं निरनिराळ्या ठिकाणीं लिहिलें आहे तें जर एकत्र केलें तर आमच्या चरित्रलेखनाचें कांहींसें स्वरूप, आमच्याकडून चरित्राची अपेक्षा करणाऱ्यांना दिसेल व आम्हींहि डॉक्टरांचें थोडें ऋण फेडल्यासारखें होईल.

या ग्रंथांतील लेखांतून डॉक्टरांचें व्यक्तिमत्व व त्यांचें ज्ञानकोश

विषयक कार्य भरपूर प्रतीत झालेलें आहे. तथापि डॉक्टरांचें सर्व वाङ्मय किंवा लेखन याची चिकित्सक पाहाणी यांत मुळींच नाहीं. त्यांचे सामाजिक, धार्मिक आणि अर्थशास्त्रीय विचार ज्ञानकोशाच्या प्रस्तावनाखंडांत जसे पाहाण्यास मिळतात तसे राजकीय विचार मिळत नाहींत. त्यासाठीं " निःशस्त्रांचें राजकारण ", 'Victorious India' व इतर लेख अभ्यासले पाहिजेत. त्यांच्या कादंबऱ्या समाजशास्त्रीय विवेचनाचे प्रबंधच म्हणतां येतील. डॉक्टरांच्या साहित्यांत त्यांचा स्वतंत्र गट पडतो.

वैदिक वाङ्मयाच्या चिकित्सक अभ्यासांत एकवेळ डॉक्टर गढून गेले होते तर दुसऱ्यावेळीं प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासाचे सूक्ष्म धागे उकलण्याचें त्यांनीं जातीनें पत्करलें होतें. या दोन्ही संशोधनाचें फल म्हणून त्यांनीं जे निष्कर्ष काढले आहेत ते जरी पुष्कळसे विवाद्य असले तरी कै. राजवाड्यांप्रमाणें डॉक्टरांच्या कल्पनेची लांब उडी पाहून विद्वान् थक्क होतात. संशोधनाचीं साधनें उपलब्ध करून देण्यांत दोघेहि मोठे बाके; त्यांची पाहण्याची दृष्टीच सर्वांहून निराळी. तेच खरे आधुनिक काळांतील 'द्रष्टे' म्हणतां येतील. असे द्रष्टे विक्षिप्तच असतात !

डॉ. केतकरांच्या प्रापंचिक किंवा खाजगी जिवनासंबंधीं बराच गैरसमज दृष्टीस पडतो. या जीवनावर प्रस्तुत ग्रंथांत एक लेख आहे तो कांहींना अयोग्य वाटेल. पण भलभलते गैरसमज प्रसृत होऊन डॉक्टर आणि समाज यांना अन्याय होतो हें वाजवी नाहीं. डॉक्टर भजीं खात होते म्हणजे ते अन्नाला मोताद होते, त्यांची इतकी विपन्नावस्था होती असें जें सामान्यतः मानलें जातें तें अजीबात चुकीचें आहे. त्यांना भजीं व तशाप्रकारचे चमचमीत पदार्थ फार आवडत म्हणून ते ते खात हें एक; व दुसरें, त्यांना त्यांच्या पाश्चात्य धर्तीच्या गृहव्यवस्थेंत असे पदार्थ पहाण्यासहि मिळत नसत. तेव्हां

घराबाहेर पडले म्हणजे कोठें असले पदार्थ मिळतील, कोठें पोटभर ब्राम्हणी जेवण मिळेल याकडे साहजिकच त्यांचें मन ओढ घेई. डॉक्टरांना काय प्राप्ति होती याचे आंकडे त्यांनींच हातांनीं ' माझें बारा वर्षांचें काम ' या पुस्तकांत दिले आहेत. त्यावरून आपल्या-कडच्या प्रोफेसरांना जेवढे पैसे मिळतात त्याहुन कितीतरी जास्त पैसे ते ज्ञानकोशांतून घेत असें दिसून येईल. मग ओढाताण कां, असा प्रश्न उभा राहतो. त्याचें सरळ साधें उत्तर म्हणजे त्यांचा अव्यवस्थित कारभार होय. त्यांचा मोठा दोष म्हणजे हाच होय व त्यामुळें त्यांचें स्वत:चे व ज्ञानकोशसंस्थेचें बरेंच नुकसान झालें, असें स्पष्टपणें लिहि-ण्यावांचून गत्यंतर नाहीं. Dotcor in Council अशी घटना पाहिजे असें आम्ही नेहमीं म्हणत असूं याचें कारण म्हणजे, डॉक्टर त्या त्यावेळच्या लहरीप्रमाणें कांहींतरी करून जात व मागाहून तें त्यांना व इतर सहकाऱ्यांना निस्तरावें लागे. कोणाच्या तंत्रानें किंवा बुद्धीनें चालण्याचा स्वभाव डॉक्टरांसारख्या पराकोटीच्या प्रज्ञावंतांत नसतो याचा समाजाला अनुभव आहेच. तेव्हां समाजानें डॉक्टरांची अवहे-लना जाणून बुजून केली, त्यांना अन्नाला मोताद केलें, त्यांचें कुटुंब देशोधडीस लाविलें या प्रकारचे आरोप अगदीं वृथा आहेत. शिवाय आपल्या स्वच्छंद आचारविचारांच्या संगोपनासाठीं समाजाचा त्रास सोसण्यास अशा सुधारकानें तयार असलेंच पाहिजे. तरी डॉक्टरांना आगरकरादि पूर्वसुधारकांइतका त्रास समाजापासून मुळींच पोंचला नाहीं. ते वेगळ्याच पंथांतले सुधारक होते व काळ बदलला होता. डॉक्टरांच्या भिन्न राजकीय पक्षामुळें ( त्यांच्या राजकीय पक्ष्यांत तेच एकटे होते ) तत्कालीन प्रभावी राजकीय पक्ष्याकडून त्यांची उपेक्षा मात्र झाली व याचाच राग त्यांना व त्यांच्या आजच्या नवीन कैवाऱ्यांना येतो.

आमच्या मतें डॉक्टरांनीं आपल्या स्वतंत्र व महत्त्वाच्या वाङ्मय कार्याबाहेर उगीच अर्थव्यय आणि शक्तिव्यय करूं नये, कारण त्यांच्या अशा उद्योगांमुळें ज्ञानकोशमंडळाच्या चालू कामावर अनिष्ट परिणाम होई व लोकांकडून हेटाळणी होई हें निराळेंच. लोकांना त्यांच्या गाढ विद्वत्तेविषयीं मोठा आदर असला तरी त्यांच्या इतर गोष्टी हास्यास्पद ठरत. त्यामुळें त्यांच्या पक्ष्यांत येण्यास कोणी तयार नसे. त्यांनीं अनेक उद्योग हाताळले पण ज्ञानकोशाखेरीज कोणताच यशस्वी झाला नाहीं, याला कारण वरीलच देतां येईल. ज्ञानकोशाच्या यशाचें सर्वच श्रेय त्यांना देणें न्यायाचें होणार नाहीं. त्यांच्याबरोबर शेवटपर्यंत कसल्याहि परिस्थितींत तग धरून राहाणारे व त्यांच्याहून जास्त आर्थिक दुःस्थिति सहन करणारे कांहीं सहकारी मिळाले नसते तर ज्ञानकोश बाहेरच पडताना. हें डॉक्टरांनींहि प्रांजळपणें कबूल केलें आहे. पण डॉक्टरांच्या दुःस्थितीची तेवढी जाहिरात झाली. पण याविषयीं येथें जास्त लिहिणें योग्य दिसणार नाहीं म्हणून दुसऱ्या मुद्याकडे वळतों.

ज्ञानकोशाचें कार्य समाप्त झाल्यावर मंडळांत उरलेल्या मंडळींना पुढेंहि एकत्र संघटनेनें असेंच भरीव वाङ्मय कार्य करतां येईल अशी कोणतीच योजना निश्चित न झाल्यामुळें १९२८ च्या एप्रिल महिन्यांत मंडळ फुटलें व डॉक्टर एकटेच आपलें 'प्राचीन महाराष्ट्र' संपादनाचें कार्य करूं लागले. या वेळेपासूनच, जे लोकांच्या विशेष पाहण्यांत आले त्या त्यांच्या हालांना सुरुवात झाली. कोणी अनुभवी सहसंपादक किंवा सहकारी जवळ नाहीं; ज्ञानकोशाचीं पुस्तकें मात्र इतरांप्रमाणेंच त्यांच्याहि वांट्याला जीं आलेलीं तीं विकण्याचें व पुढील पुस्तकांचें प्रकाशन करण्याचें काम साहजिक त्यांच्या एकट्यावर पडलें; त्यांच्या वाङ्मयकार्यांत किंवा अर्थसंपादनांत त्यांच्या आंग्ल पत्नीची त्यांना

कधींच मदत नव्हती; उलट घरचा खर्च पाश्चात्य राहणीप्रमाणें मोठा; अशा दुर्धर परिस्थितीमुळेंच डॉक्टरांचें उर्वरित आयुष्य कष्टाचें गेलें व यांचेंच दृश्य नवीन पिढीनें पाहिलें व साहजिकच त्यानें समाजावर निर्घृणतेचा आरोप लादला. केवळ आपल्या स्वभावदोषामुळें आधींच समाजावर रुष्ट असलेल्या कांहीं शिष्ट मंडळींनीं त्याला भर दिली व 'सदाशिवपेठी संस्कृती'चा वाद उत्पन्न केला.

सारांश, डॉक्टर केतकरांसारख्या अत्यंत बुद्धिमान् आणि कर्तृत्ववान् माणसाची समाजाकडून उपेक्षा होत असली तर ती कां होते याची खरी माहिती मिळवून व सर्वांगीण विचार करून सत्य चिकित्सा होतच नाहीं. एखाद्यानें सद्धेतूनें—सहानुभूतीनें कांहीं उठवावें व त्याला इतरांनीं उचलून धरावें, असाच प्रकार चालतो. विशेषतः स्वतःस फार मोठे पण उपेक्षित समजणारे अहंमन्यच असा उपेक्षावाद लढवितांना दिसतात. असो.

डॉ. केतकरांनीं आपल्या असामान्य बुद्धिमत्तेनें आपणांस घालून दिलेले वाङ्मयकार्याचे धडे विसरण्याजोगे तर नाहींतच पण ते कितीतरी गिरविले गेलेले दिसतील. त्यांनींच दिलेल्या कल्पने—योजनेप्रमाणें चाललेलीं कोशकार्यें त्यांचीं जिवंत स्मारकें होत यांत शंकाच नाहीं. त्यांचा वारसा त्यांच्या एकाच कुटुंबांत न राहातां सर्व समाजाकडे आला आहे. आज महाराष्ट्र, कोशस्वरूपी उच्च व चिकित्सात्मक साहित्यांत अग्रेसर जो आहे त्याचें श्रेय डॉ. केतकरांना दिलें पाहिजे. आपला महाराष्ट्र पुढें यावा ही त्यांची तळमळ त्यांच्या विरोधी टीकेंतहि दिसे. त्या दृष्टीनें महाराष्ट्रगौरवाच्या बाबतींतील त्यांच्या अतृप्त इच्छा आपण शक्त्यनुसार पार पाडणें आपलें जीवितकर्तव्य आहे असें आम्ही समजतों. दोष ओळखून गुणांची चहा करण्यांत जी तारतम्य तौलनिक दृष्टि आहे तीच आम्ही या लेखांतून अवलंबिली आहे

महाराष्ट्रानें त्यांना अद्याप खरे व पुरे ओळखलें नाहीं असाच आमचा सवाल आहे. ती खरीखुरी ओळख होण्यासाठीं त्यांच्याशीं निकट सान्निध्य किंवा परिचय असणारांनींच त्यांचें यथातथ्य स्वरूप स्पष्टपणें समाजापुढें ठेवलें पाहिजे व भ्रामक समजुती नाहींशा केल्या पाहिजेत. त्यांच्या ललित वाङ्मयापेक्षां उच्च साहित्याचा तरुणवर्गानें अभ्यास केला पाहिजे व केतकरयुगाला चिरंतन राखिलें पाहिजे.

चिंतामण गणेश कर्वे

दा. क्र. ६७४०

REFBK-0006740